अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

मार्च २०१० | किंमत १५ रू.




- कॅच मी इफ यू कॅन
- अ वुमन्स करेज
- कुरूक्षेत्रानंतर
- सुखद बालसंगोपन

मेहता मराठी

# ग्रंथजगत

दिवाळी अंकाला
'महाराष्ट्र साहित्य परिषद'
दिवाळी अंक स्पर्धा २००९ चा
अ.स.गोखले स्मृत्यर्थ
'रत्नाकर' पुरस्कार









मुलुंडच्या
साहित्य सम्राट
न.चिं. केळकर ग्रंथालयाचा
'साहित्य साधना पुरस्कार'

## 'प्रेमाचा रेणू'

विज्ञानकथा संग्रहाला
प्राप्त झाला आहे.

– डॉ. संजय ढोले

मेहता पब्लिशिंग हाऊस

◆ मार्च २०१०
◆ वर्ष दहावे
◆ अंक तिसरा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १२ |
| **पुस्तक परिचय** | |
| **कॅच मी इफ यू कॅन :** अनु. ज्योत्स्ना लेले | ३८ |
| **अ वुमन्स करेज :** अनु. प्रशांत तळणीकर | ४४ |
| **कुरुक्षेत्रानंतर :** अनु. वर्षा काळे | ५२ |
| **सुखद बालसंगोपन :** डॉ.रत्नावली दातार | ६० |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ६७ |
| **पुरस्कार** | ७२ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ८८ |
| **श्रद्धांजली** | ९० |
| **बालनगरी** | १०३ |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Email -info@mehtapublishinghouse.com
Website -www.mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## महाराष्ट्राचे नवे सांस्कृतिक धोरण

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात नवनवे संकल्प सोडण्याचा राज्य सरकारचा आणि जनताजनार्दनाचा उत्साह दिसून यायला हवा. ते आपल्या चैतन्याचे आणि आशावादाचे लक्षण मानायला हवे. बराच संघर्ष करून आणि जनआंदोलन चालवून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली, ती मराठी भाषकांना एकत्र आणण्याच्या जिद्दीने. मराठी भाषा आणि वाङ्मय, मराठी भाषा आणि संस्कृती यांचा एकात्म आविष्कार व्हावा, विकासाच्या प्रक्रियेला वेग यावा आणि मराठी अस्मितेचा ध्वज उंच लहरत राहावा यासाठी मराठा तितुका एक व्हावा असा आपला घोष होता. संयुक्त महाराष्ट्राच्या त्या स्वप्नाला बेळगाव-कारवार वगैरे सीमावर्ती भागाच्या दुराव्याने काहीसे अपुरेपण जाणवत असले तरीही मराठवाडा आणि विदर्भ यातील मराठी नेतृत्वाने भरभक्कम साथ दिली. यशवंतराव चव्हाण यांनी द्रष्टेपणाने या सर्व घटकांना मन:पूर्वक एकत्र आणण्यासाठी अभिजात औदार्य आणि उमदेपण दाखवले... मुख्यमंत्री म्हणून त्या दिशेने नेटाने, प्रामाणिकपणे वाटचाल केली. यशवंतराव केंद्रात संरक्षणमंत्री म्हणून गेले; त्यानंतर त्यांच्या त्या दूरदर्शी धोरणाला कुठे ना कुठे तडे जात राहिले. विदर्भ-मराठवाड्याचा बॅकलॉग भरून काढण्यात उत्तरकालीन नेतृत्व दुबळे ठरले. त्यामुळे स्वतंत्र विदर्भाची मागणी अधूनमधून होत राहिली. छोट्या राज्यांचे प्रस्ताव पुढे येतात तेव्हा विदर्भवादी आंदोलनांनाही जोर येतो. परंतु मराठी भाषकांचे एकच एक विशाल राज्य असणे हेच महाराष्ट्राचे खरे सामर्थ्य आहे यावर मराठी जनांची मनोमन श्रद्धा आहे असे म्हणायला हरकत नाही.

सुवर्णमहोत्सवी वर्षात गेल्या अर्धशतकाचा धावता आढावा घेऊन आपल्या यशापयशाची नोंद घेतली जावी हे स्वाभाविकच आहे. ज्या क्षेत्रात आपण मागे राहिलो त्यात नव्या जोमाने कामाला लागायला हवे हेही आवश्यक आहे.

या दृष्टीने सुवर्णमहोत्सवी वर्षात महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण निश्चित करण्याचा जो निर्णय घेतला आहे तो निश्चितच स्वागतार्ह आणि दिशादर्शक ठरेल.

डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली त्यासाठी ऑगस्ट २००९ मध्ये एक समिती नेमण्यात आली. डॉ. अरुण टिकेकर, हृदयनाथ मंगेशकर, उल्हास पवार,

दत्ता भगत, शफाअत खान, गिरीश गांधी, मधुर भांडारकर, वि. वि. करमरकर, सिसिलिया कार्व्हालो, अशोक नायगावकर आदींचा या समितीत समावेश होता. या समितीने अवघ्या चार महिन्यात वीस बैठका घेऊन राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचा मसुदा तयार करून दिलेल्या मुदतीच्या आतच काम करण्याचा एक आदर्शच निर्माण केला आहे. डॉ. साळुंखे यांचे त्याबद्दल अभिनंदन करायला हवे.

राज्य सरकारने एकूण अर्थसंकल्पातील चार टक्के रक्कम सांस्कृतिक उपक्रमांसाठी राखून ठेवावी असा आग्रह अहवालात नोंदवला आहे. सध्या त्यासाठी फारच तुटपुंजी तरतूद आहे. ही शिफारस महत्त्वपूर्ण मानायला हवी. त्याशिवाय स्थायी सांस्कृतिक निधीचाही एक प्रस्ताव आहे. सांस्कृतिक संस्थांना वेगवेगळे प्रकल्प राबवण्यासाठी निधी आणि भाषाभवन याबद्दलच्या सूचनाही वास्तववादी आहेत.

साठ पृष्ठांचा हा मसुदा महाराष्ट्र सरकारच्या संकेत स्थळावर उपलब्ध केला आहे. भूमिका, पायाभूत तत्त्वे, अग्रक्रम, भाषा आणि साहित्य, प्राच्यविद्या, कला, स्मारके, महिला, क्रीडा, संकीर्ण वगैरे प्रकरणांद्वारे १७५ शिफारशी या मसुद्यात समाविष्ट आहेत. समाजातील सर्व घटकांना आणि विविध प्रकारच्या कार्यप्रवृत्तींना या धोरणात न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या धोरणाला व्यापक जनाधार मिळायला हरकत नसावी.

'भाषा आणि साहित्य' या प्रकरणात अनेक बाबींना स्पर्श करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात हिंदी, गुजराती, सिंधी, उर्दू या चार भाषांच्या अकादमी आहेत. संस्कृत, पाली, अर्धमागधी, अरबी, फार्सी या भाषांमध्येही विद्यापीठांत संशोधन चालते. इंग्रजीचेही महत्त्व डावलणे शक्य नाही. या मसुद्यात या सर्व भाषांमध्ये वेगवेगळे प्रकल्प राबवून त्यांचा अभ्यास होत राहणे, त्यामधील साहित्याची निर्मिती आणि प्रसार यांना सुविधा देणे यावर भर दिला आहे. भाषा सल्लागार मंडळ सुरू करणे, मराठी प्रमाणभाषा कोश तयार करणे, मराठी शब्दांचा व्युत्पत्तींचा कोश करणे, परिभाषा कोश, दुर्मिळ ग्रंथसंचयिका, विश्वकोशाचे वेगवेगळे खंड वगैरे उपक्रमांचाही पाठपुरावा केला आहे. ग्रंथप्रसारासाठी जिल्ह्याजिल्ह्यात ग्रंथमहोत्सव भरवण्याची सूचनाही केली आहे. सातारा येथील ग्रंथमहोत्सवाने गेल्या ११ वर्षात एक वेगळी दिशा दाखवून दिली आहे. शासनाचे वा अन्य कोणाचे अनुदान न घेता, कमीत कमी खर्चात ग्रंथमहोत्सव भरवून त्यात आकर्षक कार्यक्रम आणि चर्चा परिसंवाद यांची जोड देऊन गावाचा उत्सव अशा स्वरूपात सर्वांना सामावून घेण्याचा प्रयत्न त्यात केला जातो. इतर जिल्ह्यात त्या धर्तीवर प्रयत्न चालू आहेत. या शिफारशीमुळे अशा महोत्सवांना शासनाचे भरघोस सहाय्य मिळू शकेल. मात्र अनुदानाच्या आशेने धंदेवाईक इव्हेन्ट मॅनेजमेंटवाल्यांची मक्तेदारी ग्रंथमहोत्सवात होऊ नये अशी काळजी घ्यावी लागेल.

ग्रंथ प्रकाशन, ग्रंथवितरण, ग्रंथ पुरस्कार या दृष्टीनेही वेगवेगळ्या पातळ्यांवर प्रयत्न अभिप्रेत आहेत. लेखकांना विविध विषयांवर लेखन करण्यास प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मिळणे, अभ्यासाची संधी मिळणे, अनुवादाला प्रतिष्ठा मिळणे, लेखन कार्यशाळा घेणे याकडेही लक्ष द्यावे लागेल. साहित्य संस्थांची भूमिका त्यात प्रभावी राहील. साहित्य संमेलनाचे माध्यमही जागृतीसाठी आणि वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी उपयुक्त असते. महाराष्ट्रात वेगवेगळी छोटीमोठी संमेलने भरतात. त्या सर्वांना आर्थिक मदत दिली गेली तर त्यात सातत्य राहू शकेल. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाबरोबर विश्वसाहित्य संमेलनाच्या धर्तीवर देशोदेशी मराठीचे शक्तिप्रदर्शन करण्याचेही प्रयत्न होण्याची गरज आहे. परदेशातील मराठी माणसांच्या संघटना-संस्थांना त्यासाठी जवळ करायला हवे. लेखक-कवींना सादरीकरणाच्या दृष्टीने ब्रिटिश कौंसिलच्या धर्तीवर काही अनुदान देऊन, वाचकांच्या अभिरुची संवर्धनाला चालना देता येईल. या अहवालातील भाषा व साहित्यविषयक भाग त्या दृष्टीने अधिक काळजीपूर्वक व्यापक करायला खूप वाव आहे. प्रकाशन संस्थांना मोठ्या प्रकल्पांबाबत सहकार्य म्हणून अर्थसहाय्य करणे हितावह ठरेल. ग्रंथालयाच्या समृद्धीकरणाकडेही लक्ष द्यायला हवे.

शुद्ध लेखन, शुद्ध भाषा या ऐवजी प्रमाणभाषा हा शब्द वापरून भाषेच्या बाबतीतला शुद्ध-अशुद्धतेचा जाच कमी करण्याची कल्पनाही पचनी पडायला हरकत नाही. मांग, भंगी, चांभारचौक्या, धेडगुजरी, वेश्या, बाटगा, खेळखंडोबा, गावढळ वगैरे शब्द 'अप्रयोगार्ह' मानून त्याऐवजी मातंग, सफाई कामगार, नसत्या चौकशा, संमिश्र-संकरित, देहविक्रय करणारे, धर्मांतरित, विचका, ग्रामीण यासारखे शब्दप्रयोग वापरावेत असेही सुचवण्यात आले आहे. अप्रयोगार्ह शब्दांचा शोध घेण्यासाठी एक समिती नेमण्याची शिफारस करण्यात आली आहे. बोलीभाषांच्या संवर्धनासाठी 'बोली' अकादमी स्थापन करण्याचीही सूचना केली गेली आहे.

महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक धोरणाच्या निश्चितीसाठी डॉ. साळुंखे समितीने सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवून सर्व घटकांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे. २८ फेब्रुवारीपर्यंत त्याबद्दलची मते मागवण्यात आली होती. ही मुदत काही जणांना कमी वाटणे स्वाभाविक होते. परंतु १ मे रोजी हे धोरण जाहीर करण्याचा मनोदय असल्याने ही काळाशी शर्यत अटळच! या धोरणासंबंधी सुरू झालेल्या चर्चेतील मतभेदांमुळे मुख्यमंत्री जर व्यवस्थित मार्ग काढू शकले तर १मे रोजी सांस्कृतिक धोरण जाहीर होऊ शकेल. आणि अनेकविध नव्या उपक्रमांना वेग येईल अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही.



**मेहता मराठी ग्रंथजगत**

**दि रजिस्ट्रेशन ॲक्ट ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल रूल्स : १९५६)**

**नियम क्र. ८ अन्वये निवेदन फॉर्म ४**

१) प्रकाशन स्थळ : मेहता पब्लिशिंग हाऊस,
   १९४१ सदाशिव पेठ, पुणे ३०.

२) प्रकाशन काल : मासिक

३) मुद्रक, प्रकाशक व संपादक : सुनील अनिल मेहता,
   १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०

४) प्रकाशनाची मालकी : सुनील अनिल मेहता,
   १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

५) राष्ट्रीयत्व : भारतीय

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की, वर दिलेला तपशील माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे बरोबर आहे.

दि. १.३.२०१० सुनील अनिल मेहता
प्रकाशक

## सभासदांना सूचना

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. ही विनंती.

**आगामी**

# क्रिटिकल




**रॉबिन कुक**
अनु. प्रमोद जोगळेकर

वैद्यकीय क्षेत्रातील बदलत्या सेवानियमांचा व्यावसायिक फायदा घेण्यासाठी अनेक कंपन्या पुढे सरसावतात.

अशा कंपन्यांमध्ये आपला काळा पैसा जिरवणं शक्य आहे, हे माफिया टोळ्यांना उमगतं

'एन्जल्स हेल्थ केअर' कंपनीच्या रुग्णालयांमध्ये एस.आर.एस.एस. या रोगजंतूच्या संसर्गामुळे एकामागोमाग एक मृत्यू होऊ लागतात.

वैद्यकीय निरीक्षक लॉरी माँटगोमेरी त्या मागची कारणं उलगडायला प्रारंभ करते. कारण अशाच एका रुग्णालयात तिच्या नवऱ्यावर शस्त्रक्रिया होणार असते. तिचा शोध पुरा होऊ नये म्हणून कॉर्पोरेट आणि माफिया ठक प्रयत्न करतात. ते लॉरीला पळवून नेतात. सिमेंट घातलेल्या बादलीत पाय अडकवून 'सिमेंटचे बूट' चढवून लॉरीला बोटीतून फेकण्याची तयारी सुरू होते. अचानक...

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**आगामी**

संवेदनशील वयाचं मुक्त आत्मकथन

# उधाण वारा

**(माझं कुवारपण भाग २)**




**तसलिमा नासरिन**

अनुवाद

**विलास गीते**

१९९९ साली प्रकाशित झालेल्या तसलिमा नासरिन यांच्या 'आमार मेयेबेला' (माझं कुवारपण) या आत्मकथनाने बंगाली साहित्यविश्वात खळबळ माजली. एक अविस्मरणीय आत्मकथन म्हणून आता ते पुस्तक मान्यता पावले आहे. 'उतोल हवा' (उधाण वारा) हा त्याच आत्मकथनाचा दुसरा भाग आहे.

या भागात तसलिमांच्या सोळा ते सव्वीस वर्षापर्यंतची कहाणी आहे. या पुस्तकातही त्यांच्या रोखठोकपणाचे व करुणेचे दर्शन होते. पण त्यांची भोवतालाकडे पाहण्याची दृष्टी आणखी तीक्ष्ण झाली आहे. अनुभवांचा परीघ विस्तृत झाला आहे. त्यामुळे तसलिमांची जडणघडण कशी झाली हे या पुस्तकात आणखी तपशीलवारपणे समजते. एका मागासलेल्या समाजात आणि कुटुंबात मोठ्या झालेल्या युवतीने पुराणमतवादाची बंधने कशा प्रकारे तोडून टाकली हे या पुस्तकात दिसते. त्यांचे प्रेमप्रकरण, त्यामधील आनंद-वेदना, संबंधामधले चढउतार आणि शेवटी त्यातून बाहेर पडणे– हे सारे सांगताना तसलिमांचे गद्य काव्याच्या तेजाने झळाळते.

या धारदार आत्मकथनाचा मराठी अनुवाद समर्थ अनुवादक विलास गीते यांनी तितक्याच प्रत्ययकारीपणे केला आहे.

आगामी




# वन शॉट

**ली चाइल्ड**

अनु. बाळ भागवत

सहा शॉट्स. पाच ठार.
काही तासांत बिनतोड पुराव्याच्या आधारावर
गुन्हेगाराला अटक होते, पण तो तोंडातून अक्षर काढत नाही.
खूप प्रयत्नांनंतर तो बोलतो, 'तुम्ही चुकीच्या माणसाला पकडले आहे...
माझ्यासाठी जॅक रीचरला बोलवा.'
रीचर तेरा वर्षे मिलिटरी पोलीस असतो. तपास करण्यात, माग काढण्यात
तरबेज. त्याला अडकवण्यासाठी निरपराध व्यक्तीचा खून करण्यापर्यंत
मजल जाते. संतापलेला रीचर बचाव पक्षाच्या तरुण आणि सुंदर
वकिलाला घेऊन खरा गुन्हेगार शोधायला लागतो.
प्रत्येक पावलाला गोळीचे उत्तर गोळीनेच द्यायला हवे
हे त्याला ठाऊक असते. जॅक रीचरचा शोध घेणे सोपे नसते.
पण टी.व्ही.वरच्या बातम्या बघून रीचरची
खात्री पटते की काहीतरी घोटाळा आहे.
गुन्हेगार हा लष्करातला नेमबाज असताना त्याचा शॉट चुकलाच कसा?
आणि शहरात पोहोचल्यावर आपले या शहरातले अस्तित्व कुणाला तरी
खुपते आहे हे रीचरच्या लक्षात येते.

आगामी

# गर्ल्स ऑफ रियाध



**रजा अल्सानिया**

अनुवाद
**स्नेहल जोशी**

शुक्रवारची प्रार्थना संपल्यावर एक ई-मेल ऑनलाईन नेटवर्कवरील सदस्यांत प्रसारित केली जाते.

रियाधमधील विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या गाम्राह, मिचैल्ली, सादीम आणि लामीस या चार उच्च स्तरीय विद्यार्थिनींच्या आयुष्यातील विदारक वास्तव वर्षभराच्या कालावधीत समोर येते.

एकीकडे स्वातंत्र्याची ओढ आणि दुसरीकडे सनातनी वातावरण यात अडकलेल्या या मुली आहेत. या पेचातून त्यांनी आपल्या आई-वडिलांच्या नकळत केलेले डेटिंग, अनुभवलेले शहरी जगणे, सेक्स आणि यातून त्यांच्या आयुष्याची झालेली घुसमट आपल्यासमोर येते.

ह्या चार तरुणी सामाजिक, प्रेमविषयक, व्यावसायिक आणि लैंगिक दु:खांना तोंड देत कर्मठ सनातनी समाजाच्या कालबाह्य चालीरीतींना तोंड देत नव्या जीवनशैलीचा प्रभाव दाखवितात.

या तरुण सौदी स्त्रियांच्या गुंतागुंतीच्या जीवनातून प्रकट होणारी जीवघेणी घुसमट आणि विलक्षण जीजीविषा.

# साहित्यवार्ता



### * जागतिक गुराखी साहित्य संमेलन

जागतिक गुराखी साहित्य संमेलन ता. २६ जानेवारी रोजी गड (ता. लोहा) येथे झाले. चार दिवसांच्या या संमेलनात गुराख्यांच्या जीभजोड साहित्याची लयलूट होती.

गेल्या अठरा वर्षांपासून हे संमेलन घेतले जाते. गुराखी, सालदार, बेलदार आदी उपेक्षित घटकांना न्याय मिळावा, त्यांच्यावरील अन्याय दूर व्हावा, त्यांना पेन्शन योजना लागू करावी, यासाठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून संमेलनाचे प्रमुख आयोजक माजी खासदार डॉ. केशवराव धोंगडे प्रयत्नशील आहेत.

जात्यावरील ओव्या, भुलई, ओव्यांची स्पर्धा, दळण-कांडण स्पर्धा, उखाणे स्पर्धा, कापूसवटी, साळकुटी स्पर्धा, शोकगीत स्पर्धा असे कार्यक्रमही संमेलनात घेतले गेले. संमेलनास येणाऱ्या सर्व गुराख्यांना संस्थेतर्फे मानधनवाटप करण्यात आले. ता. २६ जानेवारी रोजी किरोडा (ता. लोहा) येथील कामाईच्या झऱ्यावर गुराखी जाने देवकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करून मिरवणूक काढण्यात आली. ज्ञानहंडी फोडून संमेलनाचे उद्घाटन झाले.

या मिरवणुकीत संयोजक डॉ. केशवराव धोंगडे, संमेलनाध्यक्ष तातेराव गायकवाड, उद्घाटक संताबाई शहापूरवाड, स्वागताध्यक्ष ॲड. मुक्तेश्वर धोंगडे, संमेलनप्रमुख प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंगडे यांच्यासह कोळी, वैदू, डक्कलवार, कैकाडी, अस्वलवाले, माकडवाले, राईंदर, फकीर, गोसावी, मनकावडे सहभागी झाले होते.

### * दिल्लीत आंतरराष्ट्रीय ग्रंथ जत्रा

ग्राहकवाचक प्रकाशक आणि लेखक यांची मांदियाळी असणाऱ्या आशिया खंडातील अग्रगण्य १९व्या आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळ्याचे ३१ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान दिल्लीत आयोजन करण्यात आले होते.

या वर्षाच्या जत्रेची पुस्तक मेळाव्याची मूळ संकल्पना 'रीडिंग अवर कॉमनवेल्थ' अशी होती. भारताचे खेळातील योगदान आणि भारतीय खेळाच्या इतिहासासंबंधी इंग्रजीसह देशातील सर्वच प्रादेशिक खेळविषयक ७०० पुस्तकांचा यात समावेश होता. ४२ हजार चौरस मीटरचा परिसर असणाऱ्या प्रगती मैदानावर वेगवेगळ्या हॉलमध्ये पुस्तकांचे २ हजार ४०० स्टॉल्स उभारले होते. एकूण १ हजार १९९

भाग घेणाऱ्यांपैकी आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफ या नामांकित संघटनांच्या स्टॉलसह १५ देशांतील ३५ पुस्तकप्रकाशकांच्या स्टॉल्सचाही यात समावेश होता. १२ क्रमांकाच्या हॉलमधील महाराष्ट्राचा स्टॉलही पहिल्याच दिवशी पुस्तक प्रेमींच्या आकर्षणाचा विषय ठरला.

*** थोर लेखकांची सुरुवात बालसाहित्यापासून**

''सध्याचे बालसाहित्यिक हे उद्याचे थोर साहित्यिक आहेत. मोठ्या लेखकांची सुरुवात बालसाहित्यिकांपासून होते. संगमनेरच्या बालसाहित्य संमेलनामुळे उद्याच्या थोर साहित्यिकांची मनोभूमिका तयार होईल,'' असे प्रतिपादन अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांनी केले. संगमनेर येथील मालपाणी लॉन्समध्ये तीन दिवस २२वे अ. भा. बालकुमार साहित्य संमेलन झाले. शालेय शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात, अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलनाच्या मावळत्या अध्यक्षा डॉ. विजया वाड, माजी अध्यक्ष ज्येष्ठ बालसाहित्यिक शंकर सारडा, दत्ता टोळ, डॉ. न. म. जोशी, सुनील महाजन, गोविंद गोडबोले, माधव राजगुरू, आनंद जोशी, डॉ. संजय मालपाणी, नवीन इंदलकर, सूर्यकांत सराफ, अनिल कुलकर्णी, नगराध्यक्षा दुर्गा तांबे आदी व्यासपीठावर होते.

संमेलनासाठी उपस्थित सुमारे सहा हजार बालकांशी काव्यमय संवाद साधताना पाडगावकर म्हणाले, ''महाराष्ट्रात अनेक साहित्य संमेलने होत असली, तरी बालकुमार साहित्य संमेलनाचे वेगळेपण लक्षात घ्यायला हवे. त्याचे सांस्कृतिक महत्त्वही वेगळेच आहे. मी मुलं व मोठ्या माणसांत कधीही भेद केला नाही. मोठ्या माणसांची व मुलांची कविता सारख्याच तन्मयतेने केली.''

डॉ. वाड यांनी मुलांशी गप्पा करीत बालकुमार साहित्य संमेलनाची धुरा पाडगावकर यांच्याकडे सोपविली. उद्घाटन मंत्री बाळासाहेब थोरात यांनी संगमनेरला दरवर्षी बालसाहित्यिकांचा मेळा भरविण्याची अपेक्षा व्यक्त करताना मुख्यमंत्री निधीतील दोन लाख रुपयांचा धनादेश डॉ. मालपाणी यांच्याकडे सुपूर्द केला.

*** कविसंमेलनाने घेतला विद्यार्थ्यांच्या अपेक्षांचा वेध**

*''एवढं सगळं ऐकून शेवटी, कोण व्हावं समजत नाही...*
*मला तुमच्या अपेक्षांचं ओझं, मुळीच पेलवत नाही...!''*

शशिकांत शिंदे यांनी 'अपेक्षांचं ओझं' ही कविता लहान मुलांच्या मनातील अपेक्षांचा वेध घेत मोठ्यांनी लहानांसाठी आयोजित केलेल्या कविसंमेलनात सादर केली.

२२व्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचा दुसरा दिवस...

भा. रा. भागवत साहित्य नगरी बालगोपाळांनी गजबजून गेली होती. मुख्य

सभामंडपात लहानांसाठी मोठ्यांचे कविसंमेलन झाले. प्रत्येक कवी-कवयित्री काव्य वाचनापूर्वी कवितेची ओळख स्वत:च विद्यार्थ्यांना करून देत होते. या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार अनिल सोमणी होते.

सुधा कांकरिया यांनी 'आई मला सांग ना, बाबा तुम्ही सांगा ना' ही कविता सादर केली. अरुण देशपांडे यांची 'धांगडधिंगा, मौजमस्ती, यातच रंगते खरी दोस्ती, करावी वाटते खूप मस्ती' कविता टाळ्या मिळवून गेली. कवी अनिल देशपांडे यांनी 'अभ्यास' या कवितेतून 'आईचे बोलणे, बाबांचा मार... अभ्यास केला तरी, मिळतो फार... सर्व विषयांचा अभ्यास आहे मोठा, खेळायलाही मिळत नाही, हा माझा तोटा, दप्तरांचं ओझं, शिक्षकांचा धाक, कलागुणांना नाही मिळत वाव...' या कवितेने आजच्या पालक व बालक यांच्यातील संबंधांचे चित्रच उभे केले. स्वप्निल पोरे यांनी 'भारत माझा देश, त्याला विजयाचा इतिहास', श्रीकांत कुलकर्णी यांनी 'अगडबंब नगरीचा राक्षस', डॉ. अर्चना माळी यांनी 'वाहत होता एक रस्ता', सुरेश म्हाळस यांनी 'समजून घ्यावं मला' व डॉ. विवेक वाकचौरे यांनी 'आपण सहलीला जाऊ या' अशा कविता सादर केल्या.

*** 'बदलत गेलेली सही'चे प्रकाशन**

''माणसं बदलतात. सही बदलते. अवतीभवतीचे जग बदलते. जेव्हा अनुकूल बदल होतो तेव्हा त्याला आपण विकास म्हणतो. प्रतिकूल बदलाला ऱ्हास असं म्हणतो. बदलणं अगदीच काही वाईट नसतं. त्यातून आपल्याला नवी ऊर्जा मिळत आहे,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

डीएसके फाउंडेशन आणि पुणेकर रसिक मित्रमंडळातर्फे अंजली कुलकर्णी लिखित 'बदलत गेलेली सही' या कवितासंग्रहाचे प्रकाशन कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. 'ग्रंथाली'ने हा कवितासंग्रह प्रकाशित केला आहे. या वेळी ज्येष्ठ बांधकाम व्यावसायिक डी. एस. कुलकर्णी उपस्थित होते. यानिमित्ताने 'बदलत गेलेली अभिव्यक्ती' या विषयावरील परिसंवादात कवयित्री नीरजा, आसावरी काकडे, कवी हेमंत जोगळेकर, अनिल किणीकर आणि 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल यांनी भाग घेतला. संमेलनाध्यक्ष कुलकर्णी आणि प्रकाशक गांगल यांचा सत्कार करण्यात आला

कुलकर्णी म्हणाले, ''वाङ्मयात जीवनाचे प्रतिबिंब असते; पण साहित्यकृती म्हणजे जीवनाची प्रतिकृती नाही. जीवनाचा अन्वय लावताना कवितेपेक्षाही तत्त्वज्ञानाकडे जावेसे वाटते. साहित्यिक कलावंत जीवनाची शिकार करीत नाहीत, तर ते पारध करतात. त्यासाठी त्यांच्याकडे प्रतिकृतीचा पिंजरा असतो. श्रेष्ठ साहित्य केवळ पारध करत नाही, तर ते या जीवनाला साहित्यिक पुनर्जन्म देत असते. रामायण, महाभारत

ही महाकाव्ये जिवंत स्मारक आहेत. सांस्कृतिक, भाषिक सातत्यामुळे कलाकृतीशी आपण एकरूप होत असतो.'' नीरजा म्हणाल्या, ''आशयसूत्र, रूपबंध आणि प्रतिमासृष्टी या सर्व अंगांनी कवितेची अभिव्यक्ती बदलत आहे. पुरुषांशी जोडलेल्या विविध नात्यांच्या माध्यमातून महिलांचं काव्य अवतरलं. गेल्या तीन-चार दशकांतील कवयित्रींनी समाजव्यवस्थेतील दुय्यम स्थान नाकारलं आहे. आता कवितेतील भाषासुद्धा बदलली असून, व्यवस्थेतील जगणं आणि मनातील जगणं यातील तफावत त्या कवितेतून मांडत आहेत.''

गांगल म्हणाले, ''सध्याच्या काळात स्त्रियांइतकेच दु:ख पुरुषांनादेखील आहे. या कवितासंग्रहातून चार दशकांचे वर्तमान व्यक्त होते.''

अंजली कुलकर्णी म्हणाल्या, ''सनातन आणि बाह्य आधुनिक बदल यांचे ताण आजच्या समाजजीवनावर आले आहेत.''

*** गुणीजन साहित्य संमेलन**

''जागतिकीकरणामुळे जीवघेणी स्पर्धा आणि विषमता वाढीस लागून आत्महत्यांचे प्रकार पावलोपावली होऊ लागले आहेत. नव्या पिढीच्या साहित्यिकांनी एका हातात लेखणी, तर दुसऱ्या हातात बोधीवृक्ष घेऊन समाजातील हे नैराश्याचे विषय नष्ट करावे,'' असे आवाहन उत्तम कांबळे यांनी औरंगाबाद येथे ता. ३१ जानेवारी रोजी केले.

धोंडिराम माने विकास प्रबोधिनीतर्फे आयोजित सहाव्या गुणीजन साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रावसाहेब कसबे, प्राचार्य अण्णासाहेब खेमनर, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधाकरराव शिंदे; तसेच संमेलनाचे आयोजक सुभाष माने, सुनीता माने, स्वागताध्यक्ष बी. एन. कंदरफळे, 'मसाप'चे कार्यवाह कुंडलिक अतकरे यांची उपस्थिती होती.

श्री. उत्तम कांबळे म्हणाले, ''दुर्दैवाने शेतकऱ्यांपासून सुरू झालेले आत्महत्यांचे सत्र आता विद्यार्थ्यांपर्यंत येऊन पोचले आहे. जागतिकीकरणाने जीवन अतिशय गतिमान झाले आहे. जागतिकीकरणामुळे जशा नवीन संधी आल्या, त्याचबरोबर भारतीय समाजातील आर्थिक विषमतेची दरी रुंदावली आहे. नवी जातिव्यवस्था यातून उदयास येत आहे. जीवनाची लढाई लढणाऱ्या गुणीजनांकडून आदर्श घेतला पाहिजे. त्यामुळे उद्याचे साहित्यिकच विषमतामुक्त प्रदेश निर्माण करू शकतील, यावर आजच्या पिढीने विश्वास ठेवला पाहिजे.''

श्री कसबे म्हणाले, जिवंत, ज्वलंत माणसेच इतिहास घडवत असतात. स्वत:च्या आई-वडिलांना विसरणारी कृतघ्न माणसे फारसे काही करू शकत नाहीत.

गुणीजन साहित्य संमेलनातून समाजबांधणीची आणि समाजपरिवर्तनाची प्रक्रिया सुरू होईल.

*** सामाजिक कृतज्ञता निधी**

सामाजिक कृतज्ञता निधीतर्फे प्रतिगामी शक्तीविरुद्ध लढणाऱ्या कार्यकर्त्यांचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी 'प्रबोधिनी' स्थापन करण्याची योजना आहे. त्यासाठी समाजाने आर्थिक आधार द्यावा, असे आवाहन निधीचे कार्याध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी केले. ज्येष्ठ अभिनेते व निधीचे अध्यक्ष डॉ. श्रीराम लागू यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशनचे विश्वस्त सुनील देशमुख या वेळी उपस्थित होते. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांत सय्यदभाई (सामाजिक कृतज्ञता पुरस्कार), डॉ. अभिजित वैद्य (एस. एम. जोशी पुरस्कार), नरेंद्र लांजेवार (डॉ. राम आपटे प्रबोधन पुरस्कार) यांचा समावेश होता. या तिन्ही विजेत्यांनी पुरस्कारांची रक्कम आपल्या समाजकार्यास अर्पण केली.

डॉ. आढाव म्हणाले, ''सध्याच्या सामाजिक परिस्थितीत प्रतिगामी शक्तींच्या सर्व क्षेत्रातील उदयामुळे पुरोगामी विचाराची पीछेहाट होऊ लागली आहे. त्यामुळे दिसत असलेल्या फाटाफुटींच्या प्रकारामुळे विधायक विचारांचा प्रवाह उलट्या दिशेने जाण्याची शक्यता वेळीच रोखण्याची गरज आहे. त्यासाठी सामाजिक परिवर्तनवादी विचाराचा प्रसार करणाऱ्या कार्यकर्त्यांनी भाकरीबरोबरच प्रगत संपर्क साधने, सामाजिक संवाद, संघर्षाबाबात अद्ययावत ज्ञान देणे आवश्यक आहे. त्यासाठी सामाजिक कृतज्ञता निधीतर्फे प्रबोधिनी स्थापन करण्यात येत आहे.''

तिन्ही पुरस्कार विजेत्यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले. समाजाचे प्रश्न मांडत असताना कार्यकर्त्यांना अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते असे लांजेवार यांनी सांगितले, तर सामाजिक परिवर्तनासाठी एकजिनसी समाजवादी शक्ती उभारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे डॉ. वैद्य यांनी नमूद केले. घटस्फोटित महिलांना सक्तीची पोटगी मिळेपर्यंत मुस्लिम सत्यशोधक समाज मंडळाच्या कामात सक्रिय राहणार असल्याचे सय्यदभाई यांनी सांगितले.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी सामाजिक कृतज्ञता निधी आणि कार्याबाबत माहिती दिली. प्रा. सुभाष वारे यांनी सूत्रसंचालन केले.

*** महाराष्ट्राच्या विविध पैलूंवरील ५० पुस्तके**

डायमंड पब्लिकेशन्सच्या वतीने महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विविध विषयांवरील ५० पुस्तकांचे प्रकाशन ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी आमदार उल्हास पवार होते. व्यासपीठावर मुकुंद संगोराम, डॉ. शं. ना. नवलगुंदकर आदींची उपस्थिती होती.

राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त राज्य सरकार आपले काम करेलच; पण या कामाचा खारीचा वाटा म्हणून राज्याला सुसंस्कृत करण्यासाठी या दत्तात्रयाने हा 'प्रसाद' दिला आहे, अशा शब्दांत या उपक्रमाचे कौतुक केले. 'राज्याच्या जडणघडणीत कोणकोणत्या घटना घडल्या, किती पक्ष आले आणि गेले यांचा ऊहापोह या पुस्तकांमधून करण्यात आला आहे. महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम 'युक्रांद'सारख्या विविध चळवळींनी केले. तरुणांना दिशा दिली. पण खरेतर त्या चळवळींविषयी विचार करायला आम्ही त्यावेळी चुकलो की काय असे आज वाटते. त्याचे विश्लेषण करण्याची आवश्यकता आहे,' असे सुशीलकुमार शिंदे यांनी महाराष्ट्राला सुसंस्कृत, ज्ञानी तसेच विचार देण्याचे काम प्रकाशन व्यवसायाने करावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

या ५० पुस्तकांमुळे राज्याच्या कामगिरीचा लेखाजोखा मांडणे शक्य होईल. देशात साहित्य, संस्कृती क्षेत्रात राज्याने आपला लौकिक प्रस्थापित केला असून, इतर राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्याच्या वाट्याला किती आले याचाही विचार व्हायला हवा. असे संगोराम म्हणाले. संशोधन करणाऱ्या संशोधकांना या पुस्तकांचा उपयोग होईल, असे डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी सांगितले.

*** बंधुता साहित्य संमेलन**

''साहित्य संमेलन हा केवळ आनंदोत्सव न होता विचारांचा मंच असला पाहिजे, त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन अकराव्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गंगाधर पानतावणे यांनी केले.

पानतावणे म्हणाले, ''साहित्य, समाज व संस्कृती यांचा निकटचा संबंध आहे. खोलवर रुजलेल्या वेदनेतून साहित्याची निर्मिती होते. समाजामध्ये वाचनसंस्कृती दृढमूल करण्यासाठी स्वतंत्रपणे यंत्रणा उभी केली पाहिजे. तशी मानसिकता निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे. मात्र, तरुणांमध्ये चांगला विचार पोचविण्याचे, त्यांना निश्चित दिशा देण्याचे काम साहित्य संमेलनाच्या माध्यमातून व्हावे. जोपर्यंत ग्रामीण साहित्य लिहिले जाते, तोपर्यंत साहित्याला मरण नाही. बोलीभाषा असेपर्यंत मराठी भाषेला कोणताही धोका नाही.''

प्रसिद्ध साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांना राष्ट्रीय बंधुता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सत्यशोधकी फेटा, प्रबोधनाची लेखणी व रोख पाच हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री द्वादशीवार म्हणाले, ''मराठीबरोबरच इतर भाषांतील साहित्याचा तौलनिक अभ्यास करावा. माणसांना एकमेकांपासून दूर करणाऱ्या भिंती लवकरच नाहीशा होणार आहेत. माणसे जवळ आली, तर समस्या आपोआपच संपतील. बंधुताच्या माध्यमातून माणसे जोडण्याचे काम केले जाते आहे.'' वैधानिक

विकास मंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार यांचेही या वेळी भाषण झाले.

उद्योजक रामदास काकडे, शोभाताई रानमाळे, तुषार गोसावी, शिवाजी चाळक, अशोक शीलवंत यांना राज्यस्तरीय बंधुता पुरस्कार प्रदान करण्यात आले.

मावळ तालुक्यातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या व्यक्तींचा 'मावळरत्न' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष प्रकाश रोकडे यांनी पुढील अधिवेशन जुन्नर तालुक्यात होणार असल्याचे जाहीर केले. स्वागताध्यक्ष बबनराव भेगडे यांनी स्वागत केले. कार्याध्यक्ष महेंद्र भारती यांनी आभार मानले. कवी उद्धव कानडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. तेज निवळीकर यांचे संत गाडगेबाबांविषयी व्याख्यान झाले. 'बंधुताची विचारधारा' यावर प्रकाश रोकडे यांची मुलाखत झाली.

*** मराठी चित्रपटांची चलती**

जानेवारीत प्रदर्शित झालेल्या मराठीतील नटरंग, झेंडा वगैरे चित्रपटांच्या निर्मितीसाठी प्रत्येकी दीड ते दोन कोटी रुपये खर्च झाला. त्याच्याबरोबर प्रसिद्धीसाठी प्रत्येकी सुमारे पन्नास टक्के खर्च झाला. हिंदी चित्रपटांच्या तुलनेत हे बजेट कमी असले तरी मराठीत आलेला हा नवा ट्रेंड मराठी चित्रपटसृष्टीच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. कारण यापुढील काळातही आता बिग बजेटचे मराठी चित्रपट तयार होत आहेत.

नटरंग, शिक्षणाच्या आयचा घो, झेंडा, हरिश्चंद्राची फॅक्टरी हे चित्रपट वेगवेगळ्या कारणांमुळे गाजत आहेत. नव्या हिंदी चित्रपटांचे प्रदर्शन होत असतानाही मराठी चित्रपट कधी नव्हे एवढ्या चर्चेत आला आहे. हिंदी चित्रपटनिर्मितीसाठी येणाऱ्या खर्चाच्या ७० ते १०० टक्के अतिरिक्त खर्च चित्रपटाच्या प्रमोशनासाठी केला जातो. मराठी चित्रपटाचा हा खर्च पाच टक्क्यांपेक्षा कमीच असतो. यापूर्वी चांगले चित्रपट निर्माण होऊनही ते लोकांपर्यंत पोचत नव्हते. गेल्या दोन वर्षांपासून मराठीतील ट्रेंड बदलत चालला आहे आणि गेल्या सहा महिन्यांत तर चित्रपटाचे 'प्रमोशन' महत्त्वाचे बनले आहे. मराठीत २००५ पर्यंत वर्षभरात २५ ते ३० चित्रपटांची निर्मिती व्हायची. 'श्वास' झळकला आणि वेगळे पर्व सुरू झाले. त्यानंतर वर्षात ४० ते ४५ चित्रपट तयार होऊ लागले. निर्मितीचा आकडा वाढतच राहिला. गेल्या वर्षी (२००९) मराठीत ७२ चित्रपटांची निर्मिती झाली.

वितरण, मार्केटिंग व प्रसिद्धीसाठी वेगळे तंत्र आणि वेगळे बजेट, असाही ट्रेंड सुरू झाला. चित्रपट वितरणासाठी मोठ्या शहरांसह राज्याच्या सर्व भागांत एकाच वेळी प्रदर्शनाचे प्रयत्न झाले. दूरचित्रवाणीवरील 'प्रोमों'नी चित्रपटाविषयी प्रेक्षकांची उत्सुकता वाढवली. मालिकांमुळे घराघरांत परिचित झालेले चेहरे 'प्रोमो'त दिसू

लागले. चित्रपटातील कलावंतांच्या विविध आस्थापनांना भेटी, रिॲलिटी शोसारख्या कार्यक्रमांतील सहभाग यांमुळे चित्रपट लोकांपर्यंत पोचण्याचे नवे तंत्र अवलंबले गेले. ''प्रमोशन आणि आशय या दोन्ही गोष्टींचा समन्वय साधल्यानेच मराठी चित्रपट यश मिळवत आहेत,'' असे प्रमुख वितरक सादिक चितळीकर यांनी सांगितले. ''आशय पूर्वीही असायचा, पण तो लोकांपर्यंत पोचत नसे. प्रमाण कमी-जास्त असेल; पण आता आशयाबाबतीत समृद्धता आली आहे. वेगवेगळ्या विषयांची मांडणी अधिक चांगल्या पद्धतीने देण्याचा प्रयत्न होतच आहे. चांगले निर्मितीमूल्य असल्याने आणि कला मूल्यांकनाच्या दृष्टीने प्रेक्षकांनाही हवे ते आणि आनंद देणारे मिळू लागले आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले. लेखक, दिग्दर्शक तरुण; त्यामुळे हाताळले जाणारे विषय तरुणांशी निगडित, हा महत्त्वाचा बदल जाणवू लागला आहे. तंत्रज्ञानाच्या दृष्टीनेही सजगता आली आहे. शहरी व ग्रामीण प्रेक्षकांना रुचतील अशा कथा-पटकथा, माध्यमांमुळे ओळखीचे झालेले कलावंतांचे चेहरे, मल्टीप्लेक्स प्रेक्षकांना डोळ्यांसमोर ठेवून केलेली मांडणी, जाहिरातीसाठी दिलेले लक्ष यामुळे प्रेक्षकांना काबीज करण्याचे उद्दिष्ट साध्य झाले आहे.

*** फिल्म डिव्हिजनचे लघुपट**

गायन, वादन, चित्रकला, नृत्य, चित्रपट, साहित्य, राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्वाविषयीचा दृक्-श्राव्य स्वरूपातील दस्तावेज आता सर्वसामान्यांनाही उपलब्ध होणार आहे.

'फिल्म डिव्हिजन'च्या वतीने गेल्या साठ वर्षांत तयार करण्यात आलेले दिग्गजांविषयीचे माहितीपट, लघुपट डीव्हीडी आणि व्हिडिओ सीडींच्या रूपात पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या (एनएफएआय) ग्रंथालयात मिळू शकतील. 'फिल्म डिव्हिजन'ची स्थापना स्वातंत्र्यप्राप्तीच्या वर्षातच करण्यात आली होती तेव्हापासून आजपर्यंतच्या काळात विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि देशातील महत्त्वपूर्ण घटना, यांचे दृक्-श्राव्य स्वरूपातील जतनीकरण 'फिल्म डिव्हिजन'तर्फे करण्यात आले आहे. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाकडे ४७७ डीव्हीडी आणि ३५८ व्हीसीडी उपलब्ध आहेत. डीव्हीडी ३३८ रुपये, तर व्हीसीडी १०२ रुपयांना उपलब्ध आहेत, अशी माहिती संग्रहालयाचे संचालक विजय जाधव यांनी दिली.

''स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित फिल्म्स अतिशय दुर्मिळ असून त्यात मिठाचा सत्याग्रह, चले जाव चळवळ, फाळणी, जालियनवाला बाग हत्याकांड यांचा समावेश आहे. 'इंडियन सिनेमा' या विभागात चित्रपटांसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कलाकारांवरील लघुपट आहेत. 'भारतीय चित्रकला' या विभागात अमृता शेरगिल, टागोर यांच्यासह 'समकालीन भारतीय चित्रकला', 'इनर आय', 'मधुबनी

पेंटिंग', 'पोर्ट्रेट ऑफ पेंटर' आणि 'पेंटर ऑफ अवर टाइम' या माहितीपटांचा समावेश आहे. 'भारतीय नृत्य' विभागात देशाच्या विविध भागांतील प्रादेशिक नृत्यशैलींचा वेध घेणारे माहितीपट आहेत. 'बायोग्राफीज'मध्ये लोकमान्य टिळकांसह डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, पु.ल. देशपांडे आदींचा समावेश आहे.''

भारतीय संगीत, नृत्य, चित्रपट या विषयांशी संबंधित लघुपट, माहितीपटामुळे गेल्या साठ वर्षांतील सांस्कृतिक संचितच आधुनिक पिढीला उपलब्ध झाले आहे.

*** 'मोगरा फुलला'चे प्रकाशन**

''माणसातील माणूसपण जपण्याबरोबरच त्याचे जगणे सुसह्य करण्याचा प्रयत्न 'मोगरा फुलला' या पुस्तकाच्या लेखनातून जाणवतो. कथांच्या माध्यमातून चांगली मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे,'' असे मत 'सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांनी मारुती यादव यांच्या 'मोगरा फुलला' या कथासंग्रहाचे प्रकाशन करताना व्यक्त केले. डॉ. प्र. ल. गावडे अध्यक्षस्थानी होते. पाध्ये म्हणाले, ''कथांच्या माध्यमातून अनेक चांगली मूल्ये सांगण्याचा प्रयत्न झाला आहे. यादव यांचे लेखन प्रवाही आणि वाचकाला विश्वासात घेऊन काही नवे सांगणारे आहे.'' डॉ. गावडे म्हणाले, ''समाजातील विविध विषयांची मांडणी यादव यांनी केली आहे. सामाजिक बांधिलकीबरोबरच माणुसकीची शिकवण देणाऱ्या कथा या पुस्तकात आहेत.'' अनुराधा यादव व मारुती यादव यांनी मनोगत व्यक्त केले.

*** 'नर्मदे हर हर' - दहावी आवृत्ती**

''जीवनामध्ये व्यवहाराचं भान असावं लागतं. अध्यात्मात भान हरपावं लागतं. भान हरपलं तरच ध्यान होईल. अध्यात्म म्हणजे मनाचा विकास आहे. साधना करण्यासाठी 'युनिफॉर्म' नाही,'' अशी भावना लेखक जगन्नाथ कुंटे उर्फ स्वामी अवधूतानंद यांनी व्यक्त केली.

प्राजक्त प्रकाशनतर्फे कुंटे यांनी लिहिलेल्या 'नर्मदे हर हर' या पुस्तकाच्या दहाव्या आवृत्तीचे प्रकाशन प्रसिद्ध सर्जन डॉ. व्ही. पी. गोखले यांच्या हस्ते झाले. राज्य माहिती आयुक्त विजय कुवळेकर अध्यक्षस्थानी होते.

कुंटे म्हणाले, ''मी काही केले नाही. साऱ्या गोष्टी सद्‌गुरूने करवून घेतल्या. ज्याला आपण गुरू मानतो त्याचे चारित्र्य स्वच्छ आणि मनात वैराग्याची भावना असली पाहिजे. गुरू द्यायला बसला आहे, घ्यायला नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. देव आहे हे मनानेच मानायचे; तर साधनेत आपणच आपल्याला पाहू लागतो. मानलात तर देव आहे. भावामुळे देव प्रकट होतो आणि त्यासाठी देव उपयोगी पडतो.''

कुवळेकर म्हणाले, ''अनुभव, अनुभूती आणि आनंद देण्याची ताकद असलेले

हे पुस्तक म्हणजे जीवनाचा, देवाचा, माणसाचा आणि स्वत:चा शोध घेणारी शोधयात्रा आहे.''

वैभवी शेटे यांनी नर्मदाष्टक सादर केले. प्रकाशक जालंदर चांदगुडे यांनी प्रास्ताविक केले.

### * 'मिस्टिकल, मॅजिकल महाराष्ट्र'चे प्रकाशन

'महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरणाऱ्या मिलिंदचे महाराष्ट्रावर असलेले प्रेम त्याच्या भटकंतीतून जसे जाणवते तसेच ते त्याच्या लिखाणातूनही जाणवते. महाराष्ट्रातील ठिकाणांविषयी जीव ओतून आणि अगदी मनापासून तो लिहितो हेच त्याच्या पुस्तकांना मिळणाऱ्या यशाचे रहस्य आहे,' असे शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी 'मिस्टिकल, मॅजिकल महाराष्ट्र' या मिलिंद गुणाजींच्या नव्या पुस्तकाचे प्रकाशन समारंभात सांगितले.

पॉप्युलर प्रकाशनातर्फे 'मिस्टिकल मॅजिकल महाराष्ट्र' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ वांद्र्याच्या क्रॉसवर्ड येथे पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे प्रमुख पाहुणे म्हणून तर अभिनेता जॅकी श्रॉफ विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. 'महाराष्ट्रभर भटकंती करून मिलिंदने ज्ञानाचा, अनुभवांचा जो खजिना जमा केला आहे, तो सगळा या पुस्तकाच्या माध्यमातून त्याने लोकांसमोर रिता केला आहे. जीव ओतून लिहिणे हे मिलिंदच्या लिखाणाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. 'माझी मुलुखगिरी', 'चंदेरी भटकंती', 'भटकंती', 'गूढरम्य महाराष्ट्र' ही मराठी पुस्तके प्रसिद्ध केल्यानंतर 'मिस्टिकल मॅजिकल महाराष्ट्र' हे पुस्तक इंग्रजीत लिहिल्यामुळे आता परदेशातील लोकांनाही महाराष्ट्र कळेल असा विश्वास ठाकरे यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रातील अनेक ठिकाणे आजही श्रद्धा-अंधश्रद्धा, नैसर्गिक चमत्कार, रहस्य आणि दंतकथा अशा वैशिष्ट्यांमुळे प्रसिद्ध आहेत. अशा ठिकाणांची ओळख या पुस्तकातून करून दिली आहे असे लेखक मिलिंद गुणाजीने सांगितले. 'ऑफ बीट ट्रॅक इन महाराष्ट्र' या पुस्तकाची अल्पावधीतच तिसरी आवृत्ती निघाली आहे. 'माहिती नसलेला महाराष्ट्र या पुस्तकामुळे लोकांना माहिती होईल' असे सांगून जॅकी श्रॉफने 'हे पुस्तक वाचा आणि प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणी जाऊन या' अशी सूचना केली.

### * 'कहाणी मानवप्राण्याची' पुस्तकाचे प्रकाशन

मानवाच्या उत्क्रांतीची माहिती सांगणाऱ्या नंदा खरे लिखित 'कहाणी मानवप्राण्याची' या मनोविकासच्या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते झाले.

ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर या वेळी म्हणाले, ''एखाद्या राष्ट्राने केलेले प्रदूषण सर्वांसाठी हानिकारक असल्याने, पर्यावरणाची चर्चा केवळ राष्ट्रीय पातळीवर होता कामा नये. आपल्या देशात कमी कार्बन उत्सर्जन होते त्यामुळे प्रदूषणकारी देशांच्या

तुलनेत आपल्याला सूट मिळावी, असे धोरण अवलंबिणे चुकीचे असून, प्रदूषण कमी करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर आपण काय केले, याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. जगाची लोकसंख्या २०५० मध्ये नऊ अब्ज असेल असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. वेळीच पावले उचलली नाहीत अन्न व पाणीटंचाईला सोमोरे जावे लागेल. भविष्यातील युद्धाची कारणे ही पाण्याच्या अर्थकारणाभोवती असतील.''

*** अण्णा भाऊ साठेंच्या जीवनावर चित्रपट**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावर मराठी चित्रपटाची निर्मिती के. एस. फिल्म क्रिएटिव्ह प्रॉडक्शन या संस्थेतर्फे केली जाणार आहे असे चित्रपट निर्माते सुरेश नारायण खुडे यांनी सांगितले.

अण्णा भाऊंच्या जीवनातील संघर्षमय प्रवास तरुणांना प्रोत्साहन देणारा ठरेल. अण्णा भाऊ साठे यांनी वयाच्या १६व्या वर्षी १० ते १५ पोवाडे रचले तसेच कथा-कादंबऱ्या लिहिण्यास सुरुवात केली. मुंबईला जाण्यासाठी पैसे नसताना ते कुटुंबासह मुंबईला पायी गेले. काही काळ त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागले. मुंबईतील गिरणी कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी त्यांनी मोर्चे काढले. त्यातून अण्णा भाऊंचा रशिया प्रवासही झाला. या चित्रपटास आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. संपर्क ९२२६२५२७१९.

*** विहीर - बर्लिन महोत्सवासाठी निवड**

राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये बाजी मारणाऱ्या मराठी चित्रपटांच्या शिरपेचात आता आणखी एक मानाचा तुरा खोवला जाणार आहे. 'एबी कॉर्प'ची निर्मिती आणि उमेश कुलकर्णी यांचे दिग्दर्शन असलेल्या 'विहीर' चित्रपटाची बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवड झालेली आहे. ३५ वर्षांपूर्वी जब्बार पटेल दिग्दर्शित 'सामना' चित्रपटाला हा बहुमान मिळाला होत. बर्लिन महोत्सवाआधी होणाऱ्या रॉटरडॅम महोत्सवासाठी 'विहीर'चे पटकथा लेखक व अभिनेते गिरीश कुलकर्णी यांच्यासमवेत श्री. कुलकर्णी ता. २६ जानेवारीला गेले होते. बर्लिन महोत्सवात १४ ते १७ फेब्रुवारी दरम्यान सलग चार दिवस हा चित्रपट दाखविला गेला. यापैकी पहिल्या 'शो'ला 'रेड कार्पेट'चा मान मिळाला. या 'शो'ला 'एबी कॉर्प'च्या जया बच्चन, उमेश कुलकर्णी, गिरीश कुलकर्णी, डॉ. मोहन आगाशे, श्रीकांत यादव, मदन देवधर, आलोक राजवाडे, शार्वी कुलकर्णी, पर्ण पेठे उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात एखाद्या चित्रपटाचा एवढा मोठा संच आमंत्रित केला जाण्याची ही पहिलीच वेळ आहे.

'विहीर'बद्दल उमेश कुलकर्णी म्हणाले, ''बर्लिन आणि कान महोत्सव हे प्रतिष्ठेचे महोत्सव मानले जातात. या महोत्सवाची निवडप्रक्रिया बराच काळ चालते.

पुसान, मामी, एशियन, केरळ, पीफ आदी चित्रपट महोत्सवांमध्ये ‘विहीर’चा यापूर्वीच गौरव झाला आहे. या चित्रपटाचे कथानक गेल्या १० वर्षांपासून माझ्या मनात घोळत होते. ते मी आता पडद्यावर उतरवले आहे. पौगंडावस्थेत गेलेल्या, तसेच सध्या जाणाऱ्या प्रत्येकाला हा चित्रपट आपला वाटेल. ‘वळू’प्रमाणेच याही चित्रपटात काही वेगळे प्रयोग केले गेले आहेत. चित्रपट माध्यमात सगळ्याच गोष्टी संवादातून सांगायच्या नसतात. अशा प्रकारच्या वेगळ्या चित्रअनुभवासाठी विदेशातील चोखंदळ प्रेक्षकवर्ग सक्षम असतो.’’

*** देवदासी, जोगत्यांचे जीवन : जोगवा**

‘जोगवा’ चित्रपटाच्या निमित्ताने देवदासींचे, जोगत्यांचे हलाखीचे जीवन पडद्यावर आले आहे. आज राज्यात हजारो जोगते व देवदासी बेघर, विपन्नावस्थेत जीवन जगत आहेत. त्यांना घरे देण्याबरोबरच त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, असे मत ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांनी व्यक्त केले.

गवस यांच्या ‘चौंडकं’ व ‘भंडारभोग’ या कादंबऱ्यांवर आधारित ‘जोगवा’ या चित्रपटाला पाच राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यामुळे यातील कलावंतांचे सध्या सर्वत्र कौतुक होत आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा, जत या भागांत बेघर अवस्थेत राहणाऱ्या हजारो देवदासी- जोगत्यांनाही घरे द्यायला हवीत. पडद्यावरील चित्रण पाहून लोक भावूक होतात. त्याचप्रमाणे रोज जगतानाही समाजाने त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहावे. ‘‘देवदासी प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी होण्याबाबत शासनाप्रमाणे सर्वच राजकीय पक्षांनी ठोस पावले उचलायला हवीत. शासनाने त्यांच्यासाठी आयोग नेमला. मात्र, १९७५ पासून आतापर्यंत सरकारला त्यांची गणनाही पूर्ण करता आलेली नाही. त्यांच्यासाठी असलेल्या पेन्शन योजनेचा लाभ खोटी नावे लावून दुसरेच लोक घेतात. हे थांबविण्याची गरज आहे. ‘जोगवा’मुळे या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्यास शासन, राजकीय पक्ष, कार्यकर्ते यांना प्रवृत्त केले आहे हे या चित्रपटाचे यश आहे.’’

*** डॉ. संजीव शेंडे यांचा सत्कार**

‘‘आईने संगीताचे आणि वडिलांनी साहित्याचे संस्कार दिल्यामुळे माझी कारकीर्द बहराला आली. अजूनही मला ‘टप्पा’ शिकायचा आहे. संगीताच्या दृष्टीने माझी ओंजळ भरतच आहे. जोपर्यंत श्वास आहे तोपर्यंत संगीताचा शोध सुरूच राहील,’’ अशी भावना प्रसिद्ध गायक डॉ. संजीव शेंडे यांनी व्यक्त केली. ‘शब्द व सूर यांचे मिलन म्हणजे गाणे. त्यामुळे सूर पक्का लागलाच पाहिजे आणि शब्ददेखील वजनात आला पाहिजे.’

‘एस. एच. एंटरप्रायझेस’तर्फे डॉ. शेंडे यांचा षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त सत्कार करण्यात

आला. 'फाउंटन म्युझिक कपंनी'तर्फे डॉ. शेंडे यांनी स्वरबद्ध केलेल्या आणि बेला शेंडे यांनी गायलेल्या मराठी भावगीतांच्या 'अर्पण' या अल्बमचे प्रकाशन प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले यांच्या हस्ते झाले. मेधा शेंडे आणि 'फाउंटन'चे कांतिभाई ओसवाल या वेळी उपस्थित होते. या अल्बममधील काही रचना बेला शेंडे यांनी सादर केल्या.

शेंडे म्हणाले, 'एकसष्टीचे आकडे उलटे केले, तर मी सोळा वर्षांचा होईल. गुरूंकडे जाऊन दादरा, ठुमरी, गजल असे नवनवे प्रकार शिकेन. जीवनात 'फ्लॅशबॅक' फक्त कल्पनेतच येतो. संगीत रंगभूमीवरील गायक-अभिनेत्री कुसुम शेंडे ही माझी आई असल्याने तिने केवळ तालीमच दिली नाही, तर संगीताकडे पाहण्याची सूक्ष्म दृष्टी दिली. वडील डॉ. जी. वाय. शेंडे यांनी साहित्याची गोडी लावली. शोभा गुर्टू यांच्या गायकीच्या प्रेमात पडून त्यांच्याकडे शिकू लागलो. गाण्याचे मोती वेचणे सुरूच आहे. अजूनही मला टप्पा नीटपणाने गाता येत नाही. मालिनीताई राजूरकर यांना 'तुम्ही मला टप्पा शिकवाल का,' असे विचारायचे आहे. गाण्याच्या वेलीवर सावली आणि बेला ही फुले उमलली. त्यांनी बुद्धिमत्ता आणि मेहनतीच्या जोरावर स्वत:चे स्थान निर्माण केले. मी शिकविले हे खरे असले, तरी माझा खारीचा वाटा आहे.''

पाध्ये म्हणाले, ''संगीत ही कला केवळ आनंद देत नाही, तर माणसाला समृद्ध करते.''

बेला शेंडे म्हणाल्या, ''वडील आणि गुरू ही बाबांची दोन्ही रूपे मला भावतात. 'गाणे ही पहिली कला आणि नंतर व्यवसाय' ही त्यांची शिकवण माझ्या कायमच स्मरणात आहे.''

*** विज्ञानकथेला संमेलनात स्थान नाही म्हणून डॉ. नारळीकरांची तक्रार**

''कोवळ्या मुलांच्या आत्महत्या टाळण्यासाठी परीक्षेला असलेले अवास्तव महत्त्व कमी करायला हवे,'' असे ज्येष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांनी मौज प्रकाशन व प्रबोधन (गोरेगाव) तर्फे आयोजित 'चार दिवस मौजेचे' या कार्यक्रमात सांगितले. जयंत एरंडे आणि लेखिका मेघश्री दळवी यांनी त्यांची मुलाखत घेतली.

विज्ञान कथेला साहित्य संमेलनात साहित्यप्रकार म्हणून प्रवेश मिळाला नाही, अशी खंत व्यक्त केली.

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाला यश हवे असते. ते मिळाले नाही तर तो अपमान वाटतो. या भावनांचा अतिरेक झाला की मनाचे संतुलन ढळते. हे टाळण्यासाठी ही भावना कमी कशी होईल हे पाहायला हवे. हल्ली परीक्षेतील गुणांना महत्त्व आले आहे. हे महत्त्व कमी करायला हवे. पूर्वी केंब्रिज विद्यापीठातही

रॅंग्लर या पदवीला ग्रेडस् होत्या; मात्र ही स्पर्धा चुकीच्या वळणावर जात असल्याचे जाणवल्यावर या ग्रेडस् १९०९ मध्ये बंद करण्यात आल्या, असेही नारळीकर यांनी स्पष्ट केले.

प्रत्येक वैज्ञानिकाने आपल्या हिमतीवर अडचणींना तोंड द्यावे. पंतप्रधान दर वर्षी वैज्ञानिक परिषदेत बोलतात; मात्र नंतर त्यांची विधाने थंड होतात. त्यामुळे पंतप्रधानांच्या भाषणातून कोणी फार अपेक्षा ठेवू नयेत. 'आयुका' या संस्थेची परदेशातही चांगली दखल घेतली जाते. संस्थेला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली असून, आता 'आयुका'ची गणना जगातील श्रेष्ठतम संस्थांमध्ये होत आहे, असे सांगून नारळीकर यांनी संस्थेच्या भविष्यातील प्रकल्पांचीही माहिती दिली. पृथ्वीपासून ४० किलोमीटर उंच वातावरणात सापडलेले बॅक्टेरिया सूर्याच्या अतिनील किरणांना दाद देत नाहीत, असे आढळले आहे. हे बॅक्टेरिया पृथ्वीवरचेच आहेत की परग्रहावरून आले आहेत, ते तपासायचे आहे. कारण पृथ्वीवरून एवढ्या उंच बॅक्टेरिया जाणे कठीण वाटते, असेही त्यांनी दाखवून दिले. भारतात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण चिंताजनकरीत्या कमी होत असून त्यावर, 'पुत्रवती भव' हे पुस्तक आपण लवकरच लिहिणार आहे असे ते म्हणाले.

*** दोन अब्ज डॉलर कमाईचा नवा 'अवतार'**

जगभरातील सिनेरसिकांना भुरळ घातलेल्या जेम्स कॅमेरून दिग्दर्शित 'अवतार' या हॉलिवूडच्या चित्रपटाने कमाईचा धडाका सुरूच ठेवला आहे. रविवार दि. ३१ जानेवारी अखेर या चित्रपटाने विक्रमी दोन अब्ज डॉलरचा गल्ला गोळा केला आहे. प्रदर्शित झाल्यापासून सलग सात आठवडे हा चित्रपट हिट चित्रपटांच्या यादीत अव्वल स्थानावर टिकून असल्याचे चित्रपटाचे वितरक ट्वेन्टीथ सेंच्युरी फॉक्स ने म्हटले आहे.

'अवतार'ने जेम्स कॅमेरून यांनीच दिग्दर्शित केलेल्या 'टायटॅनिक' (१९९८) चित्रपटाचा १.८४३ अब्ज डॉलर्स कमाईचा विक्रम मोडीत काढला. १२० देशांत हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला आहे. चित्रपटाला तांत्रिक गटासह आठ नामांकने ऑस्करसाठी मिळाली. कॅमेरून यांची पूर्वपत्नी कॅथरिन बिग्लो हिने दिग्दर्शित केलेल्या 'द हर्ट लॉकर' या युद्धपटाशी 'अवतार'ची स्पर्धा आहे. कॅमेरून यांच्या 'टायटॅनिक'ला १४ मानांकने मिळाली होती. उत्कृष्ट चित्रपट व दिग्दर्शनासह ११ ऑस्कर या चित्रपटाने मिळवले होते.

*** आपत्ती व्यवस्थापन**

''देशासमोर नैसर्गिक आपत्ती किंवा दहशतवादी हल्ल्याच्या रूपाने संकट निर्माण झाल्यास मदत सेवा देताना सैन्यदलांनी माध्यमांना विश्वासात घेऊन माहिती

पुरविल्यास घटनेच्या वार्तांकनात त्रुटी राहणार नाहीत; मात्र सैन्यदलांसह सरकारकडेही अशी यंत्रणा नसल्याचेच गेल्या काही वर्षांतील आपत्कालीन घटनांवरून स्पष्ट होते,'' असे मत एनडीव्ही वाहिनीचे संरक्षण-सामरिकविषयक संपादक नितीन गोखले यांनी व्यक्त केले.

'लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालया'तर्फे (सीएमई) 'रासायनिक, जैविक, किरणोत्सर्गी आणि आण्विक (सीबीआरएन) आपत्ती व्यवस्थापन' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद झाली. 'सीबीआरएन' आपत्ती व्यवस्थापन आणि पूर्वतयारीत माध्यमे आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिका' या चर्चासत्रात माजी लष्कर प्रमुख लेफ्टनंट जनरल (निवृत्त) नोल थंबूराज, मेजर जनरल (निवृत्त) एस सी एन जठार, 'द इंडियन एक्स्प्रेस' वृत्तपत्राचे निवासी संपादक विनोद मॅथ्यू, 'द टाइम्स ऑफ इंडिया'चे निवासी संपादक जॉय पुरकायथा यांनी भाग घेतला.

गोखले म्हणाले, 'सीबीआरएन'बाबत जनजागृती करण्यात माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. आपत्कालीन प्रसंगात माध्यमांना टाळण्यापेक्षा योग्य माहिती पुरविल्यास चुकीचे वार्तांकन होणार नाही. मुंबईतील दहशतवादी हल्ल्याच्या वेळी वृत्तवाहिन्यांच्या वार्तांकनावर टीका झाली; मात्र हल्ल्याच्या काळात योग्य माहिती न पुरविणारी सरकारी यंत्रणा त्याला जबाबदार आहे.

लेफ्टनंट जनरल (निवृत्त) थंबूराज म्हणाले, ''आपत्ती व्यवस्थापनात समर्थ नेतृत्व महत्त्वाचे ठरते. आपत्कालीन स्थितीला तोंड देण्यासाठी 'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थे'ने (एनडीएमए) इतर मंत्रालयांच्या संपर्कात राहून समन्वयाने काम करावे; तसेच 'एनडीएमएमए'मध्ये सैन्यदलांचे प्रतिनिधित्व होणे आवश्यक आहे.''

### * तुकारामांची गाथा हिंदीत!

संत तुकाराम महाराजांनी सोळाव्या शतकात गाथेच्या रूपाने मांडलेल्या विचारांचा देशभर प्रसार व्हावा म्हणून तुकाराम गाथेचा हिंदी अनुवाद करण्याचा प्रकल्प 'ऐक्यभारती रिसर्च इन्स्टिट्यूट'ने हाती घेतला आहे. तुकारामांच्या ४६९७ अभंगांचा अनुवाद करण्यात येणार आहे.

'ऐक्यभारती रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या संचालिका डॉ. दुर्गा दीक्षित म्हणाल्या, ''हिंदी भाषकांना तुकाराम महाराजांच्या प्रतिभेची, काव्याची ओळख करून देण्यासाठी गाथेतील मूळ अभंग आणि त्यानंतर त्याचा हिंदीत अर्थ देण्यात येईल. तुकाराम गाथेची सरकारने प्रसिद्ध केलेली आवृत्ती आणि प्र. न. जोशी यांचा ग्रंथ यांच्या साह्याने गाथेचे गद्यात्मक रूपांतर केले जाईल.''

''प्रकल्पासाठी मराठी-हिंदी भाषांची जाण असणाऱ्या आणि तुकारामांच्या साहित्याची आवड असणाऱ्या नऊ अभ्यासकांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येकाला ५००

अभंग अनुवादासाठी देण्यात आले आहेत. या वर्षाअखेरीस हा प्रकल्प पूर्ण होईल. हिंदी अनुवाद झाल्यावर थेट इंटरनेटवर टाकला जाईल. इंटरनेटच्या माध्यमातून तो देशासह जगभरातील वाचकांपर्यंत पोचेल.''

*** डायऱ्यांचा खप कमी**

मुंबई, दिल्ली, कोलकत्ता शहरांतून महाराष्ट्रात डायऱ्या विक्रीसाठी येतात. जागतिक मंदीमुळे गेल्या वर्षी ४० टक्के डायऱ्या पडून होत्या. मंदीचा मार बसलेल्या अनेक कंपन्यांनी या वर्षी डायऱ्यांचे उत्पादन कमी केले आहे.

इंटरनेट, आधुनिक मोबाईल, लॅपटॉप यासारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांमुळे अलीकडे अनेकांचा कल महत्त्वाच्या नोंदी 'ऑनलाइन' ठेवण्याकडे आहे. परिणामी एकेकाळी आवश्यक म्हणून आवर्जून विकत घेतल्या जाणाऱ्या डायऱ्यांकडे आता लोकांनी पाठ फिरवली आहे. केवळ भेट देण्यासाठी डायऱ्यांचा उपयोग होऊ लागला आहे.

सध्या इंटरनेट आणि मोबाईलचा जमाना असल्यामुळे, दैनंदिन घडणाऱ्या घटनांची नोंद करून ठेवण्याकरिता 'गूगल कॅलेंडर', 'गूगल टॉक', मोबाईल, ई-डायऱ्यांचा वापर करतात. लॅपटॉपसारखे उपकरण कुठेही नेता येणे शक्य झाल्याने, भरपूर मजकूर साठवून ठेवणे शक्य होते. त्याशिवाय यूएसबी हार्डडिस्क आणि पेनड्राईव्हही आहेत. कार्यालयीन कामकाजातही इंटरनेटचा वापर वाढू लागला आहे. महत्त्वाच्या नोंदी 'ऑनलाइन' असल्यामुळे डायरी सांभाळण्याची पद्धत कालबाह्य होत चालली आहे. आपल्याला योग्य वेळी हव्या असणाऱ्या माहितीचा ई-मेल, एसएमएस मिळत असल्याने डायरी वापरण्याचे प्रयोजनच उरलेले नाही.

मोबाईल, इंटरनेटवर माहिती साठवून ठेवली, की पुन्हा लक्षात ठेवण्याची गरजच उरत नाही. वैयक्तिक वापरासाठी डायरी विकत घेण्याच्या प्रमाणात सध्या घट झाली आहे. विविध कंपन्या डायऱ्या विकत घेऊन कर्मचाऱ्यांना देत असत. परंतु आर्थिक मंदी व 'ऑनलाईन' नोंदीसाठी असलेल्या सोयीमुळे कंपन्यांकडूनही यंदा डायऱ्यांची मागणी कमी झाली आहे.

*** प्रबुद्ध साहित्य परिषदेतर्फे कवी संमेलन**

''प्रबुद्ध साहित्याच्या माध्यमातून आम्ही माणसाची गाणी गातो. अंधारात चाललेल्यांच्या हाती स्वाभिमानाची फुले देतो. जात टाकून येणाऱ्यांचा विचार म्हणजे प्रबुद्ध साहित्य,'' असे विचार प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय प्रबुद्ध साहित्य परिषदेतर्फे सुभेदार रामजी आंबेडकर चर्चासत्रात मच्छिंद्रनाथ देवणीकर यांच्या हस्ते चर्चासत्राचे, तर महापौर मोहनसिंग राजपाल यांच्या हस्ते प्रबुद्ध कवी संमेलनाचे उद्‌घाटन झाले. कीर्तिपाल गायकवाड अध्यक्षस्थानी

होते. कवी. म. भा. चव्हाण म्हणाले, ''निर्भय आणि मोकळा आवाज म्हणजे प्रबुद्ध साहित्य. सजवलेले नव्हे, तर उगवलेले साहित्य म्हणजे प्रबुद्ध साहित्य.''

प्रा. रतनलाल सोनग्रा म्हणाले, ''प्रबुद्ध साहित्य हेच खरे जीवनाला स्पर्श करणारे साहित्य आहे.''

महात्मा फुले जयंतीनिमित्त मुंबई येथे ११ एप्रिल रोजी होणाऱ्या सत्यशोधक विचार संमेलनाच्या अध्यक्षपदी टेक्सास गायकवाड यांची निवड झाल्याची घोषणा कीर्तिपाल गायकवाड यांनी केली.

*** सुहास शिरवळकर : असे आणि तसे**

''रहस्यकथा हासुद्धा साहित्यप्रकारच आहे. त्याकडे हिणकस दृष्टीने न पाहता सन्मान आणि अभ्यासपूर्वक दृष्टीने पाहावे,'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांनी व्यक्त केले.

दिवंगत साहित्यिक सुहास शिरवळकर यांचे साहित्य आणि व्यक्तिमत्त्व यावर आधारित शशिदीप प्रकाशनाच्या 'सुहास शिरवळकर : असे आणि तसे' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले, यावेळी ज्येष्ठ साहित्यिक ह. मो. मराठे, अनिल किणीकर, प्रकाशक शशिकांत खोपकर आणि शिरवळकर यांच्या पत्नी सुगंधा आदी उपस्थित होते. मिरासदार म्हणाले, ''शिरवळकर यांच्यासारख्या वाचकप्रिय साहित्यिकावर रहस्यकथा लेखक म्हणून शिक्का मारला गेला. पण त्यांनी विपुल सामाजिक लेखन केले आहे. त्यांच्यावरील या ग्रंथामुळे या साहित्यप्रकाराकडे अभ्यासपूर्वक आणि सन्मानाने पाहिले जाईल.'' मराठे म्हणाले, ''शिरवळकर यांना मिळालेली प्रसिद्धी ही वाचकांनी त्यांच्यावर केलेल्या निस्सीम प्रेमाची पावती आहे. त्यांचे लेखनच इतके जिवंत आहे की 'सु.शि.' कधीही इतिहासजमा होऊ शकणार नाहीत.''

शिरवळकर यांच्यावर वेबसाइट सुरू करण्यात येईल, आणि त्यांच्या कादंबऱ्यांच्या आवृत्त्याही काढण्यात येतील, असे सुगंधा शिरवळकर यांनी सांगितले. या वेळी सम्राट शिरवळकर, प्रबोध शिरवळकर, गिरीश दाबके आदी उपस्थित होते.

*** मराठी वाङ्मयाचा इतिहास - सातव्या खंडाचा दुसरा भाग**

''आधुनिक शिक्षण व्यवस्थेने मराठी साहित्य तोडून टाकले आहे, विद्यार्थी साहित्यापासून दूर लोटला जात आहे. त्यामुळे शिक्षणाचा एकसूत्री अभ्यासक्रम तोडला पाहिजे,'' अशी सूचना ज्येष्ठ कवी-समीक्षक प्रा. वसंत आबाजी डहाके यांनी केली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ वा भाग २' या ग्रंथाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. या निमित्ताने 'साहित्य अकादमी' पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. डहाके यांचा भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम

यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे, प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य आणि 'फडणीस इन्फ्रास्ट्रक्चर'चे अध्यक्ष विनय फडणीस उपस्थित होते.

प्रा. डहाके म्हणाले, ''मराठी भाषेबद्दल चिंता व्यक्त होत आहे. तिला वाचविण्याची जबाबदारी फक्त कलाशाखेत मराठी विषय घेणाऱ्यांवर टाकली जात आहे. आधुनिक शिक्षणव्यवस्थेने इतर क्षेत्रांपासून मराठी साहित्य तोडून टाकले आहे. साहित्य हे जीवनाचा आधार आहे. त्यापासून प्रेरणा मिळते. विद्यार्थ्यांनी साहित्यापासून दूर जाणे योग्य नाही. विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या जीवघेण्या रेट्यातून सोडविण्यासाठी आणि मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी कविता शिकली पाहिजे.''

''वाङ्मयाचा इतिहास हा संस्कृतीचा इतिहास असतो. केवळ घटनेची नोंद न करता त्यामागचे तत्त्व पाहिले पाहिजे. आतापर्यंत साहित्य हे बेट समजले जाई. इतर कलांशी त्यांचा संबंध नसे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे लेखन करताना याला छेद दिला आहे.''

जाधव म्हणाले, ''इतिहासाची व्यापक दृष्टी असते. त्याचे प्रतिबिंब या खंडात पडले आहे. साहित्य हा मूल्यात्मक आविष्कार असतो. इतिहास केवळ भूतकाळ जाणून घेण्यासाठी नसतो, वर्तमान जगण्यासाठी आणि भविष्याचा वेध घेण्यासाठी असतो.''

### * 'निर्मळ रानवारा'चा रौप्यमहोत्सव

वंचित-विकास संस्थेच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या 'निर्मळ रानवारा' बालमासिकाचा रौप्यमहोत्सव बाल आनंद मेळाव्याच्या उपक्रमाने साजरा करण्यात आला. यानिमित्त आठशेहून अधिक मुलांनी विविध गुणदर्शन सादर केले. चार्टर्ड अकौंटंट विद्याधर भिडे अध्यक्षस्थानी होते.

'निर्मळ रानवारा'च्या वतीने दर वर्षी देण्यात येत असलेला यंदाचा 'कृतज्ञता पुरस्कार' ज्येष्ठ चित्रकार ल. म. कडू यांना प्रदान करण्यात आला. या बाल मासिकात उत्कृष्ट चित्रे काढणाऱ्या व लेखन करणाऱ्या आठ मुलांना 'इंदिरा गोविंद पुरस्कार' डॉ. श्यामला वनारसे आणि सिंधूताई अंबिके यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. विजेत्यांत धनश्री संत, ऋतुजा भावे, गौरी शर्मा, राघव कुलकर्णी, ऐश्वर्या पोतदार, नूपुर देशमुख, आरती येणुरे, अमीर मुल्ला यांचा समावेश होता. संपादिका ज्योती जोशी, संस्थापक विलास चाफेकर, संचालिका सुनीता जोगळेकर, सरोज टोळे यांची या वेळी भाषणे झाली.

### * 'बुकलव्हर्स ग्रुप'मध्ये 'काला पानी' कादंबरीवर चर्चा

नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालयातील बुकलव्हर्स ग्रुप तर्फे गेली २० वर्षे नवनवीन पुस्तकांच्या लेखकांबरोबर चर्चांचे कार्यक्रम होत असतात. लेखकांच्या

परिचयामुळे पुस्तकांबद्दलची आत्मीयता वाढते आणि वाचनाची गोडी लागते, नवे अनुभवविश्व गवसते, अभिरुची चोखंदळ होते असा अनुभव प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर यांनी व्यक्त केला.

जालंदर सोनुने यांच्या कालापानी या अंदमानच्या पार्श्वभूमीवरील कादंबरीवर नुकतीच या ग्रंथप्रेमी गटात चर्चा झाली. नीलिमा वाकरे अध्यक्षस्थानी होत्या. ग्रंथपाल मनोजकुमार ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. आर. पी. शिंदे, अजित वंजारे, पंजक रासकर, देवराज देसाई यांनी कादंबरीवर भाष्य केले. ''अंदमानमध्ये केंद्रीय अधिकारी म्हणून बारा वर्षे कार्यरत असल्याने तेथील जनजीवन जवळून पाहता आले. त्यातून या कादंबरीची निर्मिती झाली,'' असे लेखक जालंदर सोनुने यांनी सांगितले. प्राचार्य एच. व्ही. देवस्थळी यांनी बुकलव्हर्स ग्रुपच्या या उपक्रमाचा गौरव केला.

*** भारतात ३८ कोटी मोबाईल**

डिसेंबर २००९ अखेर भारतातील मोबाइलधारकांची संख्या ३८ कोटींच्या घरात गेली आहे. भारती एअरटेल (३१.२९ टक्के), व्होडाफोन (२४.०६ टक्के), आयडिया (१५.१७ टक्के), बीएसएनएल (१५.०६ टक्के), एअरसेल (८.१७ टक्के) या प्रमुख कंपन्या त्यात अग्रगण्य आहेत. डिसेंबर मध्ये सव्वा कोटी नवे जीएसएम ग्राहक जोडले गेले.

*** छायाचित्र प्रदर्शन**

''शेकडो पाने लिखाण करून जे वास्तव मांडायचे आहे, ते केवळ एका छायाचित्रातून प्रभावीपणे मांडता येते. त्यामुळे निसर्ग छायाचित्रकारांनी एकत्र येऊन या माध्यमाद्वारे वन्यप्राणी-पक्षी संरक्षणाची व्यापक चळवळ सुरू केली पाहिजे,'' असे मत प्रसिद्ध छायाचित्रकार क्लिमेंट फ्रान्सिस यांनी व्यक्त केले.

'किर्लोस्कर' आणि 'क्लब वसुंधरा'तर्फे आयोजित वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये 'सकाळ रिफ्लेक्शन १०' छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन फ्रान्सिस यांच्या हस्ते झाले. 'सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये, 'किर्लोस्कर'चे सल्लागार ई. आर. स्वार, महोत्सवाचे अध्यक्ष विजय वर्मा, संयोजक वीरेंद्र चित्राव, सहसंयोजक अनुज खरे उपस्थित होते.

फ्रान्सिस म्हणाले, ''मानवी विकासामुळे निसर्गाचा समतोल सांभाळणारे वन्यपशू-पक्षी संकटात आले आहेत. जंगलातील वृक्षतोड, अतिक्रमणामुळे या जिवांचे नैसर्गिक अधिवास नष्ट झाले आहेत. अजूनही वेळ गेलेला नाही, छायाचित्रकारांनी एकत्र येऊन निसर्गाचे वास्तववादी चित्रण समाजासमोर मांडले पाहिजे.''

पाध्ये म्हणाले, ''समाजामध्ये घडणाऱ्या घटना वर्तमानपत्रांतून मांडण्याबरोबरच समाजाच्या सांस्कृतिक उन्नयनासाठी 'सकाळ' नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे.

छायाचित्र प्रदर्शन हा यातील एक महत्त्वपूर्ण भाग असून, समाजाला कवेत घेणारी ही कला आहे. या कलेचे महत्त्व आणि बारकाव्यांविषयी जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.''

*** 'द हाऊस ऑन मॉल रोड'चे प्रदर्शन**

'पेंग्विन बुक्स इंडिया'तर्फे नवोदित कादंबरीकार मोह्यना श्रीनिवासन लिखित 'द हाऊस ऑन मॉल रोड' या कादंबरीचे प्रकाशन दिव्या सेठ यांच्या हस्ते झाले. श्रीनिवासन म्हणाल्या, ''अंबालातील लष्करी वसाहतीमधील घरात बालपण घालविलेल्या पार्वतीला आपल्या या घरी परत आल्यावर पुन्हा नव्याने गवसलेला भूतकाळ आणि स्वत:ची सापडलेली नवी ओळख, हे या कादंबरीचे कथासूत्र आहे.''

*** चंद्रमोहन कुलकर्णी यांचे 'रेखांतरित' प्रदर्शन**

'कलासक्त पुणे' आणि 'एसएनडीटी विद्यापीठाचा मराठी पदव्युत्तर विभाग' यांच्यातर्फे प्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांच्या कुंचल्यातून साकारलेल्या जागतिक साहित्यातील २१ व्यक्तिचित्रांचे 'रेखांतरित' हे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

चेकॉव्ह, टॉलस्टॉय, काफ्का, ब्रेइतप्त, ग्युंथर ग्रास हे जगप्रसिद्ध लेखक कसे दिसत असतील, त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे असेल, ही वाचकांची उत्सुकता कुलकर्णी यांच्या कुंचल्यातून साकारली आहे, 'केल्याने भाषांतर' भाषांतरित साहित्याला वाहिलेल्या त्रैमासिकाचा हा उपक्रम होता.

१९ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध अभिनेत्री इला भाटे यांनी भाषांतरित कथांचे अभिवाचन केले. मूळ संगीत तेच ठेवून गीतांचे शब्द मराठीत, हे वैशिष्ट्य असणारी स्पॅनिश आणि जपानी गाणी प्रदीप फाटक, जसराज जोशी, प्रियल साठे, सौरभ भालेराव, अभय इंगळे या युवा कलाकारांनी सादर केली. गौरी लागू, प्रदीप फाटक, उज्ज्वला बर्वे यांनी जर्मन, स्पॅनिश आणि रशियन कथांचे अभिवाचन केले. सुनंदा महाजन, अनघा भट आणि रेखा इनामदार-साने यांनी प्रदर्शनाचे आयोजन केले. 'अक्षरधारा'तर्फे भाषांतरित पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. इंडिया आर्ट गॅलरी या प्रदर्शनाची ऑनलाइन पार्टनर असून www.indiaart.com या संकेतस्थळावर प्रदर्शनाची माहिती दिली आहे.

*** हेमा लेले यांच्या संकेतस्थळाचे उद्‌घाटन**

''माणसाने माणसे जोडली पाहिजे आणि त्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा चांगला वापर करून घेतला पाहिजे. हे सर्व करताना आपल्या सर्जनशीलतेवर कुठेही तंत्रज्ञानाची मात होता कामा नये,'' असे मत लेखक अनिल अवचट यांनी कवयित्री

हेमा लेले यांच्या संकेतस्थळाच्या उद्घाटनप्रसंगी मांडले.

या वेळी कवयित्री हेमा लेले, डॉ. वि. भा. देशपांडे, सुनील महाजन आणि मधुरा कुलकर्णी उपस्थित होते. अनिल अवचट यांच्या हस्ते शाल, स्मृतिचिन्ह देऊन हेमा लेले यांचा सत्कार करण्यात आला.

अवचट म्हणाले, ''भारतात कॉम्प्युटरचा उपयोग कमी होतो. आपल्याकडील तज्ज्ञ मंडळींचा परदेशातील काम करण्यातच वेळ निघून जातो. आपल्याकडे संगणकाचा वापर केवळ ई तिकीट, माहिती मिळविणे एवढाच न होता तो अधिक वाढविला पाहिजे. कारण या तंत्रज्ञानात केवळ 'डेबल क्लिक'ने ज्ञानाचा खजिना खुला होतो. त्याचा पुरेपूर वापर करून घेतला पाहिजे. मात्र, हे तंत्रज्ञान आपले मालक होता कामा नये, कारण माणसे ही गुणांनीच टिकून राहतात. तंत्रज्ञानाचा चांगल्या कामासाठी वापर करून घ्यायला पाहिजे.''

वि. भा. देशपांडे म्हणाले, ''हेमा लेले यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू असून, ते लोकांपर्यंत पोचले पाहिजे. त्यासाठी तंत्रज्ञानाची जोड आवश्यकच आहे.''

शंकर सारडा, आसावरी काकडे प्रभृतींनीही हेमा लेले यांची गुणवैशिष्ट्ये सांगितली. संकेतस्थळाच्या उद्घाटनानंतर हेमा लेले म्हणाल्या, ''माझा पहिला कवितासंग्रह 'वेगळं आभाळ' हा प्रकाशित झाला, त्याला आज ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. साहित्याच्या क्षेत्रात आणि इतरही क्षेत्रात अनेक पुरस्कार मला मिळाले. मात्र, ही माहिती इथल्या माणसांपर्यंतच नव्हे, तर साता समुद्रापार पोचावी म्हणून हा संकेतस्थळाचा प्रपंच मांडला.'' निकिता मोघे यांनी आभार मानले, तर नीरजा आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

*** आठवे स्त्री साहित्य-कला संमेलन**

पिंपरी-चिंचवड स्वानंद महिला संस्था व भारतीय जैन संघटनेच्या महिला विभागाने आयोजित केलेले आठवे स्त्री साहित्य-कला संमेलन तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात संपन्न झाले. 'स्वानंद भरारी' पुस्काराचे वितरण उद्योजिका प्रमिला सांकला व वरळी दूरदर्शन केंद्राचे उपसंचालक भगवान इंगळे यांच्या हस्ते झाले.

पुरस्कारार्थींमध्ये सुशीला छाजेड, विमला पाटील, सुशीला मुथा, अंजली खामितकर, वर्षा टाटिया, शुभांगी शिंदे, सुनीता लुणावत, नीला कुपस्थ, आरती कांकरिया, शोभा बंब, लता पगारिया, मदनबाई लोढा, अनिता डबीर, नलिनी धबडगावकर, सुजाता शहा, शोभा भागवत यांचा समावेश होता.

ज्येष्ठ कवी डॉ. विठ्ठल वाघ व लावणी कलाकार शकुंतला नगरकर यांची मुलाखत कवी उद्धव कानडे यांनी घेतली. श्री. वाघ म्हणाले, ''पुरस्कार माणसाच्या

जीवनात महत्त्वाचा नाही. कलेची उपासना महत्त्वाची आहे.'' शकुंतला नगरकर यांनीही काही लावण्या सादर केल्या.

कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नलिनी जोशी होत्या. कविसंमेलनात प्रा. सुरेखा कटारिया, मन्मथ बिल्लोरे, सरला मुनोत, कुमार खोंद्रे, मीना शिंदे, प्रियांका लुणावत यांनी भाग घेतला. या वेळी चंद्रकला बाविस्कर यांच्या 'अस्वस्थ' या चारोळी पुस्तकाचे प्रकाशन झाले. भक्ती सवाने व सुजाता पालांडे यांनी सूत्रसंचालन केले.

*** नक्षत्र महाकाव्य संमेलन**

पिंपरी-चिंचवड महापालिका आणि नक्षत्राचं देणं काव्यमंच यांच्या वतीने ता. १९ ते २१ फेब्रुवारी दरम्यान, चिंचवडमध्ये अखिल भारतीय मराठी नक्षत्र महाकाव्य संमेलनाचे आयोजन केले होते. मंचचे संस्थापक राजेंद्र सोनवणे हे आहेत. अध्यक्षपद महाराष्ट्रभूषण ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांनी भूषविले. विविध परिसंवादांमध्ये ज्येष्ठ कवी, साहित्यिक आणि विचारवंत सहभागी झाले होते.राज्य आणि राज्याबाहेरील बरेच कवी सहभागी झाले होते. दिवस-रात्र तब्बल ६० तास चालणाऱ्या काव्यसंमेलनाची नोंद लिम्का बुकमध्ये करण्यात यावी असा प्रयत्न आहे. उद्योजक कृष्णकुमार गोयल स्वागताध्यक्ष होते.

*** 'तायप्पा' हा ड्रीम रोल**

'जोगवा' चित्रपटातील 'तायप्पा' हा माझा 'ड्रीम रोल' ठरला. या भूमिकेत अभिनेता म्हणून माझा कस लागला; पण मी स्वत:ला तायप्पामध्ये अक्षरश: झोकून दिले आणि आजवरच्या भूमिका साकारल्याचे सामाधान मिळाले असे उपेंद्र लिमये म्हणाले. पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश कुटे, खजिनदार अविनाश चिलेकर, पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष शशिकांत भागवत, शनिवारवाडा कला महोत्सवाचे विजय काळे या वेळी उपस्थित होते. लिमये म्हणाले, ''जोगवा चित्रपट करण्यापूर्वी या प्रथांबद्दल मलाही फारशी माहिती नव्हती. तायप्पाची भूमिका स्वीकारल्यावर दिग्दर्शक राजीव पाटील यांच्याकडून माहिती मिळत गेली आणि भूमिकेचे गांभीर्य मला कळले. या अनिष्ट प्रथेला बळी पडलेल्या आणि ही प्रथा बंद व्हावी यासाठी प्रयत्न करणाऱ्या एका जोगत्याकडून त्यांच्या आयुष्याविषयी माहिती मिळत गेली आणि मला 'तायप्पा' साकारता आला. मला जी भूमिका मिळते त्या भूमिकेत दिग्दर्शकाने मला आधीच पाहिलेले असते. म्हणूनच अभिनेता म्हणून माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक भूमिकेला न्याय देण्याचा माझा प्रयत्न असतो.''

पुरुषोत्तम करंडकासारख्या स्पर्धांमधून अभिनय आणि दिग्दर्शनास सुरुवात केली. प्रायोगिक रंगभूमीची आवड होती. परिचय संस्थेतर्फे अनेक नाटकांमध्ये

अभिनेता, दिग्दर्शक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. बनगरवाडी, ध्यासपर्व, सावरखेड एक गाव यांसारख्या मराठी चित्रपटात काम करायला मिळाले, तर चांदनी बार, पेज थ्री, ट्रॅफिक सिग्नल या चित्रपटांमुळे हिंदी चित्रपटसृष्टीतही स्वत:ची ओळख निर्माण करता आली.''

## * 'कहाणी शस्त्रक्रियेची' पुस्तकाचे प्रकाशन

''गेल्या एक हजार वर्षांमध्ये संशोधनात भारताने फारसे योगदान दिले नाही. हा इतिहास पुसून भविष्यात नवीन इतिहास घडवावा. त्याची नोंद जग घेईल,'' असा विश्वास 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी व्यक्त केला.

शस्त्रक्रियेचा चित्तवेधक इतिहास सांगणाऱ्या 'कहाणी शस्त्रक्रियेची' या पुस्तकाचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ शल्यचिकित्सक डॉ. विजय बापये यांनी या पुस्तकाचे लेखन केले आहे. या प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार सदा डुंबरे आणि 'रोहन प्रकाशन'चे प्रदीप चंपानेरकर व्यासपीठावर उपस्थित होते.

पवार म्हणाले, ''देशातील संशोधन ढेपाळले आहे. गेल्या एक हजार वर्षांमध्ये संशोधनात युरोप आघाडीवर आहे. भारत यात मागे राहिला आहे. पुढील एक हजार वर्षांमध्ये भारताने संशोधनात भरीव योगदान करावे. त्यामुळे हा इतिहास पुसून नवा इतिहास लिहिला जाईल. त्याची नोंद जगाला घ्यावी लागेल. अशी अपेक्षा आहे.''

''कुठल्याही भाषेतील माणसाला हे पुस्तक उपयुक्त आहे. हे पुस्तक इतर भाषांमध्ये भाषांतरित झाले पाहिजे,'' असे ते म्हणाले.

डुंबरे म्हणाले, ''माहितीचा निर्जीवपणा या पुस्तकात नाही. ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण होण्याची प्रक्रिया यातून स्पष्ट होते.'' शस्त्रक्रियेच्या इतिहासाची माहिती देणाऱ्या या पुस्तकात भारतीय नावे अपवादानेच आढळतात, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

डॉ. बापये म्हणाले, ''शस्त्रक्रिया हा माझा प्राण आहे. पण शस्त्रक्रियेच्या इतिहासाची माहिती देणारे पुस्तक मराठीमध्ये नव्हते. त्यामुळे लेखनाचा निश्चय केला.''

'क्रॉसवर्ड'चे गिरिधर अगरवाल यांनी स्वागत केले. रोहन चंपानेरकर यांनी आभार मानले.

## * 'सूर्यपुत्र'चे प्रकाशन

''महाभारतातून व्यक्तींमध्ये दडलेल्या अनेक प्रवृत्तींचे यथार्थ दर्शन घडते. त्यात मानवी नातेसंबंधही विविध व्यक्तिरेखांच्या आधारे उलगडण्यात आले आहेत. त्यातील कर्णाला समजून घेण्यासाठी त्याच्याबाबतचा पूर्वग्रह बाजूला ठेवायला हवा,'' असे

प्रतिपादन सद्‌गुरूदास महाराज (शिवकथाकार विजयराव देशमुख) यांनी केले.

'सूर्यपुत्र कर्ण' या तीन दिवसीय व्याख्यानमालेत ते बोलत होते. डेक्कन कॉलेजचे अध्यक्ष प्रा. डॉ. गो. बं. देगलूरकर, विदर्भवासी पुणे निवासी संस्थेचे अध्यक्ष डॉ. द. ना. धनागरे, सचिव राम देशपांडे, कौस्तुभ गोडबोले या प्रसंगी उपस्थित होते.

सद्‌गुरूदास महाराज म्हणाले, ''महाभारत हे व्यक्तींमधल्या विविध प्रवृत्ती दर्शविते. त्यातील प्रत्येक व्यक्तिरेखेला एक अर्थ आहे. त्यातील कर्ण समजण्यासाठी त्याच्या एका विशिष्ट पातळीवर अभ्यास करणे गरजेचे आहे. कर्ण ही नियतीच्या आघातामुळे वाताहत झालेली व्यक्तिरेखा आहे. तसे पाहता समाजातील प्रत्येक कुटुंबात एक कर्ण असतोच. नियतीमुळे वाताहत झालेल्या प्रत्येकाचे जणू तो प्रतीक आहे. ''

या प्रसंगी 'सूर्यपुत्र' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन डॉ. देगलूरकर यांच्या हस्ते झाले. कमोदिनी गोडबोले यांनी सूत्रसंचालन केले.

❐


**कोल्ड स्टील**




**टीम बुके । बायरॉन उसी**
अनु. सुभाष जोशी

**३००रु. पोस्टेज ३०रु.**

''गी, मी लक्ष्मी मित्तल बोलतो आहे. मी केवळ औपचारिकपणे हा फोन करतो आहे आहे. उद्या मित्तल स्टील तुझ्या भागधारकांसमोर आर्सेलरच्या शेअर्ससाठी थेट प्रस्ताव मांडणार आहे हे सांगण्यासाठी.''
''ही तर एकप्रकारची लढाईच आहे,'' जॉन कास्टेगन्रो जाहीर करतो. ''आपण आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढलं पाहिजे.''
मित्तलचा प्रस्ताव आर्सेलरचे संचालकमंडळ एकमुखाने फेटाळून लावते.

# विशेषवार्ता

### * दिवाळी अंक पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या दिवाळी अंक (२००९) स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे.

मसापच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेसाठी एकूण ७० दिवाळी अंक आले होते. त्यामध्ये **अ. स. गोखले स्मृत्यर्थ 'रत्नाकर' पारितोषिक** ग्राहकहित (संपादक सूर्यकांत पाठक) व **मेहता मराठी ग्रंथजगत (संपादक सुनील मेहता)** या अंकासाठी जाहीर झाले आहे.

'उत्कृष्ट ललित लेखनासाठीचे अनंत काणेकर' पारितोषिक 'लोकमत' (इंटरनेटचे) संपादक किशोर कुलकर्णी, चिंतन आदेशचे संपादक अभिनंदन थोरात आणि श्रीनिवास हेमाडे यांना जाहीर झाले आहे. कुलकर्णी यांना 'वृत्तपत्रांचा अंत जवळ आला आहे,' या लेखनासाठी हे पारितोषिक मिळाले आहे.

चंद्रकांत शेवाळे पुरस्कृत 'रावसाहेब मोरमकर' पारितोषिक साप्ताहिक सकाळ (संपादक उत्तम कांबळे), 'का. र. मित्र' पारितोषिक चतुरंग अन्वय (महेश कराडकर), 'शं. वा किर्लोस्कर पारितोषिक' व्यासपीठ (संपादक -हेमंत पोतदार) यांना जाहीर करण्यात आले आहे.

उत्कृष्ट कथेचे 'दि. अ. सोनटक्के पारितोषिक' त्वमेव केवलंकर्तासी (लेखक - अविनाश हळबे), कलासागर (संपादक - शेखर जोशी), बालविभागासाठीचे पारितोषिक 'छावा' या अंकास जाहीर झाले आहे. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून कविता मेहेंदळे, प्रा. वैजयंती चिपळूणकर यांनी काम पाहिले.

### * 'नोबेल ललना' हे पुस्तक आता ब्रेललिपीत

मीरा सिरसमकर यांचे 'नोबेल ललना' हे पुस्तक आता ब्रेललिपी असलेल्या पुस्तकाच्या स्वरूपात उपलब्ध झालेले आहे. 'निवांत' या पुण्यातील अंध विद्यार्थी विकासालयाच्या संचालिका मीरा बडवे यांनी 'नोबेल ललना' या पुस्तकाचे ब्रेललिपीमध्ये रूपांतर केले आहे. ता ब्रेल आवृत्तीचे प्रकाशन विद्यार्थी सहाय्यक समिती या संस्थेच्या आपटे वसतीगृहाच्या पर्यवेक्षिका संगीता गारवे यांच्या हस्ते १४ फेब्रुवारी २०१० रोजी झाले. कार्यक्रमाला संस्थेतील अनेक अंध विद्यार्थी उपस्थित होते. त्या सर्वांनी या पुस्तकाचे वाचन केले होते. लेखिका मीरा सिरसमकर यांनी त्यांच्याशी



अंध विद्यार्थ्यांबरोबर 'नोबेल ललना' ब्रेललिपीतील पुस्तकाचे प्रकाशन करताना मीरा सिरसमकर व संगीता गारवे

संवाद साधला. मुलांनी पुस्तक आवडल्याचे आवर्जून नमूद केले. त्या संदर्भात काही प्रश्नही विचारले. नोबेल विजेत्या स्त्रियांचे जीवन खूप प्रेरणा देणारे आहे हे आम्हाला ब्रेललिपीतील पुस्तकामुळे समजल्याचे ते म्हणाले.

'प्रयत्नांना परमेश्वर मानणाऱ्या तुमच्यासारख्या तरुण-तरुणींपुढे हे पुस्तक आले याचा मला आनंद वाटतो. पुस्तक लिहिण्याचे खरेखुरे समाधान मिळाले.' असे मीरा सिरसमकर म्हणाल्या.

❒


२री आवृत्ती

## नोबेल ललना

**मीरा सिरसमकर**



आपल्या अंतर्मनात लागलेल्या प्रकाशाच्या शोधाने उजळणाऱ्या या चौतीस स्वप्रकाशरूपा. प्रत्येकीचे कार्यक्षेत्र वेगळे. प्रत्येकीचे कर्तृत्व वेगळे; परंतु कर्म हीच तृप्ती हा समाधानाचा मंत्र जपल्यामुळे आंतरिक शांती, आत्मविश्वास आणि आनंद त्यांतील प्रत्येकीलाच लाभलेला.

जगातील सर्वोच्च समजला जाणारा नोबेल पुरस्कार त्यांना मिळाला खरा; पण त्यांनी पाहिलेल्या स्वप्नाकडे आणि ध्येयाकडे वाटचाल करणारा त्यांचा प्रवास कोणत्याही पुरस्काराच्या क्षितिजापार होता.

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

# पुस्तक परिचय

**खोटे चेक देऊन पाच वर्षात २५ लाख डॉलर्सची माया जमविणारा विलक्षण डोकेबाज**

# कॅच मी इफ यू कॅन




**फ्रँक अबॅग्नेल । स्टॅन रेडिंग** अनु. ज्योत्स्ना लेले

प्रख्यात दिग्दर्शक स्टिव्हन स्पिलबर्ग यांनी दिग्दर्शित केलेला 'कॅच मी इफ यू कॅन' हा चित्रपट बघून ज्योत्स्ना लेले यांनी तो चित्रपट ज्या पुस्तकावर आधारित आहे, ते पुस्तक मिळवून वाचून काढले. ते पुस्तकही त्यांना आवडले. ते मराठीत आणायला हवे असे त्यांना वाटले. कारण वयाच्या १६ ते २१ वर्षांच्या दरम्यान एका देखण्या तरुणाने खोटे चेक देऊन जगभराच्या बँकांना लुबाडण्याच्या भामटेगिरीतले त्या पुस्तकातील एकाहून एक अफलातून किस्से हे केवळ कल्पनेने रंगवलेले नव्हते तर ते प्रत्यक्षात घडलेले होते आणि तेही भामटेगिरी करणाऱ्या फ्रँक अबॅग्नेल याने स्वत:च लिहून काढलेले होते. १९८० याली फ्रँकचे 'कॅच मी इफ यू कॅन' हे पुस्तक प्रथम प्रसिद्ध झाले. त्यावेळी फ्रँक बत्तीस वर्षांचा होता, आणि त्याने गुन्हेगारी सोडून अमेरिकेतील एफबीआय या केंद्रीय गुन्हा अन्वेषण संस्थेशी सहकार्य करून आर्थिक क्षेत्रातील अनेक गैरव्यवहारांचा बीमोड केलेला होता. अनेक बँकांमधील लबाडीच्या तसेच फसवणुकीच्या घटनांचा छडा लावून जगातील एक अग्रगण्य कॉन्फिडन्स मॅन म्हणून त्यानेलौकिक मिळवलेला असतो. चोराच्या वाटा चोरालाच ठाऊक असतात, या उक्तीप्रमाणे फ्रँकने पाच वर्षांच्या आपल्या गुन्हेगारीच्या जीवनाचा त्याग करून, गुन्हेगारांचा बंदोबस्त करण्यासाठी आपले उत्तरायुष्य सार्थकी लावले. अमेरिकेतील न्यायखात्याचेही कौतुक करायला हवे कारण आर्थिक गुन्हे सफाईने करणाऱ्या फ्रँकला जन्मठेपेची वा तत्सम शिक्षा देऊन कारावासात डांबून ठेवण्याऐवजी अमेरिकन लॉ एन्फोर्समेंट एजन्सीला विनामोबदला मदत करण्याच्या अटीवर त्याला मुक्त केले आणि त्याच्या या क्षेत्रातील बुद्धिमत्तेचा आणि प्रावीण्याचा उपयोग देशहितासाठी करून घेण्याचे धोरण राबवले.

सोळाव्या वर्षापर्यंत फ्रँकचे जीवन एखाद्या मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलाप्रमाणेच गेले.

न्यूयॉर्कमधील ब्रांक्सव्हिल भागातील एका सुखवस्तू ज्यू कुटुंबात फ्रँकचा जन्म झाला. वडील दुसऱ्या महायुद्धात सैन्यदलात होते. युद्ध संपल्यावर ग्रामर्सीज् नावाचे स्टेशनरी दुकान ते चालवत. राजकारण, क्रीडाक्षेत्र यातही ते सक्रिय होते. रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते म्हणूनही त्यांचा दबदबा होता. खोल पाण्यातल्या समुद्रातले मासे पकडण्याचा छंद त्यांना होता. त्यासाठी ते मासेमारी मोहिमेवर अधूनमधून जात. २८व्या वर्षी त्यांनी पॉलेट या पंधरा वर्षे वयाच्या सुंदर तरुणीशी लग्न केले. या दांपत्याला ४ मुले झाली. फ्रँक हा चार भावंडांमधला तिसरा मुलगा. फ्रँक बारा वर्षाचा असताना आईने मुलांसह नवऱ्याचे घर सोडले आणि ब्रॉंक्स डेंटल कॉलेजमध्ये टेक्निशियनच्या कोर्ससाठी नाव घातले. फ्रँकच्या वडिलांचे बायकोवर प्रेम होते. त्यांनी खूप मनधरणी केली, मुलांच्या मार्फत रदबदली केली पण फ्रँकच्या आईने दाद दिली नाही. फ्रँक १४ वर्षांचा असताना आई-वडील यांचा घटस्फोट झाला. फ्रँक

वडिलांबरोबर राहू लागला. वडिलांचे मित्र हे उच्च स्तरातील असल्याने फ्रँकला शेअर ब्रोकर्स, कॉट्रॅक्टर्स, उद्योगपती, कामगार नेते, ट्रकचालक वगैरेंचे जीवन बघायला मिळाले. तो चलाख होता. शाळेच्या अभ्यासापेक्षा वाह्यात मित्रांबरोबर तो कँडी चोरणे, सिनमागृहात तिकिटाशिवाय घुसणे, गाड्या चोरणे असले धंदे करायला लागला. पोलिसांनी त्याला पकडले. वडिलांनी त्याला सोडवले. त्याच्या चोरीतल्या सहभागाचा पुरावाही खोडून टाकायला लावला. फ्रँकला हे प्रकरण जादूच्या कांडीसारखे वाटले. वडील त्याला न रागावता म्हणाले, ''चुका सर्वांच्याच हातून होतात. तू काय काय भानगडी करतोस ते मला ठाऊक आहे. पण या गोष्टी अशा प्रकारे करायच्या नसतात. कायद्याच्या दृष्टीने तू अजून बच्चा आहेस, पण तू दिसतोस प्रौढ. तेव्हा तू आता प्रौढ व्यक्तीप्रमाणे विचार करायला शिक. लहान मुलासारख्या खोड्या करण्यात वेळ घालवू नकोस.''

त्यावेळी फ्रँक फक्त १५ वर्षांचा होता पण तो ६ फूट उंच होता. १७० पौंड वजन होते. दांडगा, दणकट होता. शिक्षकही त्याला टरकून असत. वडिलांच्या बोलण्यामुळे तो प्रौढाप्रमाणे वागू लागला. बॉक्सव्हिलच्या गोदामात अर्धवेळ नोकरी करू लागला. त्यामुळे खूष होऊन वडिलांनी त्याला एक जुनी फोर्ड कार घेऊन दिली. या कारमुळे फ्रँकला भलताच चेव आला. पोरींना गटवण्यात तो तरबेज झाला. पोरींना फिरवण्यात त्याला मजा वाटू लागली. पेट्रोलसाठी वडिलांकडे पैसे मागणे भाग पडे. तेव्हा तो एकदा म्हणाला, ''मला एक गॅस क्रेडिट कार्ड घेऊन द्या. तुमच्याकडे सारखे पैसे मागण्याचा संकोच वाटतो. शाळा, खेळ, जेवण, डेटिंग, पेट्रोल याला तुम्ही देता तो पॉकेटमनी कमी पडतो. गॅसकार्ड दिलेत तर पैसे मी भरीन.''

वडील त्याला आपले स्वत:चे मोबिल गॅसचे कार्ड देतात. ''हे कार्ड वापर... त्याचे दरमहाचे बिल मात्र भरायची काळजी घे. तुझ्यावर माझा विश्वास आहे.''

पहिल्याच महिन्यातले मोबिल गॅसचे बिल भरल्यावर फ्रँक कफल्लक झाला. आता पैसे कुठून आणायचे?

त्याने गॅस भरताना पेट्रोल पंपावर 'टायर सेट १६० डॉलर्सना बदलून मिळेल' असा बोर्ड वाचला.

तेथील अटेंडंटला तो म्हणाला, मला टायर बदलायचे आहेत.

अटेंडंट म्हणाला, पण तुझे टायर तर चांगले आहेत.

फ्रँक म्हणाला, खरं आहे. टायर्स घेतल्याची कार्डवर नोंद कर. टायर्स तूच ठेव. मला १०० डॉलर्स दे. तू ते १६० ला कुणाला तरी विकत दे. तुला साठ डॉलर्सचा फायदाही होईल.''

तो अटेंडंट या गोष्टीला राजी होतो. हे तंत्र मग फ्रँक सहजपणे राबवतो.

पुढच्या महिन्यात टायर्सच्या १४ जोड्या बदलून, गॅसकार्डचे बिल ३४००

डॉलर्सचे येते. वडील ते बिल भरतात. बँकेचे अधिकारी वडिलांचे मित्र. वडील फ्रँकला विचारतात, ''तू हे काय केलेस ते खरे खरे सांग. मी तुला क्षमा करीन.''

''डॅड, हे सगळं मुलींमुळे घडले. त्या मुलींना पटवण्यासाठी चमत्कारिक गोष्टी कराव्या लागतात. मला त्या स्पष्ट करता येणार नाहीत.''

वडील क्षमा करतात. आई मात्र रागावते. ती फ्रँकला वडिलांच्या घरातून स्वत:च्या घरात राहण्यास भाग पाडते. त्याला पुढे शाळा-कम-सुधारगृहात टाकते. वर्षभर फ्रँक त्या सुधारगृहात राहतो.

त्याचवेळी वडिलांची आर्थिक स्थिती ढासळते. ते आपली अलिशान कार विकून साधी सेंकंड हँड कार घेतात. ''मी कोण आहे हे मला ठाऊक आहे. माझ्याकडे कुठली कार आहे हे महत्त्वाचे नाही. मोठी कार असण्यापेक्षा मी प्रामाणिक आहे ह्या गोष्टीचे महत्त्व जास्त आहे.'' वडिलांची ही वाक्ये फ्रँकला पुढच्या आयुष्यात प्रेरक ठरतात.

फ्रँक सोळाव्या वर्षी स्वत:चा शोध घेण्यासाठी घराबाहेर पडतो. १९६४ साली. त्यावेळी त्याच्या बँकेतल्या खात्यावर २०० डॉलर्स शिल्लक असतात.

एका आठवड्यात वेगवेगळी कामे करून थोडेफार पैसे मिळवतो. पण त्यात जगणे अशक्य आहे हे त्याच्या ध्यानात येते. तो वयापेक्षा थोराड असला तरी ड्रायव्हर्स लायसन्सवर वय १६च असल्याने पगार निम्मा मिळतो. तेव्हा त्या लायसन्सवरचे जन्मवर्ष १९४८ ऐवजी तो १९३८ तो बदलतो. एका रात्रीत १६ ऐवजी २६ वर्षांचा होतो. त्यावेळी चेक वटवण्याचे एक तंत्र फ्रँक शोधून काढतो.

त्याच्या बँकेतील खात्यावर २०० डॉलर्स शिल्लक होते. या शिल्लक रकमेला हात लावायचा नाही हे ठरवलेले. १० किंवा २० डॉलर्सचा चेक लिहायचा. तो हॉटेल किंवा डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये जाऊन वटवायचा. पैशाची जरूर असेल तेव्हा चेक वटवायचे. मौजमजा करायची. पगाराला पूरक म्हणून रोज २/३ चेक खोटे लिहून द्यायचे. चेक न वटवण्यासाठी पैसे कमी पडले तर वडील भरपाई करतील, असे तो म्हणे. चेकचा खरेपणा पडताळून न पाहता लोक चेक स्वीकारण्याएवढे मूर्ख असतील तर त्यांची फसवणूक समर्थनीय आहे असा फ्रँकचा युक्तिवाद होता. कुमारवयामुळे आपण पकडले गेलो तरी कडक शिक्षा होणार नाही असाही दिलासा तो स्वत:ला द्यायचा.

खोटे चेक वटविण्याचा प्रकार न्यूयॉर्कमध्ये २ महिने केल्यावर न्यूयॉर्क सोडण्याचा विचार फ्रँकने केला. खोटे चेक वटविण्यात आपण प्रवीण असलो तरी केवळ यावर दीर्घकाळ निभाव लागणार नाही हेही त्याला मनोमन पटले होते. आपण वैमानिक असलो तर देशोदेशी, गावोगावी भटकू शकू. खोटे चेक वटवू शकू. पकडले जाणार नाही असे त्याला वाटले.

वैमानिकाचे प्रशिक्षण घेऊन वैमानिक व्हायचे हा मार्ग दीर्घ पल्ल्याचा आणि प्रचंड खर्चाचा. तो फ्रँकला जमण्यासारखा नव्हता. वैमानिकाचा पोशाख मिळवणे, बॅच मिळवणे, तोतया वैमानिक बनून विमानातून प्रवास करणे हे कितपत शक्य आहे याचा त्याने मागोवा घेतला. पॅन ॲम वर्ल्ड एअरवेज. या अमेरिकन विमान कंपनीत जाऊन 'आपण सहवैमानिक आहोत, आपला गणवेश हरवला आहे, तातडीने गणवेश मिळाला नाही तर मला विमान घेऊन लॉस एंजेलिसला जाता येणार नाही' असा कांगावा करून फ्रँक गणवेश मिळवतो... वैमानिकाला उपलब्ध असणारे फुकट प्रवास करण्याचे दोन मार्ग त्याला कळतात. एक तर, फक्त तिकिटावरचा टॅक्स भरून पास मिळवणे. दुसरा डेड-हेडिंग. पिंक स्लीप भरून पास मिळवणे. 'आपण न्यूयॉर्कमध्ये आहोत. उद्या लॉस एंजेलिसवरून दुसऱ्या देशाला उड्डाण करण्याचा आदेश बॉसने दिला आहे. तर न्यूयॉर्कहून कुठल्याही कंपनीच्या विमानाने लॉस एंजेलिसला आपण जाऊ शकतो.' विमानात जागा नसली तरी कॉकपिटमधील जम्प सीटवर बसून प्रवास करता येतो. त्यासाठी पिंक स्लिप तेवढी भरावी लागते...

फ्रँक या डेड हेंडिगचा वापर पुढच्या पाच वर्षात अनेकदा करतो. त्याचे सहवैमानिक हे पद खोटे आहे, तो फसवणूक करीत आहे हे लक्षात यायला विमान कंपन्यांना दीर्घकाळ लागतो. वैमानिकाच्या या नाटकानेही खोटे चेक वटवणे फ्रँकला सोपे जाते.

पाच वर्षांच्या अवधीत फ्रँक २६ देशात मिळून २५ लाख डॉलर्सची माया जमवतो.

एकविसाव्या वर्षी त्याला फ्रेंच पोलिस पकडतात. शिक्षा होते. परंतु पाच वर्षांनी त्याला सरकारला मदत करण्याच्या काही अटींवर अमेरिकन गुप्तहेर खात्याच्यामार्फत सोडण्यात येते. त्याचबरोबर नॅशनल सायबर सिक्युरिटी अलायन्स वगैरे संस्थांसाठी फ्रँक काम करतो.

१६ ते २१ वर्षे हे वय फ्रँक खोटे चेक वटवणे, बनावट दस्ताऐवज तयार करणे, तोतया वैमानिक, डॉक्टर आणि वकील म्हणून काम करणे या उद्योगात घालवतो. २६ देशात संचार करतो. इतका दीर्घकाळ तो पोलिसांना चुकवू शकतो आणि २५ लाख डॉलर्सएवढी प्रचंड रक्कम गोळा करतो, अनेक मुलींना आपल्या प्रेमपाशात अडकवतो. ही सर्व कहाणी खूपच विलक्षण आहे. आधुनिक ठकसेनांचा बादशहा म्हणून त्याचा उल्लेख करायला हरकत नाही.

**किंमत : २०० रु.   सभासदांना : सवलतीत   पोस्टेज : ३० रु.**

**नवे कोरे**

# मॅन इंटरप्टेड




**जेम्स बेली**
अनु. विदुला टोकेकर

१८०रु. पोस्टेज २५रु.

जेम्स बेली हा विचित्र आणि खचवून टाकणाऱ्या ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डरने (ओसीडी) ग्रासला होता. मनावर परिणाम करणारी औषधं आपल्या शरीरात जातील आणि आपल्यावर ताबा मिळवतील, या भीतीने तो पछाडला होता. भीतिदायक प्रश्नांचा त्याच्यावर नेहमी पगडा बसलेला असायचा– लोक त्याच्या अन्नात काहीतरी मिसळतील का? मारिजुआनाच्या पानांच्या फोटोला हात लावला तर नशा चढेल का? अमेरिकेतील एका विशेष रुग्णालयात त्याच्यावरच्या उपचार-कार्यक्रमामध्ये तो आपल्या सर्व भयानक दु:स्वप्नांना सामोरा गेला. त्याने स्थानिक भणंगांमध्ये मिसळावं, त्यांच्याशी हस्तांदोलन करावं आणि 'त्यांनी जे काय घेतलं आहे ते स्पर्शामार्फत आपल्या शरीरात जाईल' या भीतीवर मात करावी, असं त्याला सांगण्यात आलं होतं. हे कथन म्हणजे बेलीच्या अजिंक्य चैतन्याचा आविष्कार आहे. तो स्वत: ज्या अतर्क्य प्रसंगांत होता, त्यातली विसंगती आता सांगू शकतो आहे. मिश्कील विनोदबुद्धी आणि त्याच्या जोडीला असलेली मन:शक्ती यांमुळेच त्याला बरं व्हायला आणि पुन्हा एकदा जगाला सामोरं जायला बळ मिळालं आहे.

# पुस्तक परिचय

**ॲन समर्स या रिटेल दुकानांच्या साखळीला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या जॅकलिनचे स्फोटक आत्मकथन**

# अ वुमन्स करेज




**जॅकलिन गोल्ड** अनु. प्रशांत तळणीकर

‘ए वुमन्स करेज’मध्ये जॅकलिन गोल्ड या तरुणीने एका अनोख्या क्षेत्रातील मुलुखगिरीची आणि आपल्या आयुष्यात आलेल्या स्त्रीपुरुषांच्या सहवासाची कहाणी सांगितली आहे.

स्त्रियांची अंतर्वस्त्रे, सौंदर्यसाधने आणि लैंगिक करमणुकीची साधने विकणारी रिटेल दुकानांची ॲन समर्स साखळी ही युरोप-अमेरिकेत प्रतिष्ठित मानली जाते. स्त्रियांची अंतर्वस्त्रे आणि सौंदर्य प्रसाधने विकणे याबाबत समाज व सरकार यांचा आक्षेप नसतो. परंतु कृत्रिम इंद्रिये, व्हायब्रेटर्स, सेक्सविषयक साधने, कामशास्त्राची पुस्तके वगैरे विकणे निषिद्ध मानले जाते. ती विकायला अनेक देशात बंदी अहो, त्यामुळे त्यांची विक्री चोरून, लपूनछपून केली जाते.

किम कॅबोर्न वॉटरफील्ड या हरहुन्नरी व्यक्तीने ॲन समर्स स्टोअर प्रथम सुरू केले. तो ब्रिटिश अभिनेत्री डायना डोअर्स आणि प्रिन्सेस मार्गारेटचा मित्र होता. स्त्रीपुरुष संबंधाविषयीचे एक मॅन्युअल त्याने लिहिलेले होते. जर्मनीच्या दौऱ्यावर असताना तेथे सेक्सशॉप्समध्ये लैंगिक करमणुकीची साधने सर्रास विकली जाताहेत हे बघून त्याने सप्टेंबर १९७० मध्ये लंडनच्या वेस्ट एंड भागातील मार्बल आर्च येथे ‘ॲन समर्स’ हे दुकान सुरू केले. ॲनिस गुडविन या आपल्या प्रेयसीच्या नावात थोडा बदल करून आपल्या सेक्सशॉपसाठी त्याने ‘ॲन समर्स’ हे नाव नक्की केले. ‘सेक्स शॉप’ ही संकल्पना इंग्लंडमधील काँझर्वेटिव्ह समाजाला त्यावेळी रुचणे अवघड होते. प्रसारमाध्यमांनी ‘ॲन समर्स’वर झोड उठवली. मिडलँड्समधील धर्मगुरूंनी ‘आमच्या भागात असले घाणेरडे दुकान नको’ म्हणून लोकांना भडकावले. तेथील नागरिकांनी निदर्शने केली. त्यात महिलाही सामील झाल्या. किम वॉटरफील्डने आपल्या प्रेयसीला म्हणजे ॲनिस गुडविन हिला या दुकानाच्या व्यवस्थापकपदी नेमले होते. ती बोलण्यात हुशार होती. या निदर्शकांना ती हसतखेळत निष्प्रभ करी. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनाही ती आपल्या हजरजबाबीपणाने आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वाने प्रभावित करी. ते तिच्याकडे मैत्रीण म्हणून पाहत. त्यामुळे निदर्शकांचा विरोध क्षीण होत गेला. वॉटरफील्ड हा छानछोकीने रहायचा. हेलिकॉप्टरने हिंडायचा. ॲन समर्स दुकानात रोज चार हजार पौंडांची विक्री व्हायची. ती वॉटरफील्ड स्वत:साठी वापरायचा. त्यामुळे दुकानाची देणी वाढू लागली. दुकानाचे दिवाळे निघायची वेळ आली. तशातच या दुकानात स्वत: येऊन खरेदी करणारे ग्राहक कमी असत. बहुसंख्य ग्राहक पोस्टाने, व्हीपीने लैंगिक उपकरणे मागवत. पोस्टाच्या संपामुळे दुकानाच्या विक्रीवर प्रतिकूल परिणाम झाला.

जॅकलिन गोल्डचे वडील ॲन समर्सच्या दुकानाला पुस्तके व मासिके पुरवत असत. त्यांचे साडेचारचे पौंड वॉटरफील्डकडून येणे होते. ते वसूल करण्यासाठी मार्बल आर्च येथील शाखेवर गेल्यावर त्यांना दुकानाची अवस्था बिकट असल्याचे

आढळले... मात्र हा व्यवसाय लाभकारक आहे आणि योग्य प्रकारे हाताळला तर चार पैसे मिळवून देणारा आहे अशी त्यांची भावना झाली.

'ॲल समर्स'ने दिवाळखोरी जाहीर केली तेव्हा जॅकलिन गोल्डच्या वडिलांनी त्या संधीचा फायदा घेतला. फक्त दहा हजार पौंडात त्यांना दुकान आणि नाव गुडवुइलसह मिळाले. बोली लावायला फारसे कुणी आलेच नाही. कारण 'सेक्स शॉप' चालवण्याला तशी लोकांच्या लेखी प्रतिष्ठा नव्हती. त्यामुळे गोल्ड कुटुंबाला 'ॲन समर्स'ची मालकी अल्प मोबदल्यात मिळाली.

आपल्या वडिलांनी विकत घेतलेल्या ॲन समर्स दुकानात जॅकलिन गोल्ड बसू लागली. त्यावेळी व्यवस्थापक ॲनिस गुडविनच्या काही फॅड्सविषयी तिचे मत प्रतिकूल झाले. ॲनिस दुकानात स्त्रियांची जेनेट रेगर शैलीची उंची अंतर्वस्त्रे ठेवू लागली. या अंतर्वस्त्रांची विक्री फारशी होत नसे. त्यावेळच्या पुरुषांना लाल किंवा काळ्या रंगाची बाहुली छाप अंतर्वस्त्रे अधिक पसंत पडत. तसेच लैंगिक उपकरणे खरेदी करण्यातही पुरुषांचा वरचष्मा असे. दुकानाची विक्री कमी कमी होऊ लागली तेव्हा तिच्याशी गोल्ड कुटुंबियांचे खटके उडू लागले. अखेर तिला डिच्चू देण्यात आला. जॅकलिन पोस्टल ऑर्डर्स वगैरे वेगवेगळ्या विभागांच्या कामांचा अनुभव घेऊन तयार होत होती... तशात एकदा आपली उत्पादने एका पार्टीच्या वेळी विकण्याचा स्टॉल लावण्याची जबाबदारी तिच्यावर पडली आणि जॅकलिनला या व्यवसायाची खरी गोम कळली. तिने ॲन सॅमर्सच्या अंतर्वस्त्रांच्या आणि लैंगिक उपकरणांच्या विक्रीचे नवे तंत्रच विकसित केले. या व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

असा एकदम हा प्रतिमाबदल व्हावा असे काय घडले?

पिप्पा डी या मल्टिलेव्हल मार्केटिंग कंपनीला एका पार्टीदरम्यान ॲन समर्सची काही उत्पादने विक्रीला ठेवायची होती. सर्वसाधारण कपड्यांच्या जोडीने स्त्रियांची नखरेल अंतर्वस्त्रे आणि लैंगिक उपकरणे त्या पार्टीत विकण्यासाठी एक काऊंटर देण्यात आला. जॅकलिन त्यावेळी त्या पार्टीला उपस्थित राहिली. ती पार्टी फक्त स्त्रियांसाठीच होती. अंतर्वस्त्रांच्या आकर्षक नमुन्यांवर स्त्रियांच्या उड्या पडल्या. त्याचबरोबर कृत्रिम इंद्रिये, व्हायब्रेटर्स, मोठ्या आकाराच्या बाहुल्या वगैरे बघून स्त्रियांमध्ये हास्यविनोद सुरू झाले. त्या साधनांनी कशी गंमत येईल याबद्दल एकमेकीत चर्चा सुरू झाल्या. 'ॲन समर्स'च्या मालकाची मुलगी म्हणून जॅकलिनला त्या स्त्रिया नाना प्रश्न विचारू लागल्या. त्यापैकी काही स्त्रिया म्हणाल्या, ''आम्हाला ही साधनं हवी असतात, पण त्यासाठी दुकानात जायचा संकोच वाटतो. तुम्ही या पार्टीत ही साधनं आणून फार मस्त काम केलंय... अशा पार्ट्या वरचेवर घेत जा.'' त्या पार्टीसाठी नेलेल्या लैंगिक साधनांची चांगली विक्री झाली. लैंगिक सुखाची

आवड व गरज स्त्रियांनाही असते, पण त्या दृष्टीने त्यांचा विचार करण्याची त्यावेळी कोणालाच निकड जाणवली नव्हती. केवळ पुरुषांच्याच लैंगिकतेचा विचार केला जायचा. लैंगिक सुखाच्या बाबतीत उपभोक्त्या म्हणून स्त्रियांकडे बघितलेच जात नव्हते. आपलं लैंगिक जीवन अधिक सुखकारक आणि रंगतदार बनवण्यासाठी आवश्यक ती साधनं विकत घेण्याचं स्वातंत्र्य पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही असायला हवे; स्त्रियांनाही आपल्या कामतृप्तीबाबत वेगवेगळी साधने, उपकरणे उपलब्ध हवी असे जॅकलिनला जाणवले. त्यासाठी 'ॲन समर्स'तर्फे आपणच स्त्रियांसाठी पार्ट्या आयोजित करून वेगवेगळ्या लैंगिक साधनांची आणि कामुक अंतर्वस्त्रांची, रतिक्रीडेची लज्जत वाढवणाऱ्या वस्तूंची ओळख स्त्रियांना करून देण्याची कल्पना जॅकलिनने आपल्या वडिलांच्या गळी उतरवली. 'स्त्रियांच्या संभाव्य गरजा, दुकानात येऊन सेक्स साधने मागताना त्यांना वाटणारा संकोच वगैरे लक्षात घेऊन अशा पार्ट्यांमध्ये त्यांना त्याबाबत नि:संकोचपणे आपल्याला हवे ते घेण्याची संधी मिळाल्याने आपल्या उत्पादनांची विक्री वाढू शकेल.' असे जॅकलिनने म्हटले.

वडिलांनी तिला या कल्पनेबाबत विस्तृत सादरीकरण करण्यासाठी एक आठवड्याची मुदत दिली. संचालक मंडळ त्या सादरीकरणाने प्रभावित झाले. पार्ट्या आयोजित करण्यासाठी स्त्रियांची नेमणूक करणे, पार्टीमध्ये येणाऱ्या स्त्रियांमधून आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या तरुणींची निवड करून त्यांचाही व्यवसायवृद्धीसाठी उपयोग करून घेणे, पार्टीच्या आयोजक महिलांच्या निवडीसाठी वृत्तपत्रात जाहिराती देणे, वगैरे कल्पनांना संचालक मंडळाने बऱ्याच वादावादीनंतर मान्यता दिली.

''फक्त स्त्रियांसाठी असलेल्या ॲन समर्सच्या अनोख्या अंतर्वस्त्रांची विक्री करण्यासाठी पार्ट्या आयोजित करणारे आयोजक पाहिजेत. फक्त संध्याकाळपुरते काम करून ३० ते ४० पौंड मिळवा.'' अशी जाहिरात १९८१च्या मे महिन्यात दैनिकांत आली आणि इच्छुक आयोजकांच्या फोनचा मारा सुरू झाला. त्यातून पंचवीस महिला आयोजकांची निवड करण्यात आली.

त्यांच्यासाठी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. एक स्टार्टर किट तयार करण्यात आले. त्या किटमध्ये तोंडाला बांधण्याच्या पट्ट्या, चाबूक, हातकड्या, साखळ्या, विविध मुखवटे, व्हायब्रेटर्स, मोठ्या बाहुल्या, पिनिस मग्ज वगैरे लैंगिक साधने असत. ती साधने प्रशिक्षणाच्या वेळी प्रत्येकाला स्वतंत्रपणे एकेकीला दाखवण्यात येत.

प्रशिक्षणासाठी काही पुरुषांचीही निवड पुढच्या काळात करण्यात आली. जॅकलिनचा नवरा टोनी हा त्यात सामील झाला. तो हिरेमाणकांची पारख करण्याचे काम करीत असे. नंतर एक वाईन बार चालवण्याचा त्याने प्रयत्न केला, पण आता पत्नीच्या पावलावर पाऊल ठेवून टोनीने लैंगिक आनंदाचं जग स्त्रियांना खुलं करून

देण्याच्या व्यवसायात स्वत:ला झोकून दिले.

जॅकलिनने दुकान आणि पार्टी प्लॅन या दोन्ही बाबी वेगळ्या ठेवण्याची दक्षता घेतली. दर आठवड्याला एक पार्टी असे वेळापत्रक ठरवले. लैंगिक साधनांचे कॅटलॉग्ज शृंगारपूर्ण आणि खट्याळ बनवण्याचा प्रयत्न केला. पुरुषांना आवडतील ती अंतर्वस्त्रे स्त्रिया घालतात हे त्यावेळचे गृहीत मत. पण त्याबाबत जॅकलिनने सर्व्हे केला. पुरुषांना बायकांनी लाल रंगाची अंतर्वस्त्रे घातलेली आवडतात तर आपण काळ्या रंगाची अंतर्वस्त्रे घातल्यावर पुरुष अधिक चेकाळतात असा अनुभव अनेक स्त्रियांनी सांगितला. स्त्रियांना गुलाबी आणि पांढरा रंगही जास्त आवडतो असे सर्व्हेमध्ये दिसून आले. तेव्हा काळा, पांढरा, लाल, गुलाबी आणि निळा अशा पाच रंगांमध्ये अंतर्वस्त्रांचे उत्पादन जॅकलिनने सुरू केले. पहिल्या वर्षात सहाशे पार्टी आयोजक नेमले. पार्टीचे यजमानपद स्त्रियांकडेच असे. पुरुष बरोबर असताना स्त्रिया व्हायब्रेटर्ससारखी साधने घेण्यास पुढे येत नसत हे जॅकलिनच्या ध्यानात आले. बायकाबायकात स्त्रीपुरुषसंबंधाबाबत, कामतृप्तीबाबत अनुभवांची देवाणघेवाण मोकळेपणाने होत असे. सेक्सबद्दल समवयस्कांचे अनुभव जाणून घेताना स्त्रियांच्या मनावरील ताणतणाव दूर होत. त्यामुळे या पार्ट्यांना त्या पुन:पुन्हा येत. मैत्रिणींनाही घेऊन येत. पहिल्याच वर्षात या पार्ट्यांमधून ८० हजार पौंडांची उलाढाल झाली... पुढे दरवर्षी होणाऱ्या पार्ट्यांची संख्या वाढत जाऊन ब्रिटनमधील सर्वांत मोठी पार्टी प्लॅन कंपनी म्हणून ॲन समर्सचा उल्लेख होऊ लागला. साडेसात हजार पार्टी आयोजकांचा ताफा काम करू लागला.

पार्टी आयोजकांना स्टार्टर किट सुरुवातीलाच मिळे. त्यामुळे त्यांच्या कमाईचा मार्ग पहिल्या दिवसापासूनच खुला होई. कामाच्या वेळा लवचिक असत. गट प्रमुखांना कंपनीची कार वापरायला मिळे. दर महिन्याला आयोजकांमध्ये स्पर्धा असे. विजेत्यांना मोठ्या रकमेच्या वस्तू बक्षीस म्हणून मिळत.

टोनीने नंतर अंतर्वस्त्रे आणि लैंगिक करमणूक साधने यांचे उत्पादन स्वत:च स्वतंत्रपणे सुरू केले. तो ॲन समर्सला आपला माल विकू लागला.

१९८५ मध्ये ब्रिस्टॉल येथे विमेन्स वर्ल्ड एक्झिबिशन हे प्रदर्शन भरले. त्यात जॅकलिनने एक स्टॉल घेतला. पुढच्या भागात अंतर्वस्त्रांचे नमुने ठेवले. मागच्या भागात लैंगिक करमणूक साधने मांडली. अठरा वर्षावरील स्त्रीपुरुषांनाच आतल्या भागात प्रवेश मिळे. बीबीसीवर जॅकलिनची मुलाखत झाली. ती ऐकून प्रेक्षकांची ह्या स्टॉलवर भयंकर गर्दी झाली. दोन साध्या वेषातले पोलीसही आले. त्यांनी 'विना परवाना लैंगिक वस्तूंचा स्टॉल' चालवण्याचा आरोप ठेवून स्टॉल बंद करण्यास सांगितले. जॅकलिनने अशा स्टॉलला परवानगी लागत नाही असे सांगून त्या अधिकाऱ्यांना पिटाळून लावले... पुढेही पोलिसांशी आणि सरकारी अधिकाऱ्यांशी

असे चकमकीचे प्रसंग आले. काहीवेळा सीमाशुल्क अधिकारी अंतर्वस्त्रांची खोकी आत येऊ देत, पण यांत्रिक लिंगे, व्हायब्रेटर्स वगैरेंना मनाई करीत. तेव्हा त्या साधनांची राजकुमार, राजकन्या वगैरे नावे ठेवून अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्यात येई. अडचणीतून मार्ग काढण्याचे कौशल्य जॅकलिन गोल्डला जमू लागले.

दहा वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर टोनी आणि जॅकलिन यांच्यातले संबंध ताणले गेले. जॅकलिनला व्यावसायिक यशामुळे नवा आत्मविश्वास आला. तिने स्वत:च्या शरीराकडे लक्ष देणे सुरू केले. एरोबिक्सचा वर्ग लावला. वजन १५ किलोंनी कमी करून ५५ किलोवर आणले. कपड्यांची शैली बदलली. ती अधिक तरुण आणि जोमदार बनली. सुंदर उद्योजिका म्हणून तिची नवी ओळख निर्माण झाली. टोनीला तिच्या या व्यक्तिमत्त्वाच्या तुलनेत आपण मागे पडतो आहोत असा न्यूनगंड वाटू लागला. तो तिला अकारण उणेदुणे बोलू लागला. असुरक्षिततेच्या भावनेने त्याला पछाडले. आपल्याला आनंदात जगायचे आहे, पण टोनी आपल्याला मागे ओढत आहे असे तिला क्षणोक्षणी वाटू लागले. शेवटी एक दिवशी भांडण झाल्यावर जॅकलिनने त्याचे घर सोडून आपल्या डॅडचे घर गाठले.(१९९३) टोनीने नंतर दुसरे लग्न केले.

जॅकलिनच्या जीवनात वाद्यवृंदात काम करणारा बेन हा तरुण आला. टेस्टोस्टेरीन ही पुरुष संप्रेरके घेऊन तो रात्रीत अनेकदा कामतृप्तीचा आनंद घेई. त्याच्या या पराक्रमाने जॅकलिन त्याच्यावर लुब्ध झाली. त्याच्या सहवासाने तीही उत्तेजक द्रव्ये घेऊ लागली. काही काळ मजेत गेला पण पुढे त्यांच्यातही दुरावा आला. ''माझा आकर्षक देखणा पुरुष मला अनाकलनीय होऊन समजायला जड जात होता.'' असे तिला वाटू लागले. बेनची त्यावेळी इतर मुलींशीही प्रेमप्रकरणे चालूच होती. १९९८ मध्ये बेनशी तिने सगळे संबंध तोडले.

जॅकलिनच्या जीवनात या नंतरच्या काळातही काही पुरुष आले. त्यांचे अनुभवही तिला चमत्कारिक आले.

'ॲन समर्स'साठी फोटोग्राफर म्हणून काम करणारा डॉमिनिक. त्याने जॅकलिनचे आणि तिच्या बहिणीचे काही उत्तान फोटोही काढले होते. पुढे त्याने जॅकलीनकडे वीस लाख पौंडांची मागणी केली. ती पूर्ण न केली तर तिचे अनावृत्त फोटो विकून टाकण्याची धमकी त्याने दिली. जॅकलीनने वकिलामार्फत त्याला नोटिस दिली. फोटोंच्या हक्कासाठी २०० डॉलर्स देऊन गोपनीयता करार करून हे प्रकरण मिटवले गेले.

बेनपासून मुक्त झाल्यावर जॅकलिन गोल्ड आपल्या मैत्रिणींबरोबर बाहेर जाऊ लागली. तसेच योग्य व्यक्ती बघून डेटिंगही करू लागली. टोबी हा ब्रेकफास्ट शो करायचा, त्याच्याबरोबरच्या पहिल्या डेटला त्याच्या हातून वाईनचा ग्लास जॅकलिनच्या

अंगावर उपडा झाला. दुसऱ्या डेटला सिनेमा बघताना तिच्या मांडीवर त्याने पॉपकॉर्नचा कोन पालथा केला. तिसऱ्या वेळी रस्ता ओलांडताना जॅकलिन गाडीखाली येता येता वाचली. टोबी हा मस्त माणूस होता, पण त्याच्या सहवासात केव्हा काय संकट कोसळेल याचा नेम नव्हता. हे जाणून जॅकलिनने त्याला डेटिंगसाठी बाद ठरवले. दुसऱ्या एका डेटला तिने फ्लिप-फ्लॉट (फटफट) नाव दिले. हॉकी खेळताना अपघातात पाय दुखावल्याने तो चक्क कुबड्या घेऊन आला. त्याच्या जखमी पायातला बूट फटफट आवाज करीत होता. बूट दुसरा घे असे तिने सुचवल्यावर त्याने बुटाचा तळ चिकटवण्यासाठी गम हवा म्हणून दहा दुकाने पालथी घातली. त्यानंतर तिने त्याचे तोंड पुन्हा बघितले नाही. बिलने तर डेट म्हणून तिला बोलावले आणि हॉटेलात झालेल्या बिलाचे निम्मे पैसे देताना ३२.२१ पौंड इतका काटेकोर हिशेब केला. वेटरला तिने दहा पौंड टिप म्हणून दिले तर तो किंचाळला, ''हे तू काय करते आहेस? एवढी टिप कधी देतात का?''

डेट म्हणून जॅकलिनला आपल्यापेक्षा कमी वयाचे तरुणच आवडत. आपली जीवनशैली आपल्या प्रत्यक्ष वयाच्या तुलनेने तरुण आहे असे तिला वाटे. कमी वयाच्या तरुणांमधील ऊर्जा विलक्षण असते असा तिचा अनुभव आहे. असा एक तरुण डॅन तिच्या जीवनात डेट म्हणून आला. डॅनने मुलासाठी आयव्हीएफचा मार्ग स्वीकारला पण तो अयशस्वी ठरला... डॅनचे आणि तिचे संबंध मग दुरावत गेले.

जॅकलिनने स्वच्छंद जीवन जगताना वेगवेगळ्या पुरुषांना जवळ केले तसेच दूरही लोटले.

पुढे टोनी नावाच्या तरुणाबरोबर ती राहू लागली. त्याच्याशी १९८० मध्ये तिने लग्न केले.

आपल्याला मूल हवे अशी तिची खूप इच्छा होती. त्यासाठी तिने खूप प्रयत्न केले. कृत्रिम उपायही असफल ठरले. त्यामुळे तिला नैराश्याने काही काळ ग्रासले. तरीही ''मी कोणाचे भक्ष्य किंवा सावज ठरण्याचे टाळले'' असे ती म्हणते.

तिला बालवयात आईचा छळ सोसावा लागला. जवळच्या नातलगांच्या लैंगिक शोषणालाही तोंड द्यावे लागले. तिच्या आईचे जॉन नावाच्या तरुणाशी प्रेमप्रकरण सुरू झाले; तर तिच्या वडिलांनी जॉनच्या बायकोशी, स्यूशी संबंध सुरू केले. त्यामुळे या दोन्ही जोडप्यांची मैत्री चांगली चालली असे जॅकलिन म्हणते. त्यावेळी जॅकलिन फक्त १२ वर्षे वयाची होती. पण वयाच्या मानाने ती लहान दिसायची. आपल्या दोन मुलींची ससेहोलपट होऊ नये म्हणून वडील आईच्या प्रेमप्रकरणाकडे दुर्लक्ष करीत होते - असे तिला पुढे वडिलांनी सांगितले. पण पुढे ही 'व्यवस्था'ही निकामी ठरली. जॅकलिनचे वडील घर सोडून स्वतंत्र राहू लागले. जॅकलिन त्यामुळे उद्ध्वस्त झाली. परंतु वडिलांनी एक मासिक चालवायला घेतले. त्यात शब्दकोडी

तयार करण्याचे काम जॅकलिनला दिले. त्यातून तिला थोडी कमाईही होऊ लागली. वडिलांनी गोल्डस्टार ही प्रकाशन संस्था सुरू केली.

जॅकलिनला जॉन मिठीत घेऊन तिचे चुंबन वगैरे घेई. तेव्हा तिला वैताग येईल. जॅकलिनला त्याची भीतीही वाटे. जॉन आपल्याशी कसा वागतो हे आईला ती सांगू शकत नसे. त्यामुळे जॅकलिनने घरातून पळून जाण्याचाही प्रयत्न केला. पण गस्तीवरच्या पोलिसांनी तिला वडिलांच्या घरी पोचवले. जॅकलिनची आई आणि जॉन यांचे लग्न १९८९ मध्ये झाले. जॉनला आपला सावत्र बाप म्हणून जॅकलिनने कधीच स्वीकारले नाही.

इ. स. २००२ मध्ये ॲन समर्स हे सेक्स शॉप आहे असे म्हणून जॉब सेंटर प्लस या रोजगार विनिमय संस्थेने ॲन समर्सच्या जाहिराती स्वीकारण्याचे थांबवले. ॲन समर्समध्ये तोपर्यंत दोन हजार कर्मचारी व सात हजार आयोजक काम करीत होते. जॉब सेंटर तरुणांना नोकरीची संधी नाकारत आहे असा आरोप करून ॲन समर्सने रॉयल कोर्ट ऑफ जस्टिसमध्ये राज्यमंत्री निक ब्राऊन आणि रोजगार - निवृत्तिवेतन खात्यावर दावा दाखल केला. हा दावा ॲन समर्सने जिंकला. त्यामुळे ॲन समर्सला खूपच प्रसिद्धी मिळाली. बीबीसीवर जॅकलिनची मुलाखत झाली. 'सेक्स शॉप'ची संचालिका म्हणून ॲन समर्सला वेगळी वागणूक देणे हे लिंगभेदाचे, पक्षपातीपणाचे आणि अन्यायाचे आहे ही तिची भूमिका लोकांपुढे आली.

ॲन समर्सच्या प्रतिमेला या निकालाने एकदम उजाळा मिळाला. पार्टी आयोजन करणाऱ्या तरुणींनाही आत्मगौरव वाटू लागला. त्यांचा आत्मविश्वास वाढला.

जॅकलिनला विविध परिषदांची आणि टीव्ही कार्यक्रमांची आमंत्रणे येऊ लागली. एक आदर्श स्त्री म्हणून तिला अनेक तरुणी आदर देऊ लागल्या. उद्योगाची प्रतिष्ठा वाढली.

हे पुस्तक लिहिले गेले तेव्हा (इ. स. २००६) ॲन समर्सची १४१ दुकाने होती. इंटरनेटवरूनही सेक्सची उपकरणे मोठ्या प्रमाणावर विकली जाऊ लागली. पार्ट्यांमधून होणाऱ्या विक्रीची टक्केवारी ३२ टक्के होती. लैंगिक खेळणी आणि अंतर्वस्त्रे यांच्या जोडीने इंटरनेटवरचे खेळ, डेटिंग, लैंगिक मार्गदर्शन, यातूनही कमाई चांगली होऊ लागली.

ॲन समर्स आणि जॅकलिन यांनी स्त्रियांच्या लैंगिकतेच्या जाणिवेला एक नवे बळ मिळवून दिले. सेक्सशॉपबाबतची लोकांच्या मनातली अढी दूर केली.

**किंमत : २२०रु.     सभासदांना : सवलतीत     पोस्टेज : २५रु.**

## पुस्तक परिचय

**महाभारतकालीन जनसामान्यांची जीवनशैली आणि जीवनमूल्ये यांचे मर्मभेदक दर्शन**

# कुरुक्षेत्रानंतर...




**महाश्वेतादेवी** अनु. वर्षा काळे

ज्ञानपीठ पुरस्काराच्या मानकरी महाश्वेतादेवी यांना भटक्या विमुक्तांबद्दल, आदिम जनजातींबद्दल आपुलकी आणि आस्था आहे. बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगड, बंगालमधील संथाळ वगैरे आदिम जातीजमातींमध्ये वास्तव्य करून, त्यांचे प्रश्न समजावून घेऊन, त्यांना मानवाधिकार मिळवून देण्याबाबत त्यांनी वेळोवेळी संघर्ष केला आहे, सरकारला आपली धोरणे बदलण्यास भाग पाडले आहे. महाराष्ट्रातही रामोशी, पारधी वगैरे भटक्या समजातील लोकांना जन्मजात गुन्हेगार ठरवून विशिष्ट वसाहतींमध्येच राहण्यास भाग पाडले गेले होते. ('बळी'मध्ये त्याचे प्रतिबिंब दिसते.) स्वातंत्र्योत्तर काळात या जमातींना गुन्हेगारीच्या शापापासून विमुक्त करण्यात आले असले तरी त्यांच्याकडे पोलिस यंत्रणा आणि बहुजनसमाज गुन्हेगार म्हणूनच आजही बघतो आहे ही वस्तुस्थिती आहे. कुठेही खून दरोड्याची घटना घडली तर आधी भटक्या विमुक्तांच्या वस्तीवर पोलिसांची धाड पडते आणि तेथील पुरुषमंडळींना पकडून आणण्यात येते. अशा महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांच्या मोर्चामध्येही महाश्वेतादेवी सहभागी झाल्या होत्या. 'उचल्या'चे लेखक लक्ष्मण गायकवाड यांना त्या आपला मानसपुत्र मानतात.

महाश्वेतादेवी यांनी 'महाभारता'च्या पार्श्वभूमीवरील तीन कथा दहा वर्षांपूर्वी लिहिल्या. बंगालमधील मासिकांतून त्या प्रसिद्ध झाल्या. 'आफ्टर कुरुक्षेत्र' या नावाने इंग्रजीत त्यांचे पुस्तक निघाले. त्या पुस्तकाचा 'कुरूक्षेत्रानंतर' हा मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकताच बाजारात आणला आहे.

हा अनुवाद बारबालांच्या प्रतिनिधी म्हणून कार्यरत असणाऱ्या प्रा. वर्षा काळे यांनी केला आहे, ही गोष्टही लक्षात घेण्यासारखी आहे.

मुंबईत डान्सबारवर बंदी घातल्यावर बारबालांच्या प्रश्नात महाश्वेतादेवींनी लक्ष घालावे म्हणून वर्षा काळे काही बारबालांसह त्यांना भेटायला गेल्या. त्या बारबालांच्या पुनर्वसनाबद्दल, सुरक्षिततेबद्दल चर्चा केली. त्या बारबालांमध्ये अनेक बंगाली तरुणीही होत्या; हे बघून महाश्वेतादेवींना आश्चर्य वाटले. त्यांनी त्यांची वास्तपुस्त केली... महाश्वेतादेवींच्या विचारांचा आणि दृष्टिकोनाचा प्रभाव वर्षा काळे यांच्यावर पडला, आणि 'ऑफ्टर कुरुक्षेत्र'मध्ये महाभारत घडून गेल्यावर, भारतीय युद्ध संपल्यावर त्याचे येथील जनसामान्यांवर, काय परिणाम झाले याचे चित्रण करणाऱ्या घटनांचे महाश्वेतादेवींनी केलेले चित्रण वर्षा काळे यांना विलक्षण अर्थपूर्ण वाटले; त्यामुळे त्याचे मराठी भाषांतर करण्याची इच्छा त्यांना झाली..

महाभारताकडे पाहण्यांचा महाश्वेतादेवींचा दृष्टिकोन वेगळा आहे. महाभारताच्या कौरवपांडवांच्या युद्धाला त्या धर्मयुद्ध मानतच नाहीत. हा निसर्ग प्रकोप नव्हता. भावाभावांमधील राजसत्तेबद्दलचा संघर्ष होता. सिंहासनावर कोणी बसायचे यावरून दोन भावांमध्ये निर्माण झालेल्या वादाची परिणती म्हणून लक्षावधी लोकांचा बळी

घेणारे हे युद्ध. याला धर्मयुद्ध का म्हणायचे असा प्रश्न महाश्वेतादेवींना पडतो. यात पांडवांची बाजू ही धर्माची बाजू मानली गेली खरी; परंतु या युद्धात कौरव-पांडव दोन्हीकडचे बहुतेक सर्व वीर मृत्युमुखी पडले. दोन्ही घराणी जवळजवळ निर्वंश झाली. कौरवांकडचे सर्व पुरुष धारातीर्थी पडले. धृतराष्ट्र तेवढा राहिला. पांडवांचा जय झाला. युधिष्ठिर सिंहासनावर बसला. अभिमन्यूची पत्नी उत्तरा त्यावेळी गरोदर होती. तिला मुलगा झाला तर तोच पुढे सिंहासनाचा हक्कदार होणार...

या युद्धाकडे पाहण्याचा सर्वसामान्य नागरिकांचा दृष्टिकोन काय होता?

''हे धर्मयुद्ध आमच्यासाठी नव्हतं. भावांनी भावांना मारलं. काकांनी पुतण्याला मारलं. शिष्यानं गुरूला मारलं. ही तुमची धर्माची कल्पना असेल, आमची नाही.'' असं युद्धात लढता लढता मरण पावलेल्या पायदळातील एका सैनिकाची विधवा म्हणते. हे युद्ध सत्ताधीश राजघराण्यात झाले. राजवृत्तातील उच्चवर्णीय क्षत्रिय, ब्राह्मण हे त्यावेळच्या समाजाचे अग्रणी. परंतु त्यांच्या बाजूने लढणारे सैनिक-शिपाई हे जनसामान्य. लोकवृत्तातील जातिसमूह. राजवृत्तातील दाखवले आहेत. परंतु त्याचबरोबर सर्वसामान्य लोकवृत्तातील जातिसमूहांचे, समाजघटकांचे या युद्धातील कर्तृत्व कविवर्य व्यासांना रंगवावेसे वाटले नाही, त्यांच्याकडे दुर्लक्षच केले गेले असे महाश्वेतादेवींना वाटते. महाभारतात तत्कालीन भारतीय जातिसमूहांचे उल्लेख आले आहेत, परंतु त्यांच्या कथांचा विस्तार केला गेलेला नाही. कुरुक्षेत्रावर जे अष्टादश अक्षोहिणी सैन्य उभे होते, आणि जे अखेरीस धारातीर्थी पडले ते पायदळी सैनिक, ते अनामिकच राहतात. त्यांच्या मुलाबाळांचे, त्यांच्या आईवडिलांचे, त्यांच्या बायकांचे काय? त्यांच्या शेतांचे, गावांचे, वस्त्यावाड्यांचे काय? त्याबद्दल व्यास मौन बाळगतात.

कुंती, द्रौपदी, सुभद्रा, उत्तरा, गांधारी या सर्वांच्या सुखदु:खाचे उदात्तीकरण झाले. पण महाश्वेतादेवींना पायदळातील लक्षावधी त्या सैनिकांच्या नात्यातल्या स्त्रियांचे दु:ख दिसते. इतक्या मोठ्या प्रमाणावर नरसंहार होऊनही हे जातिसमूह भारताच्या इतिहासात तग धरून राहिले. त्यांची जीवनमूल्ये काय होती? हे जनसमूह निसर्ग धर्माचा आदर करून जीवनाला स्वत:ला महान मानून, आपले कर्तव्यपालन करीत राहिले. राजवृत्तातील लोक व घराणी आणि लोकवृत्तातील जनसामान्य त्यांचा आशावाद या दोन समांतर संस्कृती एकाच वेळी नांदत असतात याकडे महाश्वेतादेवी लक्ष वेधतात.

युद्धानंतर राजघराण्यातील स्त्रिया आपल्या दु:खात चूर असतात, पण लोकवृत्तातील स्त्रिया वास्तवाचा स्वीकार करून जगण्याचे पर्याय शोधतात. त्यांच्यापुढचा मार्ग सरळ, स्पष्ट असतो. पायदळातील सैनिकांच्या मृतदेहांचा शोध न लागलेल्या, त्यामुळे स्वत:ला विधवा मानणाऱ्या, पंचकन्या उत्तरेच्या सख्या म्हणून राजप्रासादात

कामाला येतात. राजप्रासादात दासी म्हणून कायम रहाण्याचा आग्रह झुगारून त्या आपापल्या वस्तीत, आपापल्या शेतावर जायला उत्सुक असतात.

''आमचे पती पादातिक होते... आम्ही त्यांचे मृतदेह शोधत युद्धभूमीवर फिरत होतो. अठरा दिवसानंतर महात्मा विदुरांनी सगळ्या पादातिकांचे सामूहिक दहन केले... आम्ही त्या धगधगत्या धरतीला ओलांडून जाऊ शकत नव्हतो... नगरकुसाबाहेरील भाग आमच्यासारख्या अनेक स्त्रियांनी भरून गेला होता. आम्ही ओळखीचे चेहरे शोधत होतो. मद्रजाने आम्हाला इथे आणले... आता पृथ्वी शीतल झाली आहे. आम्ही तिला पार करून पलीकडे जाऊ शकतो...'' ही त्यांची धारणा असते.

''तुम्ही पलीकडे कशासाठी जाताय?'' या उत्तरेच्या प्रश्नावर या 'निषादिन' पंचकन्या जे उत्तर देतात ते जनसामान्यांची जगरहाटी स्पष्ट करणारे आहे.

''आम्ही आमच्या माणसात परत जाऊ. लग्न करू. आमच्याकडे पती मरण पावला तर दिराशी लग्न करण्याची प्रथा आहे. दीर नसला तर इतर कोणी ना कोणी... शेतं नांगरटीला आली असतील.. गुरांची आबाळ होत असेल. मृतजनांच्या चिरशांतीसाठी आम्ही विधी करू. आमच्यात ज्या विधवा पुनर्विवाह करतात त्यांचा कुटुंबात आदर केला जातो. त्या पतीच्या बरोबरीने सर्व कामे करतात. त्या जीवनाच्या गरजा कधीच नाकारत नाहीत. आम्हाला पती होते. आता नाहीत. आमच्या रडण्याने ते परत येणार नाहीत... आम्ही लग्न करू. मुलांना जन्म देऊ. निसर्गानं हे आम्हाला शिकवलं आहे... जीवनासाठी हे आवश्यक आहे.''

राजवृत्तातील स्त्रियांचे वैधव्यानंतरचे वैराग्य आणि लोकवृत्तातील स्त्रियांचे वैधव्यानंतरचे व्यावहारिक वास्तव याचे हे चित्रण महाश्वेतादेवींच्या दृष्टिकोनातले वेगळेपण अधोरेखित करणारे आहे. या दोहोंच्या जीवनशैलीतील अंतर स्पष्ट करणारे आहे.

'कुंती आणि निषादिन' ही कथा उच्चवर्णीयांच्या मूल्यव्यवस्थेचे एकांगी स्वरूप उघड करते. राजवृत्तातले जीवन कुंतीला उद्विग्न करत असते. गांधारी आणि धृतराष्ट्र यांच्यासह कुंती वानप्रस्थाश्रमात जाते. त्यावेळी जनसामान्यांना, निषादिनांना बघते. तेव्हा तिला आपण केलेल्या एका पापाची चुटपुट लागून राहते. आपला ज्येष्ठ पुत्र कर्ण याच्या जन्माचे रहस्य दडवून ठेवल्याच्या प्रमादाची बोच तिला सतावत असते. पाच पांडवांपासून हे रहस्य तिने लपवून ठेवले; तरीही युद्धाच्या आधी कर्णाची भेट घेऊन तिने कर्णाला दुर्योधनाऐवजी युधिष्ठिराचा पक्ष घेण्याबद्दल सांगितले. अर्जुनाशिवाय इतर पांडवांना इजा न पोचवण्याचे वचन कर्णाने तिला दिले.

आपण युधिष्ठिर, भीम आणि अर्जुन यांना जन्म दिला. पण आपला पती पंडू हा त्यांचा जनक नव्हता. नकुल, सहदेव या आपल्या सवतीच्या, माद्रीच्या मुलांवरही आपण प्रेमाचा वर्षाव केला. पण आपण धर्मशील आहोत का? आपण गांधारीसारखी

धर्मनिष्ठा आणि कर्तव्यनिष्ठा दाखवू शकलो नाही. कुरुक्षेत्रावर आपले पुत्र जिवंत राहिलेले पाहून आपण आनंद व्यक्त केला. द्रौपदी आणि सुभद्रा या त्यांच्या पुत्रांच्या मृत्यूने उद्ध्वस्त झाल्या होत्या पण त्यांचे सांत्वन करणे आपल्याला जमले नाही. ते गांधारीने केले. आपले शंभर पुत्र मारले गेले तरी गांधारी द्रौपदी-सुभद्रा यांच्या सांत्वनासाठी गेली. हे एक अटळ लिखित होते, आपण आपले पुत्र गमावले आहेत, आता कोणी कुणाचे सांत्वन करायचे? मन खंबीर करून शोक आवरा. मृत्यू हे एक शोकाचं महाकाव्यच आहे. पण आपण माता, भगिनी, कन्या आणि भार्या यांना जगावंच लागतं. दु:ख सोसतानाही जगण्यासाठी आपल्याला धैर्य आणि साहस यांची गरज आहे. कारण शोक हाच आपला आयुष्यभराचा सोबती बनणार आहे, यासारखे विचार कुंतीच्या मनात येतात. ते गांधारीचे श्रेष्ठपण ठसवणारे आहेत. ''गांधारीच्या धर्मभावाचा आणि सदाचरणाचा लवलेशही आपल्या अंगी नाही, ती केवळ आपल्या पुत्र-पौत्रांसाठी शोक करीत नव्हती,'' अभिमन्यूचा निष्प्राण देह स्वत:च्या मांडीवर घेऊन गांधारीने केलेल्या आक्रोशात कुंतीला जाणवले की जगातील सर्वच स्त्रियांच्या वतीने गांधारी युद्धाची, रक्तपाताची निर्भत्सना करीत होती.

कुंतीला या क्षणी आपण केलेल्या एका प्रमादाचे राहून राहून स्मरण होते. तो प्रमाद म्हणजे आपला पहिला पुत्र कर्ण याला जन्मत:च दूर लोटल्याचे. खरे तर कर्ण हा कुंतीचा एकमेव पुत्र असा होता ज्याच्या पित्याला कुंतीने स्वेच्छेने आवाहन केलेले होते. आणि तरीही कर्णाला पांडवांचा ज्येष्ठ भाऊ म्हणून नव्हे तर सूतपुत्र म्हणून जगावे लागले. त्या दिवशी आपण मूक राहिलो हे आपले सर्वात मोठे पाप होते या जाणिवेने ती व्यथितचित्त होते. कर्णाला आपण जन्म दिला खरा, पण मातृत्वाची जबाबदारी पार पाडली नाही. कर्णाला एकदाही जवळ घेतले नाही. मात्र कर्णावर अंत्यसंस्कार झाल्यावर कुंती युधिष्ठिराला सांगते, ''कर्णाकरताही तर्पण कर.माझ्या गर्भातून जन्मलेला तो माझा पहिला पुत्र होता. सूर्यपुत्र होता.''

या क्षणी अपराध भावनेने कुंतीला जगणेही निरर्थक वाटते. अगतिक वाटते. तिच्या सेवेत असणारी निषादीन - ती आपली कीव करीत आहे, आपल्याकडे करुणेने पाहत आहे या कल्पनेने खजिल होते.

वृद्ध निषादीन तिला म्हणते, ''आज पातकांची कबुली देऊन टाक. आम्ही निषादीन तुझी वाट पाहत होतो. अनेक वर्षे तुला शोधत होतो. आम्ही नगरात येऊ शकत नव्हतो. पण आता तूच या वनात आलीस. आमच्याकडे आलीस... तुझ्या सर्वात मोठ्या पातकाची कबुली तू अजून दिलेली नाहीस.''

''मी कर्णाबद्दल बोलले आहे.''

''ते पाप नाही. स्त्रीपुरुष एकत्र येऊन नवा जीव निर्माण करतात. तो निसर्गाचा नियम आहे. आम्ही लोकवृत्तातील माणसे जीवनाचा सन्मान करतो. मात्र आमच्या

लोकवृत्तात स्वत:च्या स्वार्थासाठी निरपराध लोकांना उपद्रव देणे किंवा त्यांचा संहार करणे हे सर्वांत मोठे पातक मानले जाते. तू अशा एका पापाची अपराधी आहेस.''

''मला तर असं कुठलं पातक केल्याचं आठवत नाही.''

''वारणावतातील लाक्षागृहात - तू आणि तुझे पाच पुत्र जळून मेल्याची अफवा उठवण्यात आली होती. ते एक कारस्थान होते. तेथे तुमच्याजागी वृद्ध निषादीन आणि तिचे पाच पुत्र खरे तर जळून मेले. त्यांना मद्य पाजून बेहोष करण्यात आले. ते निद्राधीन झाल्यावर भुयारी मार्गाने तुम्ही पळून गेलात पण जाण्याआधी लाक्षागृहाला आग लावून गेलात... ती वृद्ध निषादीन माझी सासू होती. मी तिची सून...''

''मग आता तुला काय हवेय?'' कुंतीचा प्रश्न.

''डोळ्याच्या बदल्यात डोळा ही राजवृत्ताची रीत... ती लोकवृत्तात चालत नाही. वन्य जमातीतल्या सहा निष्पाप जिवांना स्वत:च्या स्वार्थासाठी जाळून मारण्याचं पाप पण तुमच्या शब्दकोशात ते पापच ठरत नाही. आमच्या दृष्टीने मात्र तू, तुझे पुत्र, तुझे सर्व सोबती पापीच आहात... निसर्गनियमानं तुम्हाला शिक्षा हवीच... हे राळवृक्षाचं वन आहे आणि त्यात वणवा पेटलाय... तुमची यातून सुटका होणं अशक्य आहे.''

''निषादीन, मला क्षमा करणं शक्य नाही का?''

''क्षमायाचना करणं हे राजवृत्ताचं वैशिष्ट्य.... आम्हाला अशा गोष्टी कळत नाहीत. आम्ही या वनात आलो. या वनानं आम्हाला सांभाळलं... हा वणवा... हा अग्नी आपलं काम करील. नंतर पाऊस ज्वाला विझवील. होरपळलेली भूमी पुन्हा हिरवी होईल.''

शतपुत्रांना गमावणारा अंध धृतराष्ट्र आणि गांधारी भावनारहित, इच्छारहित. कुंतीसह सर्वजण अंतिमत: अग्निदेवाचे स्मरण करतात. मृत्यूची वाट शांतपणे बघत राहतात.

''वणव्याच्या ज्वालामध्ये जिवंत जळताना कुंती त्या मृत निषादिनीकडून क्षमायाचना करील का? राजवृत्तात निष्पापांच्या हत्येसाठी क्षमायाचना करतात का?'' असा प्रश्न लेखिका शेवटी विचारते आणि ''कुंतीला ते ठाऊक नव्हते.'' असा खुलासाही करून टाकते.

कुंतीला आपल्या जीवनातले सर्वांत मोठे पातक वाटते ते कौमार्यावस्थेत कर्णाला जन्म दिल्यावर, त्याचा त्याग केला हे. लाक्षागृहात एक वृद्ध स्त्री आणि तिची पाच तरुण मुले यांना जाळून मारण्यात आले हे तिच्या खिजगणतीतही नसते. अंतिम पर्वात तिच्याजवळ आलेल्या निषाद स्त्रीचा पती त्या लाक्षागृहातील आगीत भस्मसात झालेला असतो त्यामुळे तिला कुंतीचे तेच पाप मोठे असे वाटत असते. पांडवांनी कौरवांची दिशाभूल करण्यासाठी लाक्षागृहाला आग लावून पांडव त्यात जळून मेल्याचा त्यांचा समज व्हावा म्हणून रचलेला कट. त्यांचे संपूर्ण उत्तरदायित्व

या कथेत कुंतीवर टाकण्यात आले आहे.

महाश्वेतादेवींनी राजवृत्त आणि लोकवृत्त हे दोन समाजघटक कल्पून त्यांच्या जीवनशैलीतील आणि नीतिमूल्यांतील फरक दाखवला आहे. त्यांचा एकूण रोख लोकवृत्तातील सर्वसामान्य लोकांचा निर्सगाला धरून जगण्याचा मार्ग हा अधिक तर्कसंगत आणि वास्तव असा दाखवण्याकडे आहे.

गांधारी, कुंती आणि धृतराष्ट्र या तिघांच्या मृत्यूनंतर धृतराष्ट्राच्या दासीपुत्रांची काय अवस्था होते याचा एक नमुना 'सौवाली' या छोट्याशा कथेत दाखवला गेला आहे.

गांधारी बाळंतपणासाठी गेलेली असताना धृतराष्ट्राच्या सेवेसाठी एका वैश्य दासीची योजना करण्यात येते. तिला युयुत्सू नावाचा मुलगा होतो. युयुत्सूचा उल्लेख सौवाल्य असाही होतो. सौवाल्य धृतराष्ट्राचा पुत्र असला तरी त्याला दासीपुत्र म्हणूनच वागवले जाते. धृतराष्ट्राच्या मृत्यूनंतर त्याचे तर्पण करण्याचा अधिकार सौवाल्याला प्रथमच देण्यात येते. त्याचे सौवालीला समाधान वाटते. युयुत्सूला कुमारवयात गुरूगृही प्रशिक्षणसाठी पाठवले गेल्यावर सौवाली राजगृह सोडून नगराबाहेर स्वत:ची कुंटी बांधून राहते. पुढे युद्धाच्या वेळी सौवाल्य पांडवांची बाजू घेतो. दुर्योधनाने दासीपुत्र म्हणून त्याची सतत उपेक्षा आणि अवहेलना केलेली असते याचे शल्य त्याला कायम सतावत असते. आपण पांडवांचा पक्ष घेतल्याने आईला काय वाटेल अशी शंका सौवाल्याच्या मनात येते. पण ती त्याबद्दल समाधान व्यक्त करते. धृतराष्ट्र हा पिता असल्याने त्याचे तर्पण सौवाल्याने केले याचेही तिला समाधान वाटते. मात्र यापुढे जाऊन मृत पतीसाठी श्वेतवस्त्रे परिधान करून सुतक पाळण्याची तिच्या मैत्रिणीची सूचना ती धुडकावून लावते. ''धृतराष्ट्र हा आपल्या मुलाचा पिता होता. मुलाने आपले पितृकर्तव्य पूर्ण केले. मी केवळ दासी होते. धृतराष्ट्राची लग्नाची बायको नव्हते. मग मी का सुतक पाळायचे?... उलट मी तर आता पोटभर जेवून मुलाला जवळ घेऊन शांत झोपणार आहे.'' असे ती अहना या शेजारणीला सांगते. ''मला भूक लागली आहे. मी खाणार. मी राजप्रासाद स्वेच्छेने सोडला. राजप्रसादातल्या इतर दासी विधवेची श्वेतवस्त्रे घालून विधवांना योग्य असा अल्प आहार घेत असतील. त्याची चिंता मला नाही. राजगृहात मी एक दासी होते. येथे सामान्य माणसांमध्ये मी एक स्वतंत्र स्त्री आहे. योग्य-अयोग्य माझा स्वत:चा धर्म मला ठरवू दे.'' असे तिचे तर्कसंगत स्पष्टीकरण असते.

सौवाल्य हा आपला मुलगा - पण तो वेडा आहे; तो राजवंशाच्या चालीरीती पाळतो. तो पांडवांकडे गेला असला तरी पांडवही त्याला कधी आपला मानणार नाहीत - हे त्याला कधी कळेल असा प्रश्न तिला पडतो.

सौवालीच्या रूपाने एका स्वतंत्र स्त्रीच्या मानसिकतेचे दर्शन महाश्वेतादेवी घडवतात.

महाभारतात कौरव-पांडवांच्या मानसिकतेचे चित्रण व्यासांनी केले आहे. जनसामान्यांचे

चित्रण केलेले नाही. महाश्वेतादेवींनी दासी, सेवक वगैरे लोकवृत्तातील जनसामान्यांच्या भावभावनांचे आणि जीवनमूल्यांचे त्यावेळचे स्वरूप काय असेल याकडे लक्ष वेधले आहे. दुर्गा भागवत यांच्या 'व्यासपर्व'मध्ये आणि इरावती कर्वे यांच्या 'युगान्त'मध्ये महाभारतातील काही मोकळ्या जागा भरून काढण्याचा प्रयत्न झाला आहे. महाश्वेतादेवींनी जनसामान्यांच्या दृष्टीने महाभारताकडे बघितले तर काय दिसेल हे रंगवले आहे. उच्चभ्रू दांभिक राजसंस्कृतीपेक्षा निसर्गनियमांशी सुसंगत असणारी, अधिक मानवी अशी लोकसंस्कृती ही अधिक प्रामाणिक आणि प्रांजळ आहे असा त्यांचा विश्वास या कथांमधून उत्कटतेने प्रकट होतो.

**किंमत : ६०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**




# शल्य

मालती जोशी

**८०रु. पोस्टेज २०रु.**

वातावरण ढगाळ होते. झिमझिम पाऊस पडत होता. कमरेच्या उंचीइतके गवत सगळीकडे पसरले होते. गवतातल्या पायवाटेवरून एक लांब वेणी घातलेली बाई पळत पळत येत होती. तिच्या मागे एक काळा धिप्पाड माणूस धावत तिला पकडायचा प्रयत्न करत होता. त्याने दोन तीन टांगा टाकून तिला धरले. तिचा गळा आवळला. तिला दोन्ही हातांवर उचलून पडक्या घरामागच्या विहिरीत फेकले. त्याचा 'धप्प' असा मोठा आवाज झाला . त्याचवेळी वीज कडाडली.

अभिजितला एकदम जाग आली.

का हे स्वप्न आपल्याला वारंवार पडते आहे? आपला काय संबंध आहे ह्या सर्वांशी? काही काही स्वप्नांना अर्थ असतो म्हणतात. या स्वप्नाचा काय अर्थ असेल?

काही स्वप्ने सूचक असतात. भविष्यात घडणाऱ्या गोष्टी दर्शवणारे हे स्वप्न आहे का?

# पुस्तक परिचय

**नवजात बाळाची पहिली तीन वर्षे फार महत्त्वाची आणि मातृत्वाची कसोटी पाहणारी!**

# सुखद बालसंगोपन




**डॉ. रत्नावली दातार**

'सुखद मातृत्व' या पुस्तकानंतर डॉ. रत्नावली दातार यांनी 'सुखद बालसंगोपन' हे छोटेखानी पुस्तक लिहून नवजात अर्भकाची काळजी कशी घ्यावी याबद्दल सर्वांगीण मार्गदर्शन केले आहे. महत्त्वाच्या गोष्टी सूत्ररूपाने आणि नेमकेपणाने मांडल्यामुळे हे पुस्तक म्हणजे बालसंगोपनाच्या उपयुक्त टिप्सचा खजिनाच वाटेल. मातृत्वाचा प्रथमच अनुभव घेणाऱ्या महिलांनी ते संग्रही ठेवायला हवे.

बाळाच्या जन्मापासून ते तीन वर्षापर्यंतचा काळ हा त्याच्या मानसिक आणि शारीरिक वाढीच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाचा असतो, या काळात मुलांना कसे वाढवावे याबद्दलच्या पारंपरिक कल्पना आणि वैद्यकीय संशोधनातून नव्याने लक्षात आलेल्या गोष्टी यांच्यातही काही बाबतीत फरक पडलेला आहे. उदाहरणार्थ, नवजात बाळाला पहिले सहा महिने आईचे दूध पाजणे पुरेसे असते. जास्तीचे वेगळे पाणी किंवा अन्य काही पाजण्याची गरज नसते असे आजचे वैद्यकशास्त्र सांगते. भारतात आपण परंपरेने बाळाला तेल लावणे, मालिश करणे, धुरी देणे, काजळ घालणे, टाळू भरणे या गोष्टी अत्यावश्यक मानतो. परंतु ताज्या वैद्यकीय संशोधनातून असे लक्षात आले आहे की, तेलाने मालिश करण्याने बाळाच्या त्वचेवरील रंध्रे बंद होतात, कधीकधी तेलाने बाळाला ॲलर्जीचा त्रासही होतो, त्यामुळे तेलाने मालिश केले तरी सर्व तेल मऊ टॉवेलने पुसून घ्यावे आणि नंतरच आंघोळ घालावी असे सध्या डॉक्टर सुचवतात. धुरी देऊ नये. धुरीने बाळाला पुरळ येऊ शकतात. डोळ्यात काजळ घालू नये. काजळ घालण्याचे काम करणाऱ्या आजी किंवा दाई यांच्या बोटाला काम करून चरे पडलेले असतात, त्यामुळे बाळाच्या बुबुळावर चरे पडण्याची किंवा जखम होण्याची शक्यत असते. विषाणूबाधा होण्याचा तसेच डोळ्यात फूल पडण्याचा धोका असतो. काजळाने काहीही फायदा होत नाही असे म्हटले तरी ते वावगे होणार नाही. काजळाने डोळे काळेभोर होतात, नजर तीक्ष्ण व स्वच्छ होते हे पारंपरिक समज चुकीचे आहेत. बाळाला गुटी देण्याची पद्धत आपल्याकडे आहे. गुटी घासताना स्वच्छतेची पुरेशी काळजी घेतली जातेच असे नाही. त्यामुळे बाळाला जुलाब होऊ शकतात. बालसंगोपनाबाबतच्या आपल्या पूर्वापार चालत आलेल्या काही प्रथा नवीन वैद्यकीय संशोधनाच्या कसोटीवर बाद ठरतात. या पुस्तकात त्याबद्दल जागोजागी स्पष्टीकरणे देण्यात आली आहेत. त्यामुळे वैद्यकीय दृष्टीने अनावश्यक असणाऱ्या गोष्टींना फाटा देता येईल. चुकीच्या गोष्टींमुळे बाळाला होणारा त्रास टाळता येईल.

जन्मताना मूल पूर्ण वाढीच्या क्षमतेची सर्व गुणसूत्रे घेऊन येत असते. जीवनासाठी आवश्यक ती कौशल्ये ते क्षणाक्षणाला आत्मसात करीत असते. त्याबाबतचे त्याचे स्वत:चे एक वेळापत्रक किंवा प्रोग्रॅमिंग शेड्यूल असते.

पहिल्या महिन्यात बाळाला मान धरता येत नाही. मान डाव्या उजव्या बाजूला

तेवढी हलवता येते. झोपताना पाय पोटाशी घेता येतात. सरळ रेषेत डोळे किंवा मान स्थिर करता येते. ते आपले बोट मुठीत पकडू शकते आणि आईशिवाय इतर माणसांना बघू शकते.

दुसऱ्या महिन्यात आवाजाच्या दिशेने बघू शकते. स्मित करू शकते. मान वळवू शकते. हलणाऱ्या वस्तूकडे मान फिरवू शकते.

तिसऱ्या महिन्यात मान आणि छाती उचलते. थोडीशी मान धरू शकते. तोंडाने आ आ सारखा आवाज काढते. खेळण्यांकडे झेपावते.

चौथ्या महिन्यात मान धरते. कुशीवर वळू लागते. अंगठा चोखते. माणसे ओळखते, हसते, पायावर उभे केल्यास रेटा देते, आईला ओळखू लागते, गाणे ऐकते, दुधाखेरीज घन पदार्थ गिळण्याची क्रिया जमू लागते. वरचे दूध सुरू करता येते.

पाचव्या महिन्यात मांडीवर बसू शकते. दिसेल ती वस्तू तोंडात घालू पाहते.

सहाव्या महिन्यात हात पुढे टेकून बसवले तर बाळ स्वतंत्रपणे बसू शकते. आवडीची खेळणी घेते. इतरांना ओळखते, आवाज करते.

सातव्या महिन्यात बाळ लोळू लागते, रांगू लागते, बसू लागते, वस्तू पकडते. कडेवर घेतल्यास वा टेबलावर उभे राहू शकते. झडप घालून वस्तू पकडते. करंगळी आणि मरंगळी या बोटांच्या सहाय्याने वस्तूला पकडू पाहते.

नवव्या महिन्यात कशाला तरी धरून बाळ चालू लागते. घरभर रांगू लागते. दात येण्याची प्रक्रिया सुरू होते. वरचा व खालचा असे दोन दात आधी येतात. दोनतीन महिन्यांच्या कालावधीत आठ दात येतात.

अकराव्या महिन्यात बाळ एकदोन पावले चालू लागते. दादा, बाबा यासारखे शब्द बोलू लागते. चेंडूशी खेळू लागते. पाण्यात खेळायला आवडते. वस्तू बोटाच्या चिमटीत पकडू शकते...

एक वर्षाचे बाळ चाल चाल करते, आपला एक हात धरून चालू लागते. आपले आपण उठते, हाताने वस्तू घेते. शब्दसंपत्ती वाढते. अन्नपदार्थ खाऊ लागते. तिखट, गोड, आंबट वगैरे चवी कळू लागतात. उंची ७५ सेंमीच्या जवळपास पोचते. ही होणारी वाढ स्तिमित करणारी असते.

बाळ चालू लागणे, बोलू लागणे, वेगवेगळ्या हालचाली करू लागणे, शी-शूचे कळू लागणे, इतरांशी मिळू-मिसळू लागणे, हसू-खेळू लागणे, वर्षाचे बाळ हे सगळे थोड्याफार प्रमाणात करू लागले तर योग्य प्रकारे त्याची वाढ होत आहे असे म्हणता येते.

हे टप्पे वेळेवर अपेक्षेप्रमाणे साधण्यासाठी आईने व पालकांनी या वर्षभराच्या काळात बाळाला पावलोपावली मदत करावी लागते. बाळासोबत जास्तीत जास्त वेळ घालवा. त्याला कळो न कळो, त्याच्याशी गप्पा मारा, त्याच्याशी खेळा, त्याला चित्रे

व वस्तू दाखवा, पुस्तके वाचून दाखवा, गाणी म्हणा, बडबडगीते म्हणा, रंग दाखवा, पक्षी-प्राणी दाखवा. बोलताना त्याच्या डोळ्यात बघून बोला म्हणजे तुम्ही त्याला महत्त्व देऊन त्याच्याशी बोलताय हे त्याला समजेल. त्याने नव्याने आत्मसात केलेल्या गोष्टीबद्दल त्याचे कौतुक करा. त्याला शाबासकी द्या. त्याला जवळ घ्या. घरातल्या सर्वांशी त्याचे भावबंध जुळतील अशा प्रकारे वातावरण ठेवा. आजी-आजोबा, भावंडे यांच्याची त्याची जवळीक वाढू द्या. जेवताना वातावरण आनंदी ठेवा. पदार्थांची रंगसंगती साधा.

**''एक वर्षाचे मूल हे कुटुंबाच्या केंद्रस्थानी असते. त्याला महत्त्वाचे स्थान द्या. त्याच्याकडे आपले प्रेमळ लक्ष आहे हे त्याला जाणवू द्या. ''त्याला कुटुंबप्रमुख बनवून टाका'' असा मोलाचा सल्ला लेखिकेने दिला आहे.**

बाळाचे भावविश्व फुलविण्यासाठी आणि त्याच्या ज्ञानेंद्रियांचा विकास होण्यासाठी खेळण्यांचा वापर होऊ शकतो.

चिमणाळे, बॅट, खुळखुळा, वाटी, चमचा, गाडी, आवाज करणारी खेळणी, स्पार्क उडवणारी खेळणी, पक्षी-प्राणी, इंजिन-गाडी, अंक, अक्षरे, सॉफ्ट टॉइज, बाहुल्या, जोकर - खेळण्यांच्या द्वारे बाळाला आपल्या अवतीभवतीच्या विश्वाची ओळख होते. खेळणी हाताळताना त्याच्या स्नायूंना सराव होतो. हात, पाय, डोळे, अन्य अवयव यांचा वापर विविध प्रकारे करण्याची क्षमता वाढत जाते. खेळण्यांच्या आधारे मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना देता येते.

बाळाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही अनेक बाबतीत काळजी घ्यावी लागते.

बाळाचे अन्न म्हणजे मातेचे दूध. पहिले आठ-नऊ महिने केवळ आईचे दूध दिले तरी बाळाची वाढ चांगल्या प्रकारे होऊ शकते. पाणीदेखील वेगळे पाजावे लागत नाही. आज अमेरिकेतही तसा आग्रह धरला जातो. स्तनपानाला एकेकाळी नाक मुरडणाऱ्या आणि पावडरच्या दुधावर जास्त भरवसा ठेवणाऱ्या अमेरिकेत आज आईचे दूध हेच पूर्णान्न मानून त्याचाच वापर करण्यावर भर दिला जातो.

पाचव्या सहाव्या महिन्यापासून फळांचा गर, भाताची पेज वगैरे सुरू करायला हरकत नसते.

डॉ. रत्नावली दातार यांनी बाळाची आंघोळ, बाळाचे आजार, बाळाचे लसीकरण, बाळाचे दात येण्याची क्रमवारी वगैरे बाबींबद्दलची महिती तपशीलवार दिली आहे. १ ते ३ वर्षे या वयात बाळाची शारीरिक वाढ कशी होते, कुटुंबातल्या व्यक्तींशी त्याचे भावबंध कसे जुळत जातात, त्याचा आहार-विहार, त्याची झोप, त्याची भाषाशैली, शब्दसंपदा, पॉटी ट्रेनिंग, दैनंदिन आरोग्य, सवयी व शिस्त, स्वभावविशेष यांची वैशिष्ट्ये आणि त्याबाबत काळजी कशी घ्यावी याचेही विवेचन केले आहे.

काही मुलांमध्ये रागीटपणा, शीघ्रकोपीपणा, असूया, मत्सर वगैरे नकारात्मक

भावना मोठ्या प्रमाणावर जाणवतात. त्याबाबत काही उपाययोजना वेळीच करता आली तर व्यक्तित्वातील संवादीपणा साधणे कसे शक्य होईल याची दिशाही सूचित केली आहे. भावंडांशी वागताना काही मुलांमध्ये स्पर्धा व मत्सरभावना जास्त प्रभावी दिसते. त्याबाबतही काही दक्षता घेणे इष्ट ठरते. याकडे लेखिकेने लक्ष वेधले आहे.

मूल तीन वर्षाचे होईपर्यंत त्याच्या भावनिक, मानसिक आणि बौद्धिक वाढीचे बहुतांश काम झालेले असते. त्यामुळे या पहिल्या तीन वर्षात त्याची सर्वंकष वाढ निकोप व समाजातील सर्व घटकांशी सहजपणे संवाद साधणारी,सकारात्मक अशी व्हावी, त्याच्या ज्ञानेंद्रियांची ग्रहणक्षमता योग्य प्रकारे विकसित व्हावी याकडे लक्ष देणे श्रेयस्कर ठरते.

डॉ. रत्नावली दातार यांनी अगदी सूत्रात्मक भाषेत, मोजक्या शब्दांत मार्गदर्शन करून बालसंगोपनाचे उपयुक्त मॅन्युअलच वाचकांच्या हाती दिले आहे. 'बालसंगोपन : सुखद परिपूर्तीचा कानमंत्र' हे शीर्षक साथ आहे.

**किंमत : ६०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २०रु.**


# सर्कल ऑफ लाइट

**किरणजीत अहलुवालिया । राहिला गुप्ता**




किरणजीत अहलुवालियाची कहाणी ही खूपच भयानक व धक्कादायक असली तरी तिचा शेवट मात्र आश्वासक आहे.

अतिशय कठीण परिस्थितीतही जगण्याची दुर्दम्य इच्छा व आशावाद यांचं ज्वलंत उदाहरण म्हणजेच ही जीवनगाथा!

# मेहता पब्लिशिंग हाऊसची आगामी पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | अनुवाद |
| --- | --- | --- |
| **ज्याचं करावं भलं** | निरंजन घाटे | |
| **तरुणांनो होशियार** | निरंजन घाटे | |
| **स्वप्न चौर्य** | निरंजन घाटे | |
| **रोबॉट फिक्सिंग** | निरंजन घाटे | |
| **ज्ञानज्योती** | निरंजन घाटे | |
| **शास्त्रज्ञ आणि संशोधक** | निरंजन घाटे | |
| **असे शास्त्रज्ञ असे संशोधक** | निरंजन घाटे | |
| **अंतरीचा दिवा** : वि.स. खांडेकर | संपादन : डॉ. सुनीलकुमार लवटे | |
| **सुगरणीचं विज्ञान** | डॉ. बाळ फोंडके | |
| **मळ्याची माती** | आनंद यादव | |
| **जन्मठेप** | गिरिजा कीर | |
| **शब्द चर्चा** | एम.बी. कुलकर्णी | |
| **अन्नपुराण** | डॉ. अरविंद लिमये | |
| **आदिपर्व** | प्रमिला जरग | |
| **नीळकंठ** | स्नेहल जोशी | |
| **आनंदाचे पासबुक** | श्याम भुर्के | |
| **उद्ध्वस्त** | उमेश कदम | |
| **विज्ञानकथा** | संजय ढोले | |
| **ती दोघं** | डॉ. रमा मराठे | |
| **स्पर्श - कोडे उकलेल का?** | विनिता परांजपे | |
| **मंतरलेले काळे पाणी** | एस.एस. गाडगीळ | |
| **अस्मिता** | सूर्यकांत जाधव | |
| **ॲडम** | रत्नाकर मतकरी | |
| **निलांगिनी** | स्मिता पोतनीस | |
| **सूड** | नितीन बापट | |
| **केक्स** | अपर्णा परचुरे | |
| **युथेन्शिया** | स्वाती चांदोरकर | |
| **एका परिसाची कथा** | मिलिंद जोशी | |
| **दर्पणी पाहता रूप** | विद्युल्लेखा अकलूजकर | |
| **विज्ञानमंथन - सूर्य** | लीना दामले | |

| | | |
|---|---|---|
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **: स्वयंप्रेरणा** | -- | मीना टाकळकर |
| **: हायपरटेन्शन** | -- | मुग्धा गोखले |
| **: हार्ट अ‍ॅटॅक** | -- | ज्योतिका चितळे |
| **: आहार आणि आरोग्य** | -- | ज्योतिका चितळे |
| **स्लमगर्ल ड्रिमिंग (रुबिना अली - माय जर्नी टू द स्टार्स)** | | |
| | रुबिना अली | मैत्रेयी जोशी |
| **जिना : इंडिया-पार्टिशन-इनडिपेंडन्स** | जसवंतसिंग | अशोक पाध्ये |
| **डिजिटल फॉर्ट्रेस** | डॅन ब्राऊन | अशोक पाध्ये |
| **लेट्स किल गांधी** | तुषार गांधी | अजित ठाकूर |
| **शांताराम** | ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स | अपर्णा वेलणकर |
| **बेटर इंडिया बेटर वर्ल्ड** | नारायण मूर्ती | चित्रा वाळिंबे |
| **विल द आयर्न...** | अरुण शौरी | कॅ. राजा लिमये |
| **रुसी मोदी** : द मॅन हू ऑल्सो मेड स्टील | पार्थ मुखर्जी / ज्योती सबरवाल | अंजनी नरवणे |
| **पिरॅमिड** | टॉम मार्टीन | उदय भिडे |
| **टेन फिंगर्स फॉर गॉड** | डोरोथी क्लर्क विल्सन | नीला चांदोरकर |
| **अनकंडिशनल लव्ह** | नतालिया आगिआनो/ व्हॅनेसा होवार्ड | नीला चांदोरकर |
| **नेक्स्ट** | मायकेल क्रायटन | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **द फर्म** | जॉन ग्रिशॅम | अनिल काळे |
| **नथिंग टू लूज** | ली चाइल्ड | उदय कुलकर्णी |
| **पिंक सारी** | मोई संपतपाल | सुप्रिया वकील |
| **मीरेच्या प्रेमतीर्थावर** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **मीरा एक वसंत आहे** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **मीरा - भाग ३** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **मीरा - भाग ४** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **शिवसूत्र - भाग १** | ओशो | वृषाली पटवर्धन |
| **शिवसूत्र - भाग २** | ओशो | वृषाली पटवर्धन |
| **आवा मारु - टायटॅनिक ऑफ जपान** | रेई किमुरा | चारुलता पाटील |
| **ब्लड मनी** | ख्रिस कोलेट | वैशाली रानडे |
| **बिलॉन्गिंग** | समीम अली | सिंधु जोशी |
| **नष्टनीड** | रवीन्द्रनाथ टागोर | नीलिमा भावे |

# साधंसुधं

## निवृत्ती

**प्रमोदिनी वडके-कवळे**

दापोलीजवळचं हर्णे बंदर हे आमच्या अण्णांचं जन्मगाव. अण्णा तिथल्या गोष्टी अगदी रंगवून सांगायचे. त्या गोष्टीतल्या गमतीजमती अनुभवण्यासाठी मला हर्णेला जायला फार आवडायचं. आमचे देवही तिकडेच असल्यामुळे गौरीगणपती, नवरात्र अशा वेळी आमचं तिकडे जाणं व्हायचंच.

हर्णेचं आमचं घर खूप मोठं. मोठाले छपरी पलंग, लाकडी पेटारे, भाताच्या उंच कणग्या घरामागच्या रिंगीच्या झाडाची साबणासारखा भरपूर फेस देणारी फळं अशा आम्हाला अपूर्वाईच्या वाटणाऱ्या अनेक गोष्टी तिथे होत्या.

याशिवाय घरातल्या आणखी दोन गोष्टींचं मला फार आकर्षण होतं.

पहिली म्हणजे ओटीवर लावलेल्या देवांच्या तसबिरी. त्यातला एका तसबिरीत इंद्र आणि शिवाच्या भेटीचा प्रसंग रंगवलेला होता. त्या दोघांची समोरासमोर आलेली वाहनं मोठ्या खुबीने चितारली होती. म्हणजे नंदीबैल आणि ऐरावत हत्ती यांचं तोंड प्रत्यक्षात एकच होतं. पण आपण ज्या दृष्टीने पाहू तसं ते म्हणजे नंदीचं किंवा ऐरावताचं दिसायचं.

तिथली दुसरी गोष्ट म्हणजे काचेचं मोडकं विलायती झुंबर. का कोण जाणे पण आजोबा या झुंबराला फार जपायचे. आम्हाला ते हाताळू द्यायचे नाहीत. त्या झुंबराचे अनेक लोलक सुटे झालेले होते. आजोबांच्या कृपेने कधीतरी त्यातला एखादा लोलक थोड्या वेळापुरता हातात पडायचा. एक डोळा बारीक करून तो लोलक उन्हात डोळयासमोर धरला की समोरचं दृश्य एकदम रंगीबेरंगी होऊन जायचं. कुंपणाच्या वाळलेल्या वेड्यावाकड्या काड्याही इंद्रधनुष्यासारख्या सप्तरंगी दिसायच्या.

आज तो लोलक आणि ती तसबीर दोन्हीही उरलेली नाहीत. पण याक्षणी मला त्यांची खूप आठवण येतेय.

'साधंसुधं' च्या रूपाने तो लोलकच मोठेपणी माझ्या हातात आला आणि ती तसबीरसुद्धा! पुढच्या लेखाचा विचार करताना मी मागच्या आठवणी मनात खेळवायची

तेव्हा कितीतरी घटनांचे सप्तरंगी अर्थ माझ्या मनात नव्याने उलगडायचे.

एकच घटना वेगवेगळ्या कोनातून बघायचा मग चाळाच लागून गेला मनाला. असं म्हणतात की निसर्गाने मानवाला दिलेलं सर्वश्रेष्ठ वरदान म्हणजे विचार करण्याची कुवत. जी इतर प्राण्यांच्यात फारशी आढळत नाही किंवा मानवापेक्षा बरीच कमी आढळते.

पण मला वाटतं विचार करण्याच्या कुवतीपेक्षाही मोठ्या आणि अगदी वरदानच वाटाव्या अशा आणखी दोन गोष्टी  माणसाला निसर्गाकडून मिळालेल्या आहेत. ध्वनीपासून शब्द तयार करण्याची कला आणि हवं तेव्हा हसता येण्याची सिद्धी.

मांजर, कुत्रा, गाय, घोडे इ. पाळीव प्राण्यांना त्यांच्या धन्याने बोललेली भाषाही समजते म्हणतात. पण त्यांना विनोद समजतो की नाही हे मात्र अद्याप कुणी ठामपणे सांगू शकलेलं नाही. कारण त्यांना हसता येत नाही.

शब्दांचंही तेच! भाषा समजली प्रतिसाद देता आला तरी प्राण्यांना शब्दाने बोलता येत नाही.  प्राण्यांना स्वर आहे. त्यांना प्रसंगसूचक आणि केवळ त्यांनाच जमेल असा विशिष्ट ध्वनी काढता येतो हे खरंय पण त्यांना शब्द मात्र बनवता येत नाही. ते खास कौशल्य फक्त माणसाचं आणि माणसाचंच!

निसर्गाने दिलेल्या या विशेष वरदानाचा सुरेख वापर करून शब्दांना आपलं गुलाम बनवून त्यांना हवं तसं वाकवून वळवून माणसाने भाषेची निर्मिती केली आणि मनामनात संवादाचे पूल उभारले.

भाषा ही वाहत्या पाण्यासारखी आहे म्हणतात. ती वळवावी तशी वळते आणि रंगवावी तितकी खुलते.

मला हे अगदी  मनापासून पटतं. प्रत्येक भाषेत किती अर्थांचे, किती छटांचे आणि किती प्रकाराचे शब्द आहेत त्याची मोजदादच करता येत नाही. या समुद्रात जितकं खोल जावं तितकं अधिकाधिक थक्क व्हायला होतं.

तसं प्रत्येक भाषेचं आपलं असं एक सौंदर्य असतंच. त्याची सर दुसऱ्या भाषेला येत नाही; हे खरं असलं तरी माझ्या मऱ्हाटीचे बोल  काही वेगळेच.

साधा 'राम राम' हाच शब्द घ्या. कोणतंही जोडाक्षर नसलेला, केवळ दोन अक्षरं आणि दोनच काऱ्यांनी बनलेला सरळसोट शब्द. कितीही प्रयत्न केले तरी त्यातून कुणाला दुसरा अर्थही काढता येणार नाही.  मात्र या एकाच शब्दाचा वापर किती वेगवेगळ्या  प्रकारांनी करता येतो.

नामस्मरणाच्या पुण्यासाठी याच्याइतका साधासोपा दुसरा शब्द नाही.

दोन माणसं सहज समोर आली तरी स्वागताचा संवाद सुरू करणारा शब्द असतो रामराम..

एखाद्याचा निरोप घ्यायचा असला तरी हात जोडून म्हटलं जातं रामराम..

म्हणजेच भेटीची सुरुवात आणि शेवटही हा एकच शब्द वापरून करता येतो.

जिथे एखाद्या गोष्टीचा अंत होतो तिथेच दुसऱ्या कशाचीतरी नवी सुरुवात दडलेली असते; हे आपलं भारतीय तत्त्वज्ञान सांगून याच्यावरूनच आलं असेल का?

आज भरल्या लेखणीने मलाही एवढंच लिहावंसं वाटतंय. रामराम!

साधंसुधं मधला हा शेवटचा लेख!

निरोप घेताना अपरिहार्यपणे साधंसुधं या सदराची सुरुवात आठवतेय. अगदी सहज बोलण्यातून हे सदर जन्माला आलं. त्यातलं लिखाण साध्या विषयावरचं आणि हलकंफुलकं असावं एवढीच संपादकांची अपेक्षा होती. त्यामुळे त्याला नावतरी भारदस्त कशाला द्यायचं? म्हणून 'साधंसुधं'च ठरलं.

माझ्या मनात मात्र शंका होती. अशा सपाट नावाच्या आणि अगदीच साध्या घरगुती विषयावर लिहिलेल्या लेखनाला वाचकांचा प्रतिसाद मिळेल? की उगीच आपलं लिहायचं म्हणून पानभरती स्वरूपाचं काही लिहावं लागेल?

पण दुसरा लेख प्रसिद्ध झाला आणि अकल्पितपणे मला एक फोन आला. पलिकडून त्यांनी स्वत:चं नाव सांगताच 'हॅलो' म्हणण्यासाठी मी केलेला तोंडाचा चंबू तसाच राहिला. सुप्रसिद्ध लेखक सुमेध वडावाला यांचा फोन होता तो. माझ्या लेखाबद्दल ते खूप बोलले आणि मी अगदी भरभरून पावले. मनातली शंका थोडी निवल्यासारखी झाली. आपल्या लेखनाला प्रतिष्ठितांची तत्काळ दाद मिळणं हा केवढा थोरला आनंद असतो ते मी त्याक्षणी अनुभवलं.

मनातल्या समाधानाचा हा प्रवाह पुढे निरंतर झुळझुळत राहिला. रसिकांचे आणि मान्यवरांचे फोन, पत्र, कौतुक खूप खूप आनंद दिला मला या सदराने.

खरं तर सदर लेखन म्हणजे अळवाच्या पानावरचे मोती. ऊन आहे तोवर त्याच्या चकवकीतपणाने मन मोहून घेतं. पण वारा आला की त्याचं पाणीपाणी होऊन ओघळूनही जातं.

पण माझ्यासाठी मात्र साधंसुधं म्हणजे आनंदाचा तन्मणी झाला.

मनातलं काहीही मी समोर मांडावं आणि शब्दांवर प्रेम करणाऱ्या वाचकांनी त्याचं कौतुक करावं हा अनुभव सतत पाच वर्षे मी घेतला. माझ्याही नकळत हे सदर माझी जिवाभावाची सखी बनून गेलं.

कुणालाही सांगितल्या गेल्या नव्हत्या अशा आठवणी, कुणापाशी बोलू नये असे दुखरे सल, आणि एरवी बोलताना सांगितली तर अगदी फुसकी वाटतील अशी सुखंही मी यातून मांडली आणि वाचकांच्या प्रेमामुळे ती झळाळून उठली.

काही गोष्टी मी आजवर फक्त अनुभवल्या होत्या. आता मुद्दाम आठवून त्यावर

विचार करताना मला त्या मुळापासून कळत गेल्या. अर्थांचे वेगवेगळे पदर उलगडत गेले.

व्यक्तींबद्दलही तेच! माझी एक मैत्रीण अगदी अचानक गेल्याचं कळलं. गेली कित्येक वर्ष फारसा संवादही नव्हता आमचा. पण तिच्या मृत्यूबद्दल कळलं तेव्हा मनात तिच्या आठवणी आणि एकूणच मैत्रीच्या नात्याबद्दल इतकं काही दाटून आलं की मी जराही न अडखळता लिहीत गेले. त्या 'कच्चंकोवळं' ला प्रचंड दाद मिळाली. आपल्या मनातलं जसच्या तसं दुसऱ्यापर्यंत पोचावं. त्याच्याही मनाला ते भिडावं

लेखकासाठी यापेक्षा मोठं दुसरं पारितोषिक नसतं!

कमलताई आणि प्रभाकर पाध्ये यांच्यावरचा माझा लेख 'सोनेरी मुंगुस' असंच समाधानाचं पारितोषिक देऊन गेला.

'साधंसुध' ने मराठी वाचकांना काय दिलं किंवा साहित्यात भर घातली किंवा नाही हा प्रश्न मला आजवर पडलेला नाही आणि तो पडणारही नाही. पण 'साधंसुधं' ने मला मात्र अपार श्रीमंत केलं.

भा. ल. महाबळ, पां. ना. कुमठा, शशीकांत लावणीस, शं. ना. नवरे ह्यांच्यासारख्या मान्यवरांची जशी कौतुकपत्रं आली तशीच सर्वसामान्यांची जिव्हाळापत्रंही आली. अगदी ''आमच्या सुखदु:खांचं प्रतिबिंब तुमच्या लेखनात दिसलं.'' इथपासून ते ''माझी ही समस्या 'साधसुधं'मधे मांडलीत तर फार बरं होईल. कारण ती खूप जणांपर्यंत पोचेल.'' अशी विनंतीपत्रंही आली. साधंसुधं च्या टपालात जशी लेख आवडल्याचं सांगणारी पत्रं असायची तशीच एखादा लेख जमला नाही तर नाराजी दर्शवणारी पत्रंही असायची. एकमेकांना प्रत्यक्ष न पाहता अशी जवळीक.. हा मोकळेपणा.. यालाच खराखुरा संवाद म्हणतात का? तसं असेल तर आज माणसांमधला संवाद संपत चाललाय अशी हाकाटी का केली जावी?

'साधंसुधं'ने माझ्या दारी अशा संवादाचे कितीतरी साकव उभारले.

म्हणूनच आज निरोप घेताना मनात आहे ती तुडुंब तृप्ततेची आणि काठोकाठ कृतज्ञतेचीच भावना.

विचार ही मानवाला मिळालेली देणगी आहेच. त्या विचारशक्तीच्या सहाय्यानेच त्याने आपलं आयुष्य इतर प्राण्यांच्या मानाने सुकर बनवलंय. निवृत्तीची आणि भविष्य निर्वाह निधीची कल्पना हेही या विचारवृक्षाचंच फळ. आणि तृप्ततेच्या सशक्त क्षणी थांबायचा निर्णय घेणं हीदेखील त्या विचारशक्तीचीच देणगी.

माणसाच्या पूर्वजाला जे आजही जमलेलं नाही ते निवृत्तीच्या रूपाने माणसाने मिळवलंय. उत्तरायुष्य सोपं करण्याची सुविधा शारीरिक कष्ट दगदग झेपणार नाहीत त्या वयासाठी संचय करून ठेवण्याची कल्पना आजवर जे काही मिळवलं. ज्या सुखाच्या सवयी लावून घेतल्या त्यांना बाधा तर येणार नाही पण आपल्याला न

झेपणारे शारीरिक कष्टही करावे लागणार नाहीत या दोन नकारांचा सुवर्णमध्य काढून निवृत्तीची आणि भविष्य निर्वाह निधीची संकल्पना जन्माला आली असावी.

दरवर्षी पाऊस पडला की घर बांधायचा निश्चय करणाऱ्या मर्कटाच्या वंशजाला अशी कल्पना सुचावी ही एक गंमतीचीच गोष्ट म्हणायला हवी. आनंदाचा आणि कौतुकाचा भरपूर प्रॉव्हिडंट फंड जमा करून मीही आज निवृत्ती स्वीकारतेय.

अर्थात माझी ही निवृत्ती उदास रिकामपणा किंवा बथ्थड नाकर्तेपणा देणारी नाही हे मला चांगलं ठाऊक आहे.

कारण फक्त कामातूनच निवृत्त होता येतं.

आनंदातून नाही..

**प्रमोदिनी वडके-कवळे**

प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०, सुखसागरनगर क्र. २,

गल्ली क्र. १०, कोंढवा बुद्रुक, पुणे ४११ ०४८.

**आगामी**

**सोमाली माम** द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स




**सोमाली माम** अनु. भारती पांडे

स्वत:वर झालेल्या अन्यायामुळे, अत्याचारामुळे पेटून उठलेली निर्भर, निराधार सोमाली.

फक्त स्वत:ची सुटका करून ती थांबली नाही तर भ्रष्टाचारी समाजाच्या विरोधात उभं राहून तिनं अनेक जणींची सुटका करते.

तिचं आयुष्य चटका लावणारं, त्याहून अधिक थक्क करणारं आणि मनात आशेचा स्फुल्लिंग जागवणारं आहे.

# पुरस्कार

## * गुलजार यांना संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार

''राष्ट्रांच्या सीमारेषा केवळ राजकीय आहेत. या जमिनीवरील रेषांमुळे माणुसकी, संस्कृती व चांगुलपणा यांची कधीच वाटणी होऊ शकणार नाही. त्यामुळे त्या रेषा जमिनीवरच राहू द्या, त्यांना हृदयावर आखू नका,'' असे आवाहन प्रसिद्ध कवी, गीतकार गुलजार यांनी केले.

*'लकिरें हाथ में थी तो मुकद्दर थी, उन्हे हम बंद रखते थे.*
*जमींपर बिखरी तो समंदर, मुल्क, घर, आंगन को काँटके गुजरी.'*

या ओळी सादर करून गुलजार यांनी राष्ट्रांतील सीमारेषांचे वास्तवही मांडले.

सरहद संस्थेचा सातवा 'संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार' केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते गुलजार यांना देण्यात आला.

त्याचप्रमाणे 'लल देद राष्ट्रीय पुरस्कार' काश्मीर येथील प्रसिद्ध कवयित्री, गायिका शमीम देव आझाद यांना देण्यात आला. शमीम यांच्या वतीने त्यांचे पती व केंद्रीय आरोग्यमंत्री गुलाम नबी आझाद यांनी हा पुरस्कार स्वीकारला. एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. महापौर मोहनसिंग राजपाल, आमदार उल्हास पवार, लेखक दिग्दर्शक प्राण किशोर कौल, 'सरहद'चे संस्थपक अध्यक्ष संजय नहार, पुरस्कार समितीचे संतसिंह मोखा, ज्येष्ठ पत्रकार अनंत दीक्षित आदी यावेळी उपस्थित होते.

गुलजार म्हणाले, ''माझे मूळ पंजाब प्रांतात, तर फांद्या महाराष्ट्रात आहेत. या राज्यातील मातीने मला वाढविले. पाकिस्तानात जन्मलो असलो, तरी येथेच वाढलो व मोठा झालो. राष्ट्रांच्या या सीमारेषा केवळ राजकीयच आहेत. आम्हाला शांती हवी आहे. संस्कृती, चांगुलपणा, हवा, पाणी, आपापसांमध्ये वाटले पाहिजे. त्याला कोणतेही बंधन नको.'' या भावनिक आवाहनानंतर गुलजार यांनी राष्ट्रांच्या सीमारेषांचे वास्तव दाखविणारी 'आखोंको व्हिसा नही लगता, सपनोंकी सरहद नही होती' ही कविता सादर करून उपस्थितांना हेलावून टाकले.

आझाद यांनी सरहद संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. काश्मीरमधून अनाथ व

भूकंपग्रस्त भागातील मुलांच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांनी संजय नहार यांचे अभिनंदन केले. ''समाजात धर्माच्या, जातीच्या भिंती घातल्या जात आहेत. हा वाद राजकारणासाठी वाढविला जातो. अशा वेळेस गुलजार यांनी समाजाला मार्गदर्शन करावे,'' अशी अपेक्षा आझाद यांनी व्यक्त केली.

शिंदे म्हणाले, ''गुलजार यांच्या अंत:करणातच भारत आहे. आजचा हा कार्यक्रम राष्ट्र व धर्म यांना जोडणारा आहे. सर्वधर्माचे रक्षण करणे हाच आजचा धर्म आहे.''

संत नामदेवांनी दीर्घ काळ वास्तव्य केलेल्या पंजाबातील घुमान गावचे सरपंच सरदार हरबंससिंग यांचा या वेळी सत्कार करण्यात आला.

*** राज्य सरकारचे पुरस्कार**

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात महाराष्ट्रासह बृहन्महाराष्ट्रातील नवा लेखक नव्या जोमाने लिहित आहे ही गोष्ट कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांनी केले. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयातर्फे देण्यात येणारा श्री. पु. भागवत उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार औरंगाबादच्या साकेत प्रकाशनचे बाबा भांड यांना; तर उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मिती पुरस्कार राज्यातील ८८ नामवंत साहित्यिकांना एका समारंभात प्रदान करण्यात आले. यात दै. लोकसत्ता चे वरिष्ठ सहसंपादक श्रीकांत बोजेवार यांच्या 'दोन फूल, एक हाफ' या पुस्तकाला दत्तू बांदेकर पुरस्कार देण्यात आला.

अन्य पुरस्कारप्राप्त साहित्यिकांत माधव वझे, विजय पाडळकर, हेमंत जोगदेव, गिरिजा कीर, यशवंत रांजणकर, सुमेध वडावाला, आशा आपराद, किशोरी आमोणकर, ज्ञानेश महाराव, सांगलीचे बालसाहित्यिक श्रीनिवास शिंदगी, बॅडमिंटनपटू नंदू नाटेकर आदींचा समावेश होता.

पुणे येथे झालेल्या बॉंबस्फोटांच्या पार्श्वभूमीवर फारशी औपचारिकता न ठेवता अत्यंत साधेपणाने हा पुरस्कार वितरण सोहळा सांगली येथील विष्णुदास भावे नाट्यमंदिरात पार पडला. पुरस्कार विजेत्या साहित्यिकांना सांगलीचे पालकमंत्री डॉ. पतंगराव कदम, ग्रामीण विकास मंत्री जयंत पाटील, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. म. द. हातकणंगलेकर, आमदार संभाजी पवार, सुरेश खाडे, सांगलीचे जिल्हाधिकारी श्याम वर्धने, महापौर प्रा. नितिन सावगावे, नगरसेविका आशा शिंदे आदींच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

यावेळी पालकमंत्री डॉ. पतंगराव कदम म्हणाले, ''सांगली ही नाट्यपंढरीप्रमाणेच

साहित्यपंढरीही आहे. याच जिल्ह्यात ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, बालगंधर्व आणि शंकरराव खरात यांची स्मारके उभी राहात आहेत.''

सोहळ्याच्या प्रारंभी पुणे येथील बॉंबस्फोटात बळी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर देवल स्मारक मंदिराच्या कलाकारांनी नांदी गायिली. सांगली जिल्ह्यातील शाहीरांनी पोवाडा सादर केला. चार टप्प्यात पार पडलेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यात श्रीमती सई लळित यांनी मालवणी, सुभाष अहिरे यांनी अहिररणी, डॉ. मिर्झा बेग यांनी वैदर्भीय, प्रा. इंद्रजित भालेराव यांनी मराठवाडी कविता सादर केल्या. स्वागत महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयाचे संचालक अजय आंबेकर यांनी केले. सूत्रसंचालन नरेंद्र बेडेकर व हर्षा बागल यांनी केले.

*** श्री. पु. भागवत स्मृती पुरस्कार साकेत प्रकाशनास**



या वर्षीचा महाराष्ट्र शासनाचा श्री. पु. भागवत स्मृती उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार साकेत प्रकाशनास १४ फेब्रुवारी २०१० ला सांगली येथे देण्यात आला.

शासनातर्फे गेल्या वर्षीपासून मराठीतील उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार देण्याची सुरुवात झाली. स्मृती चिन्ह, मानपत्र आणि एक लक्ष रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

बाबा भांड आणि आशा भांड यांनी १९७५ मध्ये प्रकाशन संस्था सुरू केली. 'लागेबांधे' हे त्यांचे पहिले पुस्तक. त्या काळात मुंबई-पुणे हे प्रकाशनाचे मुख्य केंद्र होते. या केंद्राबाहेर औरंगाबादसारख्या ठिकाणी पस्तीस वर्षापूर्वी सुरुवातीस धारा आणि नंतर साकेत प्रकाशन संस्था सुरू झाली.

शिक्षणाची परंपरा नसलेल्या खेड्यातून आलेल्या बाबा भांड यांनी अगदी शून्यातून सुरुवात केली. बालपणापासून लेखन-वाचनाची ओढ. त्यातून पाचवी-सहावीत डायरी लिहून सर्जनशील लेखनाने सुरुवात केली. स्काऊटमधील राष्ट्रपतीपदक, जगप्रवास आणि पुढे स्वत:च सर्जनशील लेखन करून छोटी-मोठी पंच्याहत्तर पुस्तके लिहिली. उपेक्षित आदिवासी नायक तंट्या भिल्लाबद्दल जे मौलिक संशोधन केले त्याला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळून गौरविले गेले आहे.

वाङ्मयीन पुस्तकांसोबत शेती, फळबाग, पाणी व्यवस्थापन, पर्यावरण, विज्ञान, पर्यटन, खेळ, आरोग्य, सौंदर्य, छंद, चरित्र, अध्यात्म, आहार, योगासाधना,

व्यक्तिमत्त्व विकास आणि उत्तम बालसाहित्याचेही सातत्याने प्रकाशन केले.

निरक्षरांसाठी लेखन-वाचन साहित्य तयार करणे हे एक राष्ट्रीय काम आहे, हे काम त्या काळात सरकारी संस्थांद्वारेच प्रकाशन केले जाई. साकेत प्रकाशनाने हे राष्ट्रीय कर्तव्य ओळखून नवसाक्षरांसाठी प्रथमच साहित्याचे प्रकाशन केले. नवसाक्षरांसाठी पहिले पाक्षिक दहा वर्षे चालविले. मुलांसाठी सवंगडी मासिक चालविले. दोन्हीचे संपादन बाबा भांड यांनीच केले.

साकेतने एकूण प्रकाशित केलेल्या पुस्तकांत नव्या लेखकांच्या पहिल्या-वहिल्या पुस्तकांचे प्रमाण ६० टक्के आहे. आज महाराष्ट्रातील अनेक मान्यवर प्रथितयश लेखकांचे पहिले प्रकाशन साकेतने केले आहे. लेखक हा प्रकाशन संस्थेचा कणा असतो, त्या लेखकांचे लेखन स्वातंत्र्य जपणे, त्यांचा आदर करणे आणि योग्य मोबदला देणे ही साकेत प्रकाशनाची वैशिष्ट्ये आहेत. साहित्य अकादमी, महाराष्ट्र फाउंडेशन, बालसाहित्याचा राष्ट्रीय पुरस्कार, द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स दिल्ली, मराठवाडा साहित्य परिषदेचा रा. ज. देशमुख प्रकाशक पुरस्कार, अखिल भारतीय बालकुमार संमेलन उत्कृष्ट प्रकाशन असे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

लेखन प्रकाशनाबरोबरच बाबा भांड आणि आशा भांड यांनी समाजोपयोगी कामे केली आहेत. ग्रामीण विकासांतर्गत जन्मगावी आजू-बाजूच्या आठ गावात 'पाणी अडवा, पाणी साठवा' हा पाणलोटक्षेत्राचा प्रकल्प १९९० ते १९९५ सालात राबविला. खेड्यातील अपंग, मूकबधिर गरीब मुलांसाठी १९९० पासून निवासी शाळा चालविली. जन्मगावात वाचनालय सुरू केले. निराधार पुरुष-महिलांसाठी वृद्धाश्रम काढला. सुरुवातीच्या काळात टप्प्याटप्प्याने ह्या प्रकल्पासाठी साकेत प्रकाशनने पंचवीस लक्ष रुपये विविध प्रकल्पांत खर्च केले.

बाबा भांड यांच्याबरोबरच मुलगी धारा, मुलगा साकेत आणि सून सौ. प्रतिमा हे तिघे साकेत प्रकाशनाची धुरा सांभाळत आहेत. साकेत प्रकाशनाने अलिकडेच पुणे येथे ग्रंथदालन सुरू केले आहे. तसेच 'साकेत ग्रंथवार्ता' हे संस्थेचे मुखपत्रही सुरू आहे.

### * यशवंत देव यांना 'स्वरगायत्री' पुरस्कार

शंकरराव भोई स्मृती प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ, लेखक, कवी व संगीतकार यशवंत देव यांना 'स्वरगायत्री' पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले, उस्ताद सैबुद्दिन डागर खाँ, प्रभारी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ उपस्थित होते.

उस्ताद खाँ व बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते देव यांना देण्यात आलेल्या या

पुरस्काराचे स्वरूप पुणेरी पगडी, मानपत्र, सन्मानचिन्ह असे आहे. श्रीराम साठे, श्रीकांत पारगावकर, जितेंद्र भुरुक, विजय केळकर, राजेश दातार यांना 'स्वरगायत्री गौरव' पुरस्कार देण्यात आला.

यशवंत देव म्हणाले की, 'अध्यात्म हे विज्ञानच आहे. ऋषीमुनींनी स्वानुभव यात मांडले आहेत. परंपरा म्हणजे धर्म नव्हे. आपला भारत महान, पठण संस्कृतिशून्य. नुसता स्वर किंवा नुसते शब्द आनंद देऊ शकत नाहीत. त्यासाठी त्यांचा संयोगच घडावा लागतो.'

बाबासाहेब पुरंदरे म्हणाले, ''कलाकार म्हणजे ईश्वराचा अंश. दोघांकडेही नवनिर्माणाची शक्ती असते. यशवंत देवांची सर्वच गाणी आजही ताजी, टवटवीत आहेत. त्यांच्या संगीतरचनांनी आम्हाला मोहिनी घातली आहे.'' अच्युत गोडबोले यांनी यशवंत देव यांच्या गाण्यांनी आपले आयुष्य समृद्ध केल्याचे सांगितले.

### * 'मधुरिता सारंग स्मृती सन्मान'

''समीक्षक या नात्याने सुरेश भट यांच्या मधुराभक्तीवर आधारित काव्याचे सौंदर्य मला कळले. या कवितांवर आधारित नृत्यमालिकेची निर्मिती केली असती, तर या काव्यातील लावण्य जाणवेल आणि वाङ्मय, संगीत आणि नृत्य या कलांचा संगम भटांच्या माध्यमांतून साकारला जाईल,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

मधुरिता सारंग स्कूल ऑफ कथकतर्फे कुलकर्णी यांच्या हस्ते ज्येष्ठ कथक गुरू डॉ. पुरू दधीच आणि ज्येष्ठ गायक पं. अजय पोहानकर यांना 'मधुरिता सारंग स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

कुलकर्णी म्हणाले, ''भटांच्या कवितेचे वाङ्मयीन आकलन मला झाले. 'चल ऊठ रे मुकंदा झाली पहाट झाली', 'आज गोकुळात रंग खेळतो हरी' आणि 'मी मज हरपून बसले गं... आज पहाटे श्रीरंगाने मजला पुरते लुटले गं' या त्यांच्या गीतांमध्ये मधुराभक्ती दिसते. मी नर्तक किंवा नृत्यसंयोजक असतो तर त्यांच्या मधुराभक्तीवर आधारित २७ गीतांवर नृत्यमालिकेची निर्मिती केली असती.''

दधीच म्हणाले, ''माणसाच्या भावनांचा उत्कर्षबिंदू म्हणजे नृत्य. आपल्या देशात आंगिक अभिनयाच्या आणि भाषेच्या माध्यमातून नृत्य विकसित झाले.''

### * 'पद्मभूषण' श्रीनिवास खळे

''जे काही मिळाले, त्याबद्दल आपण समाधानी आणि आनंदी आहोत. मला मिळालेला पद्मभूषण पुरस्कार म्हणजे माझ्या गुरूंचा सन्मान आहे,'' अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे यांनी 'पद्मभूषण' पुरस्कार जाहीर झाल्यानंतर व्यक्त केली.

ते म्हणाले, ''मला अभिनंदनाचे अचानक फोन येऊ लागले. टीव्हीवर बातमी पाहिल्यानंतर आश्चर्यचकित झालो. माझ्या कामाची दखल प्रेक्षकांनी आधीच घेतलेली आहे. बडोदा येथील भारतीय संगीत महाविद्यालयात १९४० मध्ये गाणे शिकायला जाऊ लागलो. मधुसूदन जोशी, अताहुसेन खाँसाहेब असे माझे गुरू. माझ्यातील शास्त्रीय गायनाचा पाया परिपक्व होण्यात त्यांचा मोठा हात आहे, त्यामुळे हा सन्मान माझा नसून त्यांचा आहे.''

''पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याचे कळले आणि खरोखर माझे मन भरून आले. कारण माझ्यासाठी ही खूप मोठी अभिमानाची बाब आहे,'' असे सैफ अली खानने सांगितले; तर ''आपला आनंद द्विगुणित झाला आहे, कारण एकीकडे माझा 'थ्री इडियटस' चित्रपट धुवांधार यश मिळवत आहे आणि त्यातच हा पुरस्कार म्हणजे दुधात साखर घालण्यासारखे आहे,'' असे आमीर खान म्हणाला.

*** अत्रे स्मृती प्रतिष्ठानच्या पुरस्कारांचे वितरण**

आचार्य अत्रे आणि पु. ल. देशपांडे यांनी साक्षर झाल्याचा खरा आनंद समाजाला दिला. लेखणीतून आणि भाषणातून विनोदनिर्मिती करून जीवनात हास्य निर्माण करण्याचे काम केले असल्याची भावना भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते प्रकाश जावडेकर यांनी आचार्य अत्रे स्मृती प्रतिष्ठान आयोजित हास्य-विनोद-आनंद महोत्सवात व्यक्त केली. विविध क्षेत्रांतील व्यक्तींना आचार्य अत्रे पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. द. ना. धनागरे, धनराज वंजारी, सुहास बारटक्के, प्रेमानंद गज्वी, बबन पोतदार, आदेश बांदेकर, वैजनाथ दुलंगे, जीवनकला, श्रीनाथ भीमाले, शैलजा कुलकर्णी, माधवी कुंटे यांना जावडेकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, एक हजार एक रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

''मी केवळ कालच्या दिवसाशीच स्पर्धा केली. इतर कोणाशीही कधीच स्पर्धा केली नाही. दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमानिमित्त राज्यभर लाखो किलोमीटरचा प्रवास केला. या दरम्यान प्रेक्षकांनी दिलेल्या प्रेमामुळेच इथपर्यंत पोहचलो'' अशी भावना बांदेकर यांनी व्यक्त केली. ॲड. बाबूराव कानडे यांनी सूत्रसंचालन केले.

*** बालकुमार साहित्य संस्थेचे पुरस्कार**

'२२वे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन' संगमनेर येथे झाले. त्यामध्ये 'उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कारा'चे वितरण करण्यात आले.

पुरस्कार मिळालेल्यांची नावे पुढीलप्रमाणे

प्रतिमा विश्वास - जळगाव - किलबिलणारे झाड (काव्य) - ग. ह. पाटील पुरस्कार,

नीलम माणगावे - जयसिंगपूर - डॉलीची धमाल (कादंबरी) - जोशी पुरस्कार,

शरयू सोनावणे - पुणे - कपिला निघाली मुंबईला (बालकथा) - वा. गो. आपटे पुरस्कार,

शैलजा काळे - नागपूर - खण खण कुदळी (किशोरकथा) - दयार्णव कोपर्डेकर पुरस्कार,

वेदवती जोशी - पुणे - पिल्लू (शिशुकथा) - वेणूताई अरगडे पुरस्कार,

श्रीकांत नाईक - गडहिंग्लज - मुलांचे डॉ. जे. पी. नाईक (चरित्र) - स. गो. देसाई पुरस्कार,

मेधा इनामदार - पुणे - छान छान नाटुकल्या (एकांकिका) - रा. वा. शेवडे गुरुजी पुरस्कार,

निर्मला मठपती - सोलापूर - गुणी मुलं (ललित लेख, व्यक्तिचित्र) - सुलोचना नातू पुरस्कार,

सतीश पाध्ये - शब्दवेध प्रकाशन - कोल्हापूर (प्रकाशन) - बा. रा. मोडक पुरस्कार,

मदन हजेरी - राजापूर - (बालसाहित्य जत्रा) - दिनकर लोखंडे पुरस्कार,

बाबा भांड - औरंगाबाद - सदा को आणि कागदी बगळे (स्वैर रूपांतर) - मेहता प्रकाशन पुरस्कार,

ल. म. कडू - गमभन प्रकाशन - पुणे (सजावट) - सर्जेराव जगताप पुरस्कार,

मिलिंद परांजपे - ज्योत्स्ना प्रकाशन - नदीकाठी ससुला (स्वैर अनुवाद) भा. रा. भागवत पुरस्कार,

अशोक पाटील - कोल्हापूर - ज्ञानदीप (प्रथम प्रकाशन) कार्ले गुरुजी पुरस्कार,

लर्न मोअर - संगमनेर (दिवाळी अंक) - बालमित्र मासिक पुरस्कार,

प्रा. प्रकाश बोकील - पुणे - ई. बोधकथा (विज्ञान) - श्री. बा. रानडे पुरस्कार,

सुभाषचंद्र वैष्णव - बालेवाडी - खादाड खंडू (नाटक) - चिं. वि. जोग पुरस्कार,

माधव खरे - पुणे - विमान कसे उडते (छंद) - बा. मा. भिडे पुरस्कार.

**दिवाळी अंक उत्कृष्ट कविता पुरस्कार**

एकनाथ आव्हाड (किशोर) आय म्या रोज साळंत जाईन,

संगीता बर्वे (किशोर) ससेभाऊ, माया धुप्पड (लर्न मोअर) दिवाळी.

**दिवाळी अंक उत्कृष्ट कथा पुरस्कार**

प्रा. प्रवीण दवणे (लर्न मोअर) फुलण्यात मौज आहे,

कल्पना कुलकर्णी (किशोर) नीरजा, आबा महाजन (किशोर) बोकम काला.

परीक्षक म्हणून मदन हजेरी, राधिका लोखंडे, गोविंद गोडबोले, बाबूराव शिरसाट यांनी काम पाहिले.

### * आदित्य प्रतिष्ठानचे पुरस्कार

''अध्यात्म व तंत्रज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून, त्यांचा उपयोग समाजासाठी झाला पाहिजे,'' असे डॉ. मिलिंद भोई यांनी मत व्यक्त केले. कोंढवा बुद्रुक येथील आदित्य प्रतिष्ठानच्या दशकपूर्ती वर्षानिमित्त 'सेवा गौरव पुरस्कार' आणि 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' देण्यात आले.

विश्वास सुदामराव समगीर यांना सेवा गौरव पुरस्कार, सुरेश मोरे यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार तसेच आशिष पानसकर या विद्यार्थ्याला आयटी स्कॉलर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सामाजिक कार्यात सहभागी होणारे कुटुंब म्हणून सौ. कल्पनाताई साळवे व सुखदेव साळवे यांचाही सत्कार करण्यात आला.

### * अच्युत गोडबोले यांना 'डॉ. पारनेरकर अर्थशास्त्र पुरस्कार'

डॉ. रामचंद्र पारनेरकर यांच्या विचारांना मूर्त स्वरूप देऊन, त्यांचा प्रसार करण्यासाठी 'पूर्णवाद लाईफ मॅनेजमेंट इस्टिट्यूट' या संस्थेच्या वतीने दिला जाणारा 'पारनेरकर अर्थशास्त्र पुरस्कार' या वर्षी अच्युत गोडबोले यांना ता. ३१ जानेवारी रोजी के. सी. महाविद्यालयाच्या सभागृहात देण्यात आला. पारनेरकर यांनी आपल्या 'पूर्णवादी अर्थशास्त्र' या छोटेखानी प्रबंधातून 'जोपर्यंत माणसाला आपले अन्न दुसऱ्याच्या मर्जीने मिळवावे लागत आहे, तोपर्यंत मानवता ही परावलंबीच राहणार,' असे विचार मांडले आहेत.

### * दादा खडीवाले यांना 'शताब्दी महर्षी' पुरस्कार

दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या आयुर्वेद परिषदेत ज्येष्ठ आयुर्वेदतज्ज्ञ प. य. तथा वैद्य दादा खडीवाले यांना 'शताब्दी महर्षी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यानिमित्त 'एकता ट्रस्ट' व मासिकातर्फे स्वामी स्वरूपानंद यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पुणे विद्यापीठाचे माजी उपकुलगुरू डॉ. शं. ना. नवलगुंदकर, पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिर देवस्थान समितीचे अध्यक्ष ॲड. शशिकांत पागे, उल्हास ढोले-पाटील, डॉ. विजय डोईफोडे, डॉ. नंदकुमार देशमुख, लक्ष्मी खडीवाले, धूतपापेश्वर आयुर्वेद कंपनीचे प्रमुख रणजित पुराणिक, आमदार गिरीश बापट, एकता ट्रस्टचे डॉ. शरद कुंटे, विद्याधर ताटे या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

''आयुर्वेद उपचारपद्धतीला जागतिक पातळीवर विशेष स्थान प्राप्त करून देण्यासाठी सत्ताधारी व राजकीय मदतीची अपेक्षा न ठेवता या क्षेत्रातील सर्वांनी संघटितपणे प्रयत्न करायला हवेत,'' अशी अपेक्षा स्वामी स्वरूपानंद यांनी व्यक्त केली.

दादा खडीवाले म्हणाले, ''आयुर्वेदाच्या शक्तीचा अनुभव गेली चाळीस वर्षे मला येत आहे. या माध्यमातून गरजूंपर्यंत हे उपचार पोचविण्याचा प्रयत्न चालू आहे. आज झालेल्या सत्काराचे श्रेय आयुर्वेदाच्या याच शक्तीला आहे.''

*** डॉ. रमेश गोडबोले यांना निसर्गमित्र पुरस्कार**

डॉ. रमेश गोडबोले यांना 'ॲड-व्हेंचर फाउंडेशन व मारुती चितमपल्ली निसर्गमित्र पुरस्कार' ता. २८ जानेवारी रोजी सिंबायोसिसच्या विश्वभवन सभागृहात हिवरे बाजारचे सरपंच पोपटराव पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यापूर्वी हा पुरस्कार चिपळूण येथील भाऊ काटदरे, वनस्पतितज्ज्ञ प्रा. श्रीधर महाजन, पक्षितज्ज्ञ डॉ. सतीश पांडे यांना देण्यात आला आहे. या वेळी 'स्मृतिवन'चे पॅथॉलॉजिस्ट आणि निसर्गसेवक संस्थेचे अध्यक्ष श्री. गोडबोले यांची निवड झाली.

'जंगलातील दिवस' या चितमपल्ली यांच्या निसर्ग साहित्यावर आधारित पुस्तकाचे 'अभिवाचन' करण्यात आले.

*** रमणलाल शहा, डॉ. अभ्यंकर यांना 'मंदाश्री पारितोषिक'**

पं. दादासाहेब जकातदार प्रतिष्ठानतर्फे पं. श्रीकृष्ण जकातदार यांच्या स्मृतीदिनानिमित्त देण्यात येणारे 'मंदाश्री पारितोषिक' यंदा सातारा येथील ज्योतिर्विद प्रा. रमणलाल शहा व ठाणे येथील प्राध्यापिका डॉ. सुप्रिया अभ्यंकर यांना दि. ७ फेब्रुवारी रोजी भारत इतिहास संशोधन मंडळाच्या सभागृहात गीता धर्म मंडळाच्या अध्यक्षा कल्याणी नामजोशी यांच्या हस्ते देण्यात आले. या प्रसंगी शाहू मोडक प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रतिभाताई मोडक, डॉ. वा. ल. मंजूळ, चंद्रकांत शेवाळे उपस्थित होते.

*** साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचे पुरस्कार**

साहित्यातील योगदानाबद्दल शुभांगी भडभडे यांना 'मालतीबाई दांडेकर पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. भडभडे यांच्या वतीने डॉ. मालती निमदेव यांनी पुरस्कार स्वीकारला.

''लिखाणाने मला निरामय व्यग्रता दिली. आजवर बरेच लिहिले आणि अजूनही लिहिण्याची इच्छा आहे. म्हणूनच मला ज्या क्षणी लिखाणासाठी काही नवे सुचते तेच क्षण माझ्यासाठी सर्वांत श्रीमंत आहेत.'' अशा शब्दांत ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले यांनी आपल्या भावना साहित्यप्रेमी भगिनी मंडळ पुरस्कार वितरण कार्यक्रमात व्यक्त केल्या.

गोडबोले म्हणाल्या, ''लहानपणापासून वाचनाची आवड होतीच; पण भाषेवर अतिशय प्रेम होते. पु. ल. देशपांडे आणि विजय तेंडुलकर यांच्या साहित्याचा विलक्षण प्रभाव होता. साहित्याची भाषा, जग वेगळे आणि दैनंदिन जीवन वेगळे हा

समज पु. लं.च्या साहित्यामुळे दूर झाला. सद्य:स्थिती, त्यातील प्रसंग, समस्या यावर मी माझ्या लिखाणात भर दिला. एकाच माध्यमात अडकून न पडता मासिके, वर्तमानपत्रे, आकाशवाणी अशा अनेक माध्यमांमध्ये काम केले.''

### * 'स्लमडॉग मिलिनेअर'च्या गाण्यांसाठी दोन पुरस्कार

गेल्या वर्षी 'ऑस्कर' मिळविण्याचा पराक्रम करणारा संगीतकार ए. आर. रेहमान याने यंदा 'स्लमडॉग मिलिनेअर'साठीच दोन ग्रॅमी पुरस्कार मिळविले. 'जय हो' या गाण्यासाठी गीतकार गुलजार आणि तन्वी शाह यांनाही हा पुरस्कार मिळाला.

गेल्या वर्षी झालेल्या ऑस्कर सोहळ्यात रेहमानला 'स्लमडॉग' साठीच दोन 'ऑस्कर' मिळाले होते. यंदा त्याच चित्रपटासाठीचे संगीत आणि 'जय हो' हे गाणे, या दोन्ही विभागांतील ग्रॅमी पुरस्कारांवर त्याने नाव कोरले. 'ग्रॅमी' हे संगीत क्षेत्रातील 'ऑस्कर'च्याच दर्जाचे पुरस्कार मानले जातात. रेहमानला गेल्या वर्षी 'ऑस्कर'बरोबरच 'गोल्डन ग्लोब' आणि 'बाफ्ता' पुरस्कारही मिळाले होते. 'ग्रॅमी'वर त्याच्या नावाची मोहर प्रथमच उमटली आहे. ''हे अविश्वसनीय आहे. परमेश्वर पुन्हा दयाळू झाला आहे. जगातील माझ्या सर्व हितचिंतकांमुळेच मी इथपर्यंत मजल मारू शकलो. जय हो इंडिया!!'' अशी भावना रेहमानने हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केली. 'जय हो' या गाण्याचे हिंदीतील गीतकार गुलजार आणि इटालियन गीतकार तन्वी शाह यांनाही रेहमानसह हा पुरस्कार मिळाला आहे. सरोदवादक अजमल अली खाँ आणि तबलानवाझ उस्ताद झाकिर हुसेन यांना मात्र 'ग्रॅमी' पुरस्काराने चकवा दिला.

### * पु. बा. आणि ताराबाई साठे पुरस्कार

निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या 'मिळून साऱ्याजणी'तर्फे देण्यात येणारा 'पु. बा. आणि ताराबाई साठे पुरस्कार' विदर्भकन्या करुणा फुटाणे यांच्या हस्ते सांगली येथील 'संग्राम' संस्थेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या कमलाबाई पानी यांना प्रदान करण्यात आला. या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ, गीताली वि. म. उपस्थित होत्या. मासिकातर्फे घेण्यात आलेल्या कथास्पर्धेचे पारितोषिक वितरणही करण्यात आले.

''स्त्रिया जन्मत: सहनशील असतात. एका वेळी अनेक भूमिका त्या मोठ्या कुशलतेने पार पाडतात, तरीही आपण परावलंबी आहोत, असे त्यांना वाटते. पण हा त्यांचा गैरसमज आहे. प्रत्यक्षात पुरुषच परावलंबी आहेत. स्त्रियांच्या सहकार्याशिवाय ते पुढे जाऊ शकत नाहीत. पुरुषांच्या जीवनाचे व्यवस्थापन स्त्रियाच करत आल्या आहेत,'' असे मत दिग्दर्शक संजय पवार यांनी व्यक्त केले.

'स्त्रीवादी पुरुष : वास्तव की स्वप्न' या विषयावर बोलताना स्त्रियांच्या हक्कांसाठी झालेल्या चळवळींचा प्रवास संजय पवार यांनी कथन केला. ते म्हणाले, ''समाजाने

नेहमीच साहित्य तसेच इतर माध्यमांतून स्त्रियांची चेष्टाच केली आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत तर महिलांना आपण गुलामगिरीच्या भुलभुलय्यात अडकलो आहोत, याची जाणीवही नव्हती. त्या पिढ्यान्‌पिढ्या अंधारातच राहिल्या. स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या चळवळीनंतर टप्प्याटप्प्याने परिस्थिती बदलली. आज स्त्रिया विविध क्षेत्रांत पुढे गेलेल्या असल्या तरीही पुरुषांची मानसिकता अजूनही बदललेली नाही. आपण या समाजातील एक व्यक्ती आहोत, या आत्मविश्वासाने स्त्रियांनी निर्णय प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे.''

'शेतकऱ्यांची परिस्थिती आणि शिक्षण' या विषयावर बोलताना फुटाणे म्हणाल्या, ''शेतकऱ्यांविषयी सध्या औद्योगिक क्षेत्राला खूप आत्मीयता वाटायला लागली आहे. विविध प्रकाराची प्रलोभने दाखवून त्यांची पिळवणूक केली जाते आहे. शेतकऱ्याला खरेच स्वावलंबी, समर्थ आणि समृद्ध करायचे असेल, तर निसर्गावर नियंत्रण नव्हे, तर पर्यावरणपूरक तंत्रज्ञान त्याच्या हातात दिले पाहिजे.'' विद्यार्थ्यांच्या आत्महत्या कमी करायच्या असतील, तर त्यांना वास्तवाची जाणीव करून द्या. शाळेबाहेर मिळणारे जीवनाचे शिक्षण त्यांना द्या. मुलांशी मनमोकळेपणाने संवाद साधा, असे आवाहनही फुटाणे यांनी केले.

''देवदासींवर आजही मोठ्या प्रमाणावर अन्याय होत असून समाज आम्हाला माणसाप्रमाणे वागणूक देत नाही. आमच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी आम्ही सगळ्या आता एकत्र आलो आहोत. आम्ही स्थापन केलेली 'संग्राम' संस्था समाजाच्या मतपरिवर्तनासाठी प्रयत्न करते आहे. या पुरस्कारामुळे आमच्या कार्याला कौतुकाची थाप मिळाली आहे,'' असे मत कमलाबाई पानी यांनी व्यक्त केले.

*** डॉ. श्रीधर राजगुरू यांचा सत्कार**

केवळ मनोरंजनातून लहान मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, या एकाच उद्देशाने गेली अनेक वर्षे स्वत:चे तन-मन-धन देऊन अविरत कार्य करणारे ज्येष्ठ बालसाहित्यिक श्रीधर राजगुरू यांचा अ. भा. बालकुमार साहित्य संमेलनात कृषी व शालेय शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते मानपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्या वेळी सभामंडपातील सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात राजगुरू व त्यांची पत्नी अनिता राजगुरू यांच्या कार्याला मानवंदना दिली.

श्री. सुरेशचंद्र पाध्ये यांनी डॉ. राजगुरू यांच्या कार्याचा गौरव केला. ''पुण्याच्या पी. डी. ए. व थिएटर ॲकडमीच्या कलाकारांना घडविण्यात राजगुरू यांचे महत्त्वाचे योगदान आहे. मोठमोठे कलावंत त्यांचे शिष्य आहेत. लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश योजना, वेशभूषा, चित्रपट आदी सर्वच क्षेत्रातील त्यांचे काम धडाकेबाज आहे. मुलांना व समाजालाही त्यांनी खिळवत ठेवले,'' असे ते म्हणाले.

सत्काराला उत्तर देताना डॉ. राजगुरू म्हणाले, ''बालकुमारांच्या क्षेत्रातील कामाची नोंद घेऊन दिलेला हा जीवनगौरव पुरस्कार माझ्या जीवनातील सर्वोच्च आनंदाचा क्षण आहे. शिवराम राजगुरू या क्रांतिकारकापासून स्फूर्ती घेऊन वंदे मातरम् हा कार्यक्रम सादर केला. त्याचा देशभर प्रसार केला. चित्र, नृत्य, संगीत या माध्यमांतून मुलांना शिकू दिले. अनुभवातून व्यक्तिमत्त्व आकारण्यास मदत झाली. बालभवनाच्या उभारणीस हातभार लावला. अमरेंद्र गाडगीळ, गोपीनाथ तळवलकर, सुधाकर प्रभू, भा. रा. भागवत यांच्याबरोबरच बालकुमार साहित्यात थोडी भर घालता आली. त्यात पत्नीचे योगदान मोठे आहे.''

प्रास्ताविक डॉ. संजय मालपाणी यांनी डॉ. राजगुरू यांच्या कामाची माहिती देताना, त्यांच्या संगमनेरच्या वास्तव्यात पन्नास खेड्यांतून मुलांना नवीन खेळ शिकविले गेले, एक हजार खेळांची निर्मिती केली, २२ पुस्तके लिहिली असे सांगितले.

*** रा. चिं. ढेरे यांना 'पुण्यभूषण'**

ज्येष्ठ साहित्यिक आणि संतसाहित्य-लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रामचंद्र चिंतामणी तथा रा. चिं. ढेरे यांना यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सात मार्च रोजी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

सोन्याच्या फाळाने पुण्याची भूमी नांगरणाऱ्या बालशिवाजीची चांदीची प्रतिकृती असलेले स्मृतिचिन्ह आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. नाटककार महेश एलकुंचवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा या वेळी अध्यक्षस्थानी असतील. यानिमित्त विजया शंकर चितळे, छगन शांतिनाथ बागेवाडीकर, शांता रतनलाल कोटेचा, बिमलेंदू सेनगुप्ता आणि लीलाताई मर्चंट या स्वातंत्र्यसैनिकांचा गौरव करण्यात येणार आहे.

वेगवेगळ्या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून पुण्याचे नाव उंचावणाऱ्या मान्यवरांना देण्यात येणाऱ्या या पुरस्काराचे यंदा बाविसावे वर्ष आहे. यापूर्वी पं. भीमसेन जोशी, काका केळकर, शंतनुराव किर्लोस्कर, डॉ. बानू कोयाजी, पु. ल. देशपांडे, चंदू बोर्डे, जयंतराव टिळक, राहुल बजाज, बाबा आढाव, डॉ. श्रीराम लागू, जयंत नारळीकर आदी मान्यवरांना पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

रा. चिं. ढेरे यांचा जन्म २१ जुलै १९३० रोजी मावळातील निगडे गावी झाला. त्यांनतर १९४४ मध्ये ते शिक्षणासाठी पुण्यात आले. म्युनिसिपल शाळा क्रमांक ८ आणि ३५ मध्ये त्यांचे प्राथमिक, तर सरस्वती मंदिर संस्थेचे पूना इंग्लिश स्कूल

आणि पूना नाईट स्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण झाले. नंतर त्यांनी पुणे विद्यापीठातून बहिस्थ म्हणून एम. ए. केले आणि पीएच. डी. मिळविली. तसेच १९८० पुणे विद्यापीठ आणि २००४ मध्ये डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाने सन्माननीय डी.लिट. देऊन त्यांना गौरविले आहे. १९५० पासून त्यांचा लेखन व संशोधनाचा प्रवास सुरूच असून, त्यांची स्वतंत्र आणि संपादित १०५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यामध्ये दत्त संप्रदायाचा इतिहास, चक्रपाणी, महाराष्ट्राचा देव्हारा, लज्जागौरी, श्रीविठ्ठल : एक महासमन्वय, संत, लोक आणि अभिजन, भारतीय रंगभूमीच्या शोधात, लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा, कल्पद्रुमाचिये तळी, खंडोबा, मुसलमान मराठी संतकवी, लोकसंस्कृतीचे उपासक अशा अनेक ग्रंथांचा समावेश आहे. 'श्री तुळजाभवानी' हा त्यांचा ग्रंथ नुकताच प्रकाशित झाला असून, सध्या 'करवीरनिवासिनी महालक्ष्मी'या शोधप्रकल्पाचे काम सुरू आहे. महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा समजावून घेण्यासाठी अनेक देशी-परदेशी अभ्यासक या ग्रंथांचा आधार घेतात.

*** महेश एलकुंचवार यांना 'नागभूषण' पुरस्कार**

प्रादेशिकतेच्या सीमा ओलांडून भारतीय रंगभूमीवर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण नाटकांचा ठसा उमटविणारे महेश एलकुंचवार यांना 'नागभूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले. आपल्या जन्मभूमीतील या आपुलकीच्या सन्मानाने एलकुंचवार काहीसे सद्‌गदित झाले. एक लाख रुपये, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र या स्वरूपातील हा 'नागभूषण' पुरस्कार 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते देऊन त्यांना गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कथालेखिका आशा बगे होत्या.

''छोटे-छोटे, लहान-लहान वाटणारे आनंदकण जमा करत जगणे मला आवडते. सुखाच्या शोधात व स्पर्धेत तो आनंद मिळत नाही. सुख, आनंद आणि समाधान या वेगवेगळ्या बाबी आहेत. मी सर्वार्थाने आनंदी आहे आणि अनेक अर्थांनी भाग्यवान आहे. मला नागपूरकरांनी आणि साहित्यरसिकांनी भरभरून दाद दिली, कौतुक केले आणि पुरस्कारही दिले. मला त्यामुळे संकोचल्यासारखे होते. ज्या ठिकाणी ज्ञानेश्वरासारखा प्रतिभावंत होतो तेथे कुणीही आपण लेखक असल्याचा दंभ मिरवू नये'' अशा शब्दांत महेश एलकुंचवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

''खरं तर माझे आधीचे आयुष्य अविचारी, दिशा नसलेले होते. माझ्या हातून काही घडेल असे वाटत नव्हते. अशात १९६७ साली लिहायला सुरुवात केली. श्री. पु. भागवत, विजया मेहता व विजय तेंडुलकर यांनी मला उचलून धरले. लौकिकार्थाने खूप यश मिळाले.''

'जे कायम स्वत:च घर' वाटलं, त्या नागपूर शहराबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना एलकुंचवार म्हणाले, ''५२ वर्षांपूर्वी नागपूरात आलो तेव्हा हे प्रतिभावंतांनी झगमगणारं

